# माणूस



सप्टेंबर – १९६२

मूल्य : एक रुपया

पत्रव्यवहाराचा पत्ता
'माणूस,' मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

• • •

वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया

वर्ष दुसरें : सप्टेंबर १९६२
अंक चवथा



# या अंकांत

## — सूचना —

१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.
३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

— जाहिरात व्यवस्था —
एस्. आर्. करमरकर. सुपर पब्लिसिटी, पुणें.

अभिराष्ट्रेण वर्धताम्




संपादक
**श्री. ग. माजगांवकर**

— सामाजिक अंतरंग —

रणावीण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें ... ... रा. म. शास्त्री.

— साहित्य विभाग —

चीड ... ... श्रीपाद काळे
अबोला ... ... किशोर गोमकाळे
नुसतेंच ना पाहूं आम्ही ... ... वा. वा. पाटणकर
योगायोग ... ... दत्ता वालघूरकर
पागलखान्यांतील साहित्य-चर्चा ... ... प्रतिनिधि
कविता मधुकर केचे, माधव काटकर सिरास, शशिकांत नागले, श्री.

— रंगभूमि, चित्रपट —

दिनकर कामण्णा ... ... सुधीर दामले
सोनेरी नदीचा राजा ... ... प्रतिनिधी
स. अ. शुक्ल ... ... अनंत
क्षण आला भाग्याचा (परीक्षण) ... ... रंगा मराठे
हिचकॉकची नवी भरारी ... ... .........
--एका सामान्य पट्टेवाल्याची निराळी मुलाखत--

मुखपृष्ठ--दत्ता महाबळेश्वरकर

# मासिकें कशासाठीं ?

आमचे मित्र श्री. य. गो. नित्सुरे येत्या दिवाळीपासून एक नवें मासिक सुरू करीत आहेत. यासंबंधीचें एक उद्देशपत्रक त्यांनी निरनिराळ्या वृत्तपत्रांकडे, स्नेह्यासोबत्यांकडे व साहित्यिकांकडे पाठविले असून त्यांत या सर्वांकडून आपल्या नव्या उपक्रमाला सहाय्याची व सदिच्छेची अपेक्षा व्यक्त केली आहे. हें उद्देशात्मक पत्रक पुण्याच्या 'तरुण भारता' कडेहि गेलें व तरुण भारतकारांनीं अनपेक्षितपणें दि. १६ ऑगस्टच्या अंकांत एक अग्रलेख लिहून नित्सुऱ्यांच्या प्रयत्नाविषयीं आपला संपादकीय दृष्टिकोन त्यांत मांडला.

या अग्रलेखाचा एकूण सूरच अनुदार व हिणवण्याचा आहे. अशा प्रकारचा प्रयत्न कोणीहि सुरू केला तर किमानपक्षी त्याला आपली सदिच्छा कळवणें हा साधा शिष्टाचारहि यांत पाळला गेलेला नाहीं. "मासिकाचें अजीर्ण झालेलें आहे. तूं कशाला हा नवीन उपद्व्याप करतोस ?" हें विचारणें म्हणजे 'सारेच लग्न करतात, तुझी आणखी त्यात कशाला भर ?' असें लग्नाचें निमंत्रण घेऊन येणाऱ्या तरुणाला सुनावण्यासारखें आहे. समजा, साध्या सदिच्छा महाग असतील तर मौनाचा मार्गहि मोकळा होता. हे राजमार्ग सोडून तरुण भारतकार आडवाटेला वळले, यावरून निवडणुककालातील रागलोभ अद्याप विसरले गेले नसावेत असा तर्क आहे.

अर्थात एवढेंच असतें तर 'माणूस' नें यासबंधी चिंता करण्याचें कांहींच कारण नव्हतें. अशा तऱ्हेचे शिष्टाचारभंग, परस्पर हेवेदावे नेहमींच समाजांत चालू असतात. व जो तो आपापल्यापुरता त्यांचा समाचार घेतहि असतो. परंतु नित्सुऱ्यांचा उत्साहभंग करण्याच्या भरांत तरुणभारतकारांनीं 'आजच्या काळांत मासिकाचेंच प्रयोजन काय ?' असा एक सवाल मध्येंच अर्धवटपणें उपस्थित केला आहे. "बहुतेक दैनिकाचे साप्ताहिक रविवारचे अंक आज मासिकांतून येणारा मालमसाला भरपूर पुरवीत आहेत. तसेच कित्येकाचे मोठे दिवाळीअंकहि निघतात...आजचीं साप्ताहिकेंदेखील मासिकांचें पुष्कळसें काम करीत आहेत." या वाक्यांतून तरुण भारतकारांचा मासिकासंबंधींचा एकूण दृष्टिकोन व्यक्त होत आहे. हा दृष्टिकोन केवळ चुकीचाच आहे असे नव्हे तर दैनिकांच्या स्वरूपाविषयीं व सामर्थ्याविषयीं फाजील विश्वासाचा निदर्शक आहे. दैनिक, मासिकांची भिन्नभिन्न कार्यक्षेत्रें स्पष्ट करणें म्हणूनच "माणूस" ला आवश्यक भासत आहे.

एकच उदाहरण घेऊं, वोलपर्टच्या 'नाइन अवर्स टू राम' हा विषय 'किर्लोस्कर' मासिकानेहि हाताळला, 'केसरी' त तरुणभारतचे संपादक श्री. ग. वि. केतकर यानीहि दोन लेख लिहून या विषयाला गति दिली आणि खुद्द तरुणभारतांतहि अधूनमधून स्फुटें, पत्रें वा उतारे प्रसिद्ध होतच आहेत. कोणीहि हें मान्य करील कीं, 'किर्लोस्कर' मासिकांतील लेखाचा जेवढा प्रभाव पडला तेवढा केसरी, तरुणभारतातील लिखाणाचा पडलेला नाहीं. लेखक लहानमोठे होते म्हणून हा फरक नाहीं, तर हा विषय नीट मांडण्यासाठीं, वाचकांना हळुहळू विश्वासांत घेऊन प्रतिपादन त्यांच्या गळी उतरवण्यासाठी जो किमान विस्तार, माहितीचा तपशील, साहित्याचा फुलोरा मासिकात येणें शक्य असतें तो दैनिकांत व साप्ताहिकांत जमू शकत नाहीं. वेळेचें व जागेचें बंधन दैनिक-साप्ताहिकांना विषयाच्या जुजबी, त्रोटक व फुटकळ परिचयापुढें जाऊंच देत नाही. ना. सी. फडके याचा किर्लोस्करमधील लेख कुठल्याहि दैनिकात आला असता तर किमान दोन हप्त्यात तरी तो विभागावा लागला असता. या विभागणीमुळें अर्थात त्याची वाचकावरील पकडहि तितकीच निसटती झाली असती. केसरीत ग. वि. केतकरांचा लहानसा लेखहि दोन हप्त्यांत द्यावा लागला व त्यामुळें त्याचा प्रभावहि पुसट झाला हें सत्य तरुणभारतकार नाकारूं शकतील असे वाटत नाही.

हाच न्याय दैनिकसाप्ताहिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या इतर सर्व साहित्यालाहि लागू पडतो. तरुणभारतांत दर आठवड्याला एक कथा येते. ही कथा किती वाचकांकडून वाचली जातें याचा एकदा तरुणभारतानें शोध घ्यावाच. म्हणजे आपले कार्यक्षेत्र कोणतें, मासिकांचें कोणतें याबद्दल त्यांच्या दृष्टिकोनांतील घोटाळा दूर होईल. चांगले कथाकार दैनिक-साप्ताहिकांत आपल्या सुमार कथा देण्यासच राजी असतात. दैनिक-साप्ताहिकांत आलेल्या कथांचें मूल्यमापन करण्याच्या भानगडींत टीकाकारहि पडत नाहीत. तीच गोष्ट कवितांचीं. यासाठीं कोणी दैनिके हातात घेत नसतो. ताज्या बातम्या देणें, महत्त्वाच्या विषयांची तोंडओळख करणे हें प्राथमिक काम दैनिकाचें असतें. वाचकांची अभिरुचि समृद्ध करणें, दैनिकांतून आलेल्या किंवा न आलेल्या महत्त्वाच्या निवडक विषयाचा साधार, सविस्तर प्रपंच करून वाचकांना सुशिक्षित करणे हा पुढचा भाग मासिकांकडे असतो. याहिपुढें जें वाचक जाऊं इच्छितात त्यांचेसाठी पुस्तकें आहेत, ग्रंथालयें आहेत, अभ्यासिका आहेत. यांत कमीअधिकाचा किंवा लहानमोठेपणाचा प्रश्न नाहीं. लोकशिक्षणाची प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असा हा फरक आहे. आपली जागा ज्यानें त्यानें ओळखून त्यांत बसावें हें उचित.

पण आतां "जागा चुकण्या"चाच काळ आहे त्याला तरुणभारतकार तरी काय करणार ? राजकारणी माणसें डोळ्यांत तेल घालून सावधपणे देशाचे राजकारण करण्याऐवजीं अध्यात्मावर प्रवचनावर प्रवचनें झोडीत आहेत. ज्याचें प्रवचनाचें क्षेत्र. ते आमचे शिक्षक, प्राध्यापक व त्याच्या शिक्षणसंस्था व विद्यापीठें राजकारणाचे अड्डे ठरत आहेत. संसाराच्या ओढीपेक्षां स्त्रियाना बाहेरकामाची ओढ जास्त लागून राहण्याचे हे दिवस आहेत. साराश, अराजकाचा, अनैसर्गिक व अस्वाभाविक वर्तणुकीचा हा काळ आहे. जीवनाचा षड्जसूरच कोणी नीट लावत नाहीं. "स्वधर्म" कोणाला सांपडत नाही. त्यामुळें नीतिनियम सैल आहेत. व्यवसायबंधने शिथिल आहेत. मर्यादांचीं आणि सीमांची कुंपणें मोडून पडली आहेत. अशा सार्वत्रिक चढाओढीत आणि पडापडीत दैनिकानी साप्ताहिकांवर आणि साप्ताहिकांनी मासिकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न चालविला असला, तर तो दुर्लक्षणीय नसला तरी, दुःसहनीय ठरावा एवढें त्याचें महत्त्व आम्ही तरी खासच मानीत नाहीं. ●●●

# आमचे वाचक

—नो. थॅंक्स ! १९–५–६२.

स. न. वि. वि.

आम्हीं एक जाहीर निवेदन दिलेलें आहे. त्याची एक प्रत पाठवीत आहे. ' कार्यकर्ता कीं कार्यसत्ता ' या मथळ्याखालीं आपणांस आपले अकांत घेतां आल्यास जरूर घेणें. सदर अंकाचें ५० अंक व्ही. पी: नें पाठवावे. आमची निवडणूक तारीख ३१–५ व ३–६ ला आहे.

आपला.
शेख अबुभाई बक्षुभाई
राहुरी. जि. नगर.

( क्षमस्व. निवडणुकीच्या आखाड्यांत ' माणूस 'चा उपयोग होऊं शकत नाहीं. कार्यकर्त्यांच्या मनोभंगाचें दुःख आम्ही लेखांत मांडलें आहेच–संपादक )

—अपेक्षा ! २४–५–६२.

स. न. वि. वि.

आपल्या ' माणूस ' मासिकाचा मे १९६२ चा अक वाचण्यांत आला अंक फारच आवडला. ' माणूस ' बाल्यावस्थेंत असूनसुद्धां विविध सदरांनीं नटलेला व समृध्द वाटला. उत्तरोत्तर अशीच प्रगति होऊन मराठी शारदेच्या मदिरांत ' माणुस ' चा नंदादीप सतत प्रज्वलितपणें तेवत राहो व माणसांना माणुसकी शिकवो हीच अपेक्षा.

आपला.
व्ही. एस्. चौधरी
मु. पो. बोदवड

—एक इंजेक्शन. २–६–६२

स. न. वि. वि.

' जून ' अकांत एक गोष्ट फारच खटकली. ' रेडिओ ॲक्टिव्ह मुले ' याऐवजी ' रेडिओ ॲॉक्टेव्ह मुलें ' असा मथळा देऊन त्या चित्राचें मर्मच तुम्ही नाहीसें करून टाकलें आहे.

आणखी एक गोष्ट, तुम्हीं लेखाचीं कात्रणें पाठवतां तशी हास्य चित्रांची पाठवत नाहीं काय ? माझ्याकडचे आत्तांपर्यंतचे सर्व अक कोणी ना कोणी वाचावयास नेले आहेत. ते परत मिळणें केवळ अशक्य आहे. तेव्हा कात्रणें किंवा मार्च, एप्रिल, मे चे अंक शिल्लक असल्याम पाठवावे.

आपला.
डॉ. शरद अभ्यंकर.

—नवल ! ६–६–६२

स. न. वि. वि.

आपला ' माणूस ' चा जूनचा अंक पाहिला. मुखपृष्ठावरील रम्य व भावपूर्ण चित्र मराठी मनास आनंद देणारें आहे. मासिकांतील चोखंदळ विविधता उल्लेखनीय आहे. विशेषत: ' वकील ' ' साहित्यिक डॉ. अत्तरदे ' ' एका जपानी प्राध्यापकाच्या दृष्टिकोनांतून मराठ्यांचा इतिहास ' व ' आतर–भारती ' हे लेख मनाची पकड घेतात. संपादकीयांतील आपला आशावाद यथार्थ वाटतो. आणि म्हणूनच माझ्यासारख्या सामान्य माणसानेहि ' माणूस ' बद्दल आदर व आपलेपणा बाळगावा यांत नवल तें काय ?

आपला.
वि. भा. नेमाडे.
भुसावळ.

( नवल एवढेंच की ' माणूस ' जेवढा पाहिला जातो त्या प्रमाणांत विकला जात नाहीं. )

—एक परीक्षण ! ६–७–६२

स. न. वि. वि.

' माणुस ' चा जुलै अंक मिळाला. समग्र वाचला. विषयांची विविधता आणि मजकुराची वाचनीयता यांसाठी मेहनत घेतलेली पानोपानीं आढळते. ' सव्वीस दिवसाचें स्वप्न–' ' पर्वतीदर्शन ' आणि क्रिकेटवरील लेख मला आवडले. श्री. केचे यांचा सरिताबाईंच्या पुस्तकावरील समीक्षणात्मक लेखहि चांगला आहे. मुखपृष्ठ नजरेत भरतें. अभिनदन !

आपला.
मधु मंगेश कर्णिक.

—अत्तरदे ! ७–६–६२

' माणूस ' चा नवा अंक पोहोंचला. डॉ. अत्तरदे यांच्यावरील लेख अस्वस्थ करणारा आहे. डॉ. अत्तरदे येरवड्यासच असतील तर त्यांची अधिक विचारपूस तुम्हीं करावी असें मला वाटतें. पुण्यांतल्या पुण्यांत तें फार लांब नाही.

' माणूस ' मार्गें कांहींतरी नवें देण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. तो अर्थातच स्तुत्य आहे. त्यात तुम्हांला यश लाभो.

आपला
प्रल्हाद वडेर.

( हा अक पाहावा ही विनंती. )

—चुकोची दुरुस्ती. ३०-५-६२

स. न. वि. वि.

'माणूस' चा जूनचा अंक पोंचला. माझी कविता तत्परतेने प्रसिद्ध केल्याबद्दल आभारी आहे. शेवटून दुसऱ्या ओळीत 'सरण' हा शब्द छापला न गेल्यामुळें न्यूनता वाटते. यापुढें दक्षता घ्याल अशी आशा.

आपला
राम. श्री. गोसावी.
सांगली.

—फिरत्या वाचनालयांच्या आवडी

स. न. वि. वि.

'माणूस' मासिक आपण चांगलं सजवलं आहे. पण त्यात कथा कमी असल्यामुळें फिरत्या वाचनालयांत प्रवेश होणं कठीण जाईल. त्या वाचकाना भरपूर चांगल्या कथा हव्या असतात. नवकथेची आवड ओसरली आहे. चुरचुरीत म्हटल्या जाणाऱ्या लिखाणातील तोचतो पणाहि आतां जाणवू लागला आहे. या गोष्टी ध्यानांत घेऊन कथा निवडाव्यात. जितक्या चांगल्या कथा मिळवू शकाल व मासिकांत अंतर्भूत करूं शकाल तितकं मासिक यशस्वी होईल. हें मीं फिरत्या वाचनालयांच्या आवडी लक्षांत घेऊन सुचवलं आहे. एरवीं आपले मासिक चागलें आहे. असेच अंक सतत निघत राहतील कां ?

आपला—
प. त्रि सहस्रबुध्दे.
ठाणें

नवकथेची आवड ओसरलेली आहे असे म्हणणें म्हणजे हा नवकथेचा गौरव आहे. कारण वाचकाची आवडनिवड लक्षांत घेऊन ती अवतरली नाही. ती अवतरणें हा प्रगतीचा एक टप्पा होता. नेहमीच्या कथापेक्षां जरा वेगळें, एवढयाच कारणांमुळें जे वाचक तिला लाभले ते आतां निराश झाले आहेत. कथेच्या कुठल्याहि प्रगतीच्या दिशेबावत 'माणूस' ला आस्था राहीलच. परंतु उत्तम कथानकप्रधान कथाची वाचकांची आवड भागली पाहिजे हें आपलें म्हणणें योग्य आहे. तसाहि प्रयत्न करीत आहोत. तशा कथाहि असख्य येतात. परंतु हाती फारच थोडया लागतात. आपल्या आस्थेवाईक सूचनेंबद्दल आभारी आहोंत— संपादक.

—इशारा ! २७-६-६२

स. न. वि. वि.

सध्यांच्या महगंतेच्या दिवसात कोणाकडून काहीं फुकट मिळेल अशी कोणीहि संपादकानें आशा ठेवूं नये असे मला वाटतें.

आपला
के. ल. जोग.
मीरत.

( महगंतेचें सोडा, पानशेत पुराच्या आपत्तीत देखील कुणी कांहीं फुकट द्यावें अशी अपेक्षा नव्हती. ज्यांत ज्याचें समाधान तें त्याला मिळालेंच पाहिजें. ) संपादक

—आशीर्वाद ! ३१-७-६२

स. न. वि. वि.

'माणूस' च्या ऑगस्ट अंकांतील संपादकीय मला आवडलें. नि:स्पृह, सयुक्तिक व वाचनीय आहे. त्याचप्रमाणें रा. म. शास्त्रीकृत 'रणावीण स्वातंत्र्य' हा लेख भरगच्च, माहितीपूर्ण व विचारप्रवर्तक आहे. श्रेष्ठ प्रतीच्या मासिकाला शोभण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. संपादन चांगले आहे. मी तुम्हांला सुयश चिंतितो.

आपला,
ना. ह. आपटे.

—सहानुभूति २-८-६२

स. न. वि. वि.

'माणूस' चा ऑगस्टचा अंक फार आवडला. विशेषत: 'रणावीण स्वतंत्र्य जेव्हां मिळालें' हा लेख विचारप्रवर्तक वाटला. अनेक शिक्षकमंडळी माझेकडून अंक मागून नेतात.

आपला.
प्रभाकर इनामदार.
सेलू.

—सक्रीय सहानुभूति ३-८६२

स. न. वि. वि.

आपला 'जुलै' चा 'माणूस' चा अंक मिळाला. 'उदंड जाहलें पाणी' हें नभोनाटच मला फार आवडलें. त्यानंतर तो अंक स्नेह्यानीं वाचावयास नेला. त्यामुळें तो पूर्ण वाचतां आला नाहीं आज दोन रु. पाठवीत आहे जुलै व ऑगस्टचे अंक पाठवावेत. अंक चालूं ठेवावासा वाटल्यास वर्गणी पाठवतो.

आपला.
अनंत श्याम जोशी.
सांगली.

—थँक यू. ४-८-६२

स. न. वि. वि.

'माणूस' चे गेल्या वर्षभरांतील बरेचसे अंक वाचनांत आले. वैशिष्टचपूर्ण मुखपृष्ठ व वेंचक मजकूर यामुळें 'माणूस' वाचनीय ठरतो. आकर्षक वाटतो.

'ऑगस्ट' चा अंकहि असाच उत्कृष्ट वाटला. नाना अडणविसाच्या आठवणी रोचक आहेत. परप्रांतातहि माणूसाचा संचार होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. श्री. मराठे याचें चित्रपट परिक्षण चांगले आहे. परतु इतका जुना चित्रपट कां निवडला. ( हरियाली और रास्ता ) तसेंच एकाच चित्रपटाऐवजी दोन-तीन चित्रपटाचे परामर्ष दिले तर ठीक होईल असें वाटतें. श्री. सुधीर दामले यांचा बाळाभाऊ जोगांवरील लेख बरा आहे. आपल्या संपादनाच्या कौशल्याची चमक अनेक जागी दिसते. त्याब ल अभिनंदन.

आपला
वसंत भालेकर
मूबई.




: लेखक :

श्रीपाद काळे

बाबू मेस्त्री गुळाचा चहा पिऊन, आणि लोंबत्या काडीचा चष्मा कानाला बांधून आपल्या शाळेंत बसतो, तेव्हां सूर्य चांगला उगवलेला असतो, त्याच्या चारी बाजूच्या उघड्या शाळेंत खोचल्यासारखीं सूर्यकिरणें भरून रहातात; आणि त्याची शाळा अधिक केविलवाणी दिसत्ये. जमिनीला पाऊल अडखळावें, असे खड्डे असतात. जुनीं हत्यारें गंज चढून कोपऱ्यांत निर्वशासारखीं उभीं असतात. भात्याच्या पुढची विस्तवाची जागा थंड असते. पांढरी रखा इकडे तिकडे उधळलेली असते. भात्याचा आकार मोठा आहे–पोट फुगलेल्या जनावरासारखा तो भाता दिसतो...

बाबू मेस्त्री अशा उन्हांत आपल्या अंगाची मुरकुंडी वळून सबंध शाळेंत इकडे तिकडे बघतो. भाता हालवायला कोणी एखादें पोर जवळपास नाहीं, हें मनीं घेतो, आणि तोंडानें "चक्" करतो. उघड्या शाळेंतून तो मग खालच्या अंगाला पाहातो. दहा-वीस घरें कललेलीं उभीं असतात. एखादी म्हातारी खोणव्या ओणव्यानीं कांहींतरी करीत असते. करंगळीएवढ्या पाटाच्या पाण्याची धार वहात असते, त्याखालीं कोणीतरीं कळशी लावलेली असते, आणि त्याचा आवाज येत असतो. अशाच एका कलत्या घरावर एक कावळा बसलेला असतो, आणि शाकाराच्या गवतांतून कांहींतरी शोधित असतो. एवढ्या घरांतून नीटशीं दहा माणसें-सुद्धां मिळणार नाहींत. ज्यांना बाहेर जातांच आलें नाहीं, अशींच मोडकीं तोडकीं माणसें इथें राहिलीं आहेत. गेल्या निवडणुकीच्या वेळची गोष्ट. मतदाराची यादी घेऊन कोणीतरी आला, सबंध वाडींत आतां शिष्ट असा बाबू मेस्त्री. त्यानें सबंध वाडीचीं मतें आपल्याला मागितलीं. बाबू मेस्त्रीनें कोणतीहि गोष्ट कोणाला नाहीं म्हटलेली नाहीं. कांहीं मागा, जवळ नसलें, तरी बाबू आपला होय म्हणून मोकळा होतो. हा आपला एक त्याचा स्वभाव. बाबूनें त्यालासुद्धां होयच म्हटलें. त्यानें वाडींतल्या मतदारांची यादी काढली. बाबूला वाचतां येत नाहीं, तेव्हां तो म्हणाला, "मला वाचून दाखवा नांवें."

त्यानें चाळीस नांवें वाचलीं. त्यांत इथें फक्त सहाच माणसें होतीं. म्हणजे ही हकीगत... उन्हाचें बाबू मेस्त्री खालीं बघतो. हातांतलें हत्यार त्याचें तसेंच थांबतें. कांहीं-बाहीं त्याच्या मनांत येऊं लागते. आणि एवढ्यांत रोजचें विमान कुठेंतरी आवाज देऊं लागतें. विमानाचा एका लयीचा आवाज वाढतच जातो. खालच्या घरच्या म्हातारीला धड दिसत नाहीं म्हणते, पण विमान वाजलें कीं हाताचा कनसुला डोळ्यांवर धरून ती आभाळाकडे बघते. कळशी धारेला लावून कमरेला हात धरलेली बाईहि तशीच बघते. एखादें भुकेनें रडणारें पोरहि उगें राहून वर बघतें. आणि बाबू मेस्त्री मनांत चडफडतो. खूप चडफडतो. विमान चालवणाऱ्या लोकांना दुसरा पोटापाण्याचा उद्योगच नाहींसा त्याला वाटतो. हे रिकामपणीं विमानें चालवीत बसतात. रात्र नाहीं. दिवस नाहीं. सकाळ नाहीं. दुपार नाहीं. त्याचे दोन मुलगे त्यानें शाळेंत घातले होते. अभ्यासाचा वेळ मोडून ते असलेच धंदे करीत होते. कुठें छत्रीची काडी वांकवून त्याला कोयतीचें वळण दे; कुठे गाड्या करीत रहा. असा वेळ त्यांनीं घालवला, आणि शिक्षण मुळीं झालेंच नाहीं. जन्माचें फुकट गेल्यासारखें झालें. बाबूला वाटतें, असेंच्या असें तालुक्याला जावें. मामलेदारकडे रिपोर्ट करावा.

विमानाचा आवाज बंद होऊन थोडा वेळ होईपर्यंत बाबू मेस्त्री हाताच्या विळख्यांत

दुमडलेले पाय घेऊन हवालदील झाल्या-सारखा असतो. काय करावें, तें त्याला सुचत नाहीं. फुकटच्या फुकट विमानें चालवणाराचा त्याला त्वेष येतो. त्याला एकदम वाटतें, बघावे बघावे नि सरकार होऊन या विमानें चालवणारांना कावूत आणावे. मोटारी चालव-णारांनासुद्धां असेंच. वेळ झाल्याशिवाय मोटारीकडे त्याना फिरकायलाच द्यायचें नाही. अगदी कोणाचेंच कसें लक्ष नाही!

बावू मेस्त्री हातातली तासणी उचलतो. आपला राग मग तो पुढयांतल्या लांकडावर काढतो... एकाद्या चुकार पोराला भाता हालवायला बसवतो, आणि फुललेल्या निखा-ऱ्यांत कोयत्याचे पातें घालून चट्कन पाण्यांत भिजवतो. आणि मग पोटातला राग शांत झाल्यासारखा त्याला वाटतो.

...आपलें वय काय असावें, याचा अंदाज बावू मेस्त्रीला नीट लागत नाहीं–किंवा त्याचा विचारच तो कधीं मनांत आणत नाही–पण त्यानें खूप खूप मागचें पाहिलें आहे–अजून त्याच्या पुरतें स्मरणांत आहे. ही वाडी सबंध भरलेली त्यानें पाहिली आहे. इथले तात्या मेस्त्री, नि तुका मेस्त्री, बावडया-पर्यंत मुद्दाम घरें, वाडे बांधायला जात. हें बावू मेस्त्रीने पाहिलें आहे. तात्या मेस्त्रीनें कधीं मोजमाप घेतलेलें नाहीं–त्याची नजरच अशी अचूक होती. खाली सामान तयार करावें, आणि वर नेऊन जोडावे. एका धर्म शाळेंत वाराला त्यानें सांधा भरला होता. चांगले साहेब लोकहि तात्याचें कसब बघून थक्क होऊन जात–

तुका हाताचा हलवा होता. खांबावरची नक्षी तो हां हां म्हणतां तयार करी... पुष्कळ देवळांतल्या मूर्ती त्यानेंच कोरलेल्या आहेत...कोयत्या, कुऱ्हाडीला असें पाणी देई, की हत्यार झिजलें, तरी त्याची धार कमी व्हायची नाहीं–

–हातानें काम करीत असतां बावूच्या डोळयापुढें हें सारें उभें रहातें–एकेक जण केव्हा गेलें कळलेंच नाहीं– बदूकी तयार करणारा एकनाथ असाच गेला– कुलपें करणारा रामा दमा लागून मेला,...

––बावू मेस्त्री लहानाचा मोठा इथेंच झाला. जन्मातले सारे उन्हाळे, पावसाळे त्यानें इथेंच पाहिले. पडक्या मोठया घराच्या स्वतःच्या वांटयाच्या एकाच खोलीत संसार केला–चैन गंमत काय ती इथेंच केली–पण बावू अजूनहि कोणाच्या डोळयांत भरत नव्हता. एखादें महत्वाचें लांकूड बावूच्या हाती द्यायला अजूनहि जो तो धास्तवत होता. कोयत्या, विळयांना पाणी देणें, मुठी घालणें, आणि पडद्ये तयार करणें–सहज मारण्यासारखा असेल, तर वासा मारणें एवढेच उद्योग तो जन्मापासून करीत होता.

...थोडया वर्षांपूर्वींची गोष्ट: परां-जप्यांचा हातरहाट करायचा होता...स्वतः भाऊ परांजपे सुताराच्या वंशांत जन्माला आला नव्हता एवढेंच. बाकी तो नागर भरी, कपाट करी–अतांशा त्याचा हात थरथरत होता. त्यानें बावूला विचारलें, "बावू रहाट करायचा आहे–"

"मग–करूया. (नाहीं म्हणणें बावूच्या स्वभावातच नव्हतें)

बावू सकाळीच परांजप्याकडे गेला. भाऊ पराजप्यांचें जरा दुर्लक्ष झालें, आणि बावूनें पट्टयाचें लांकूड आखूड करून टाकलें. चांगलें चिरलेलें सामान असें फुकट गेलें–बावूचें कसब हें असें.

लहानपणीं, आणि तरुणपणीं त्याला कोणी हाताखाली मदतीलासुध्दां घेईना, तरी-सुध्दां बावू मेस्त्रीचें रीतीप्रमाणें लग्न झालें.– लग्नाकरतां जें थोडें फार कर्ज झालें, तें अजू-नहि पुरें फिटलेले नाही, ही गोष्ट वेगळी. बावू मेस्त्रीला बायको मिळाली. वाडीत त्यावेळी गावाला वेड लावणाऱ्या दोन बायका होत्या...त्या होत्या, तेव्हां बरीच मोठ मोठी मंडळी वाडीत वेळ घालायला येत. बावू मेस्त्री तसा शहाणा. अशा बायकाकडे पाहूं नये, हे त्याला माहीत होतें. पुढें पुढें वाडीत दारूचें व्यसन वाढलें. त्याचा पुतण्या रोज सात पचेचाळीसच्या टायमाला टेर होई. बावूला-सुध्दां तो केव्हां केव्हा घे घे म्हणे, पण बावूनें कधी त्या पाण्याला स्पर्श केला नाहीं. बावूला बायको मिळाली. गावावर सुटलेल्या बायका-सारखी ती गोरी गोमटी नव्हती, हें बावू मेस्त्रीचें आतरिक समाधान. नाकावर डाव्या-हातानें वोट मारीत बोलायची तिची संवय. दोन मुलगे झाले, आणि तापसरीच्या साथीत ती मेली.

बावू मेस्त्री जवळ कसब असें नव्हतें. इतरापेक्षां आपल्याला अकलेचें, हुषारीचें मान जरा कमी हें तो जाणून होता. कधीं-मधीं स्वतःला शहाणा समजें हें वेगळें. तरी बावू मेस्त्रीला सबंध दिवसभर रिकामा बसलेलें कधीं माहीत नव्हतें...पोटांत कांहीं नसतां हावक्या हावक्यानें त्यानें तापलेल्या लोखंडावर घण मारले होते..."उद्यां देतो" म्हणून दुरुस्त करायला म्हणून आणलेली वस्तू महिना-पंधरा दिवस तशीच ठवायची, ही जातीची संवय त्याची सुटली नव्हती, पण महिना-पंधरा दिवसानीं कां होईना, ज्याची वस्तु त्याला मिळत होती. कोण काय देईल, त्यावर बावू मेस्त्री सतुष्ट होता. जगांत त्याचें मोटारवाल्याशी, नि विमानवाल्यांशीं तेवढें वांकडें होतें––जन्मभर मरमर मरून बावू मेस्त्रीला धड वस्त्र मिळालें नव्हतें––सध्यां-तर नेसायच्या वस्त्राला फाटल्या ठिकाणीं गाठी किती मारायच्या, हें त्याला कळत नव्हतें–गळयांतलें जानवेंसुद्धां असेंच. वर्षा-वर्षाला बदलतां येत नव्हतें–तें सुद्धां गांठी-गाठीनेंच सांवरलें होतें––इतकें कशाला, वाढलेली दाढी ओरपतां ओरपतां त्याला पुरें होत होतें––डोळयांनी दिसत नव्हतें––कधीं कोणाच्या आणलेल्या चष्म्याचें एक भिंग कधीं पडून हरवलें, हें त्याला कळलें नव्हतें–– गावांतला सोनार चष्म्याच्या काडया नीट बसवून देत नव्हता. म्हणजे सुतळीच्या धाग्यानें चष्म्याच्या काडया कानांवर फिरवाव्या लागत होत्या...

वाडींत सर्वांचाच निर्वंश झाला होता, असें नव्हे. उठला–– तो समजायला लागल्यावर मुंबईला धांवला होता. वर्षाला–– केव्हां-तरी पोराबाळासकट येत होता, आणि जाताना होतें नव्हतें तें गहाण ठेऊन उताराचे पैसे जमवित होता. सबंध वाडी आतां ओस पडल्यासारखी झाली होती, गावातलें नांगर भरणें, कोयत्या पाजळणें, कुऱ्हाड–कुदळीना दांडे घालणें हें काम बावू मेस्त्री शिकस्तीनें करीत होता. चार–आठ आणे मिळाले, की दुकानावर जात होता. पैशातून चार एवढेसे जिन्नस आणत होता. वाडीत केव्हाहि गेले, तरी बावू मेस्त्रीचें ठोक ठोक ऐकायला येतें...कोणी गांवातला माणूस वाडीत गेला, तर बावू मेस्त्री आवर्जून त्याला या–बसा म्हणतो. वाडीत आतां तोच जाणता आणि नेणता. येणाऱ्याला बसायला द्यायला

(पृष्ठ आठ पहा)

# उमाळा

**किशोर गोमकाळे**

पहाटेचा हवासा वाटणारा मंद वारा वाहूं लागला होता. पुसट होऊं पहाणारी शुक्राची चांदणी अंगणांतून निजल्या-निजल्याच तिला दिसत होती. वातावरण कसं अगदीं गोड होतं. दूर कुठं तरी बैलांच्या गळ्यांतले घुंगरू वाजत होते. मधूनच एखादा माणसाचा आवाजहि येई. अन् आतां कोंबडा आरवला. तसा तो नेहमींच आरवतो. त्यानं अजून एक-दोनदां बांग दिली. तशी ती उठली. घराबाहेर गेली. तिकडनं आल्यावर सरळ ती घरांत गेली. ओलाच हात तिनं चुलींत खुपसला अन् राखुंडीनं ती दांत घासूं लागली. हातांतल्या बांगड्यांनीं आतां ताल धरला होता. दांत घासतांना कसलातरी विचार ती करत होती. तोंड धुतल्यावर ओले हात तिनं लुगड्यालाच पुसले. इकडे-तिकडे पाहिलं. अंगणांतल्या कोपऱ्यांतलं लहान मडकं पाण्यानं भरून घेतलं अन् काल संध्याकाळीं जमविलेलं शेण ती त्यांत कालवूं लागली. तिला सडा घालयचा होता.

तिनं पुन्हा सारीकडे बघून घेतलं. सूर्य आतां वर डोकावूं लागणार होता. तरी तो झोंपलाच होता—वाकळ डोक्यावर पांघरून—पाय पोटाशी दुमडून. अगदीं लहान मुलासारखा. तो नेहमींसारखा सुस्त झोंपलेला पाहून तिला त्याचा राग आला. ती कांहींतरी पुटपुटूं लागली. आपल्यासारखंच त्यानंहि लवकर उठावं असं तिला वाटत होतं. ती दणादणा त्याच्याजवळ आली अन् गदागदा हालवून तिनं त्याला उठवलं.

तो उठला. अंगाला आळोखे पिळोखे देत त्यानं आजूबाजूला पाहिलं. त्याच्या डोळ्यांतली झोंप अजून गेली नव्हती. लांब जांभई दिल्यावर त्यानं डोळ्यांवरले केंस बाजूला सारले. अन् वांकल्यासारखं करून तिथंच बाजूला तो थुंकला. वास्तविक त्यालाहि तिचा राग आला होता. त्यानं अगदीं कडवट तोंड करून तिच्याकडे पाहिलं—अन् लांब सुस्कारा सोडला.

वाकळ उचलून तो पडवींत आला. तसाच एका कोपऱ्यांत पहुडला. आतां त्याला झोंप येत नव्हती. ती काय करते आहे ह्याकडे त्याचं लक्ष होतं. येवढ सर्व असूनहि त्याला उठावंसं वाटत नव्हतं.

तिनं आवराआवर केली.

कामं लगबगीनं आटोपलीं. आतां ती चूल पेटवीत असल्याचा त्याला भास झाला. त्यानं मान वर करून पाहिलं. खरंच—ती चूल पेटवीत होती. त्याला एकदम कसली तरी आठवण झाली. तसा तो झटकन उठला. वाकळ गुंडाळून तिथंच ठेवली. अन् हातपाय धुवूं लागला.

धोतरानं हात पुसत अन् पाय जमिनीवर झटकत झटकत तो आंत आला. एव्हांना ती निघून गेली होती, पण चुलीवरल्या गजुलींत चहा आहे असं त्याला दिसलं.

चहा पिऊन तो ताजातवाना झाला. आतांपर्यंत मुकं असलेलं त्याचं तोंड गुणगुणूं लागलं. पडवींत खांबाशी टेकून त्यानं खिशांतली तंबाखूची डबी काढली. त्यांतला तंबाखू डाव्या हातावर हळूहळू सरकवितांनाच दाराशी कुणीतरी घुटमळत असल्याचा संशय त्याला आला. त्याच्या कपाळावर आंठ्या उठल्या. डोळे किलकिले करून अन् मान उंच करून तो दाराकडे पाहू लागला. मग लगेंच स्वतःशीं हंसला. तंबाखू तोंडांत टाकता-

टाकतांच तो म्हणाला–

“ कौन ? हसन भाई ? अरे, आव-आव ? फौजदार चला गया है । ”

लगेच हसनभाई आंत आले. पडवीत बराच वेळ बसून दोघांच्या गप्पा झाल्या. गंभीर चर्चा झाली. हंसणं खिदळणं झालं. आतां उन पडवींत शिरकाव करुं लागणार होतं.

“ चलो छबूभैया ! नायी त उन्ह होईन ” उन्हाकडे पहात हसन म्हणाला.

त्यावर छबिल्यानं मान हलवली. खोलीच्या दाराची कडी त्यानं लावून घेतली. अन् हसन-बरोबर तो बाहेर पडला. तसाच. अनवाणी.

दाराबाहेर पडतांच शेजारच्या जानकी-आक्काचं लंगडं कुत्र त्या दोघावर उगाचच भुंकू लागलं. पण लगेच कुत्र्याचं लक्ष दुसरी-कडे गेलं अन ते शेपटी हालवत तिकडे पळालं.

“लमच मरते माझ्याहातून एखांद्या रोजी” ...कुत्र्याकडे पुन्हा एकदा वळून पहात छबिल्या म्हणाला. यावर हसनन किंचित हंसल्यासारखं केलं.

गांवाबाहेरच्या एस. टी. च्या स्टँडपर्यंत दोघेहि अगदीं मुकाटयानं आले. साडे आठची एस. टी. निघून गेली होती. शंकरचं एकुलतं एक हॉटेल आतां अगदी ओस वाटत होत. बाहे-रच्या बांकावर एक मळकट पोरगं बुंदीच्या लाडवाचे तुकडे त्यावर सूड उगवल्यागत चावत होतं. त्या पोराकडे छबिल्याच लक्ष गेलं.

“ कितीक रोजचा असन थो लाडू ?”... छबिल्यानं हसनला हळूंच विचारलं. यावर हसननं विचारांत गढल्यासारखा चेहरा केला. हसन सागूं शकत नाहीं हें पाहून छबिल्याच्या चेहऱ्यावर विजयाची छटा उमटली. अन् अन् लगेच तो म्हणाला–

“ असन ईसक रोजचा ! ”

हसननं हें मान्य केलं. छबिल्याला आपण व्यवहारांत अत्यंत कुशल असल्याची खात्री पटली.

एव्हांना दोघेहि शंकरच्या हॉटेलांतल्या मोडक्या बांकावर विराजमान झाले होते. हसननं आंत डोकावून पाहिलं. लगेच चर्ऽऽ र्ऽऽ र् असा आवाज दोघानींहि ऐकला. तो आवाज ऐकून दोघांच्याहि मुद्रा उजळल्या. दोघांच्याहि तोंडाला पाणी सुटलं. शकर भजे तळत होता. दोघांनीहि चांगली बैठक मारल्यासारखं केलं.

“ तुमको क्या बताऊ छबूभैया ! आगा जवा मी ”......हसन आपलं पूर्वायुष्य आठवून–आठवून छबिल्याला पुन्हा एकदा ऐकवत होता. हसनच्या ह्या पाचकळ गोष्टीत छबिल्याला मात्र खूप नाविन्य वाटे. तो अगदीं लक्ष देऊन ऐकत असे. पण आतां केव्हा एकदां शंकर बाहेर येतो असें त्याला वाटत होत. हसनचा विरस होऊं नये म्हणून छबिल्या त्याला कधीं ‘ हाँ ’ ‘ हाँ ’ म्हणे तर कधी ‘ ऐसा ?’ असा निरर्थक प्रश्न विचारी. हसन मात्र तावातावानं सागत होता.

साडे नवाचा सुमार झाला. उन्ह आतां बरंच सणकायला लागलं होतं. पार्वती देश-पांड्याकड्लीं भाडी घासून, देशमुखांची बैठक सारवून परत आली होती. मास्तरीणबाई-कडची भाडी न् धुणं दोन्हीहि आटोपून झाल्याचं समाधान तिला वाटत होतं. तिथच तिनं आपली आघोळहि उरकली होती. मास्तरीणबाई म्हणजे देवमाणूस असं पार्व-तीला राहून-राहून वाटे.

तिनं कडी उघडली. तिला कसला तरी राग आला. पण तो फार काळ टिकला नाहीं. जानकीआक्काकडचं काम संपवून नामी पार्वतीकडे गप्पा करायला आली होती. पार्व-तीनं चूल पेटविली. उल्याकडे वरणासाठीं आंदण ठेवलं. अन् चुलीवर तवा मांडला. भाकरी करता करतांच ती नामीशी बोलूं लागली.

“ नामे ! मह्या भाऊ काय कमावतेव ?” पार्वती नामीच्या नवऱ्याला भाऊ मानीत असे.

“ कां बाप्पा ! शिवा पाटील मनाव न हात जोडावं. काम करून घेईन, पर छदाम नायी सुटत हाच्ची ”... नामी बोलू लागली.

“ तरी, तरी ! ”... पार्वतीनं पुन्हा प्रश्न केला.

“ देते वाट्टे चार पायल्या जवारी न धा रुपल्ले मैन्याले ”... नामीनें उत्तर दिलें.

“ कावं ! आनकी कोनी मानूस नायी लागत का पाटलाले ? ” ... पार्वतीनं दुसरा प्रश्न केला.

“ अयी माये ! त मी कां पाटलीन होवो त मले इचारतस ? ”... नामी हंसून म्हणाली

“ नायी वो ! माया भावाले मायीत असत त इचारजो मंतो ” ... पार्वती

“ अव, तो पाटील का मानूस टेवन ? चार मानसाईचं काम कान येकटया भाईच्या खून करवून घेते ”... नामीनं माहिती पुरविली.

पार्वतीचा चेहरा जरा उतरलाच. तें पाहून नामी म्हणाली.

“ काहून ? तुह्या भायीच्या साठी मंत कां ? पर काव ? इरभर कोठं जाते हा भाऊ. काम त कायी करत नाहीं बिचारा. ” नामीनं छबिल्याला आपला भाऊ समजून प्रश्न विचारला.

---

## चींड ( पान ६ वरून चालूं )

जवळ काही नसतें...उगीचच्या उगीच तो इकडे तिकडे कांहीतरी शोधण्याचा प्रयत्न करतो—वसणाराच्या सारी परिस्थिति लक्षांत येते, आणि तो कशाला, कशाला करीत उभाच रहातो. बाबू मेस्त्री पानाचें तबक पुढें करतो...एका बाजूला तें तबक फुटलें आहे. चुन्याच्या डबींत खरवडूनसुद्धां एका पाना-पुरतां चुना नसतो. कुसक्या सुपारीचें एखादें खांड असलें, तर नशीब ! येणारा शहाणा माणूस भल्या दिलानें नको, नकोच म्हणतो...

तिन्ही साजा दिसत नाहीसें होईपर्यंत बाबू मेस्त्री आपल्या शाळेंत रुकुठुकु करीत असतो. काहीतरी घडवीत असतो, कांहीतरी मोडीत असतो-जन्मभर असेच घडवून मोडून बाबू मेस्त्री कमरेंत वाकला आहे. त्याला ताठ उभें रहातांच येत नाही. आंखडलेले हात सरळ करतांना त्याला प्रयास पडतात—आतांसुद्धां दिवसभर घडवीत मोडीत बसल्या-शिवाय बाबू मेस्त्रीला जगता येणें कठीण आहे. गुळाचा चहा मिळणेंसुद्धां त्याला कठीण जातें.—

काटकुळ्या शरीराचा बाबू मेस्त्री दिव्या-वर फुंकर घालून अंथरुणावर पडतो—आणि एखाद दिवशी अचानक झोंपतेवेळी विमानाचा आवाज येतो—आवाज येतो, आणि बाबू-मेस्त्रीच्या कपाळात तिडीक उठते—या रिकाम्या माणसांना दुसरा उद्योग कसा नाहीं, याचेंच त्याला गूढ पडतें, आणि त्याला वाटतें, बघावें बघावें, आणि एकदम सरकार होऊन या साऱ्या माणसाना कामाला लावावें.

● ● ●

" मले नको इचारू. मी कायी त्याच्या साठी मनत नायी. जात असंन कोठी उरवारी कराले. दुसरी असती कानी तं तिनं टाकूनच देल्ल असतं. पण काय करू. नशीवीं पडलं.– घाजोनं घडलं. कानं याले नोकरी होती. मार सांगे मात्या दाआजीले"... शेवटीं पार्वतीच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या होत्या.

एव्हाना भाकरी झाल्या होत्या. पार्वतीनं चुलीतल्या काडया बाहेर काढून चुलीच्या तोंडाशींच विझविल्या. एक भाकर आपल्या-साठीं थाळीत घेतली. मास्तरीणबाईनं दिलेलं थोडं पिठलं त्यावर घेतलं. उरलेली एक भाकर तिनं तिथच चुलीवर उकीडवी ठेवून दिली. बाजूला पिठल्याची दगडी ठेवली अन् त्यावर वरणाची गंजूली झाकून ठेवली.

आता अकराचा सुमार झाला. हसननं अन् छबिल्यानं ताज्या भज्यांवर ताव मारून चहाची ऑर्डर मोठया ऐटींत दिली. छबि-ल्यानं आपलं बनियन चपापलं. चोर खिशांतून चिल्लर बाहेर काढली अन् एक–एक पैसा तो मोजू लागला. दोन–तीनदां मोजणं झाल्यावर त्यानं कसलातरी हिशेब करून पैसे खिशांत टाकले. हसन दूरवर कुठेंतरी, डोळे किलकिले करून पहात होता. तेवढयात शंकरनं चहा गाळला. दोघांपुढें कपबशा आपटल्या. चहा पिऊन झाल्यावर हसननं खिसा चपापायला सुरुवात केली. आपल्याजवळ बरेच पैसे आहेत असा आविर्भाव त्यानं केला. पण तेव-ढयांत छबिल्यानं चिल्लर मोजून शंकरच्या हवाली केली. हसननं सुस्कारा सोडला. त्याला सुटल्यासारखं वाटलं.

थोडावेळ थांबून दोघेहि निघाले. भडकत्या चुलीवर तवा ठेवल्यानं तो तापावा तसा रस्ता आतां तापला होता. काळयाशार सापासारखा दिसणारा डांबरी रस्ता अधिकच चकाकूं लागला होता. कुठेंकुठें डांबर वितळू लागणार होतं. वाऱ्याचं नांवहि नव्हतं. वातावरण कसं अगदी स्थिरावलं होत आणि हे दोघे मित्र झपाझप चालत होते. मधून मधून उभ्या अस-णाऱ्या झाडामुळें जरा आडोसा असल्यासारखं वाटत होतं. हसनच्या फाटक्या जोडयांच्या नाला एखाद्या घोडयाच्या पायाच्या आवाजा-सारखा आवाज काढत होत्या. छबिल्यामात्र वारंवार आपल्या पायाकडे पाही... त्याला त्यांची कींव येत होती.

ते दोघे सारखे चालत होते. आतां त्यांना तहसिलीचं गांव दुरूनच दिसत होतं. दोघां-चेहि चेहेरे उजळू पहात होते. अन् आतां शहराबाहेरची विहीर लागली.

दोघेहि जरा वेळ विहीरीलगतच्या झाडा-खालीं विसावले. शंकरच्या दुकानांत इतका वेळ थांबायला नको होतं असं त्यांना आतां वाटलं.

" लमच्या भज्याहिनं घात केला. नायी?" ...न राहवून बिल्यानं विचारलंच.

" मैंतो कैताही था तुमको ! लेकीन वो भी अच्छा ही गया ! आगा–पोटांत तं पडलं कायी "...हसन दुहेरी बोलला.

" पण माह्या अठन्नीले चाट बसलीच कानी "...छबिल्या हळहळला.

" अं ! त देवून देईन चारक आने मी !" –हसनला ताव चढला.

" तसं नायी मनत गा. एक सांगतो तुले " ...छबिल्यानं हसनचा गैरसमज मिटविला.

पोटभर गार पाणी पिऊन दोघेहि निघाले आतां ते तहसिलीच्या गांवीं आले होते.

पार्वती सारखी आढयाकडे बघत होती. पडल्या पडल्याच ती कसला तरी विचार करीत होती. किती दिवस चालणार हें? नुसतं मीं एकटीनं काम करावं. त्यानं मात्र आयतं खावं. कसं जमणार हें ? आधीं असं माहित असत तर आपण त्याच्याशी लग्नच केलं नसतं. असले विचार पुन्हा तिच्या डोक्यात येत होते. पण गेल्या दोन–तीन दिवसांत तो बदलला असल्याचं तिला जाणवलं होतं. तो विनाकारण खुशीत असतो हें तिच्या लक्षात आलं होतं. तिला कसला तरी दाट संशय येत होता. अशानं हा आहे त्याचाहि सत्यानाश करणार हें तिला कळत होतं.

आतां अडीच–तीनचा सुमार झाला होता. पार्वती उठली. तिची नजर चुलीवरल्या झांकल्य अन्नाकडे गेली. क्षणभर तिला वाटलं, –खाऊन टाकावं हे सारं पण लगेच तिला वाटल–तो भुकेजला आला तर ? त्याच्याशी पटत नसूनहि तिला त्याची फिकीर होती. बराच वेळ पार्वती तशीच बसली होती. ती कसला तरी विचार करीत होती. आता ती पुटपुटूं लागली. पुटपुटतंच तिनं दार बद केलं अन् ती बाहेर पडली. देशपाडयाकडल खूप मोठं धुणं. देशमुखांकडली मटना, दारूची भांडीं तिच्यासमोर नाचत होती. नेहमीं-सारखाच मास्तरीणबाईकडे चहा मिळणार या विचारानं ती जरा सुखावली होती.

रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या झाडा-खालीं छबिल्या बसला होता. घामाझोकळ झालेला चेहरा त्यानं दुपटयानं पुसला. बाह्या वर करून आतां तो आपल्या पिळदार दंडां-कडे कुतुहलानें पाहूं लागला. एवढे पिळदार दंड कसल्या कामीं येतात–असल्या विचारानं त्याला गंमत वाटली. समोरची कचेरी नुक-तीच सुटली होती. काळेकोट घातलेली साहेब-मंडळी भराभर बाहेर पडू लागली. छबिल्यानं ताडलं, आतां पांच वाजले होते. हळूंच त्याचा हात खिशाकडे गेला. पैसे बाहेर काढून तो मोजू लागला. पण त्याचा चेहेरा उजळला नाही. पैसा बघून तो सुखावला नाही. काल–परवापेक्षां त्याला जरा कमी मिळालं होत थोडावेळ बसून तो निघाला. पुन्हा थोडं बहुत मिळेल असं त्याला पाटलं, बाजाराकडे, एस. टी. च्या स्टँडवरून, मोठ-मोठया दुकानओळीतून त्यानं दोन दोनदां पायपीट केली. तरीहि आज काही जमलं नाहीं. आजचा दिवसच वाईट असं त्याला वाटल. पुन्हा तो ठरल्या जागीं आला. जरा वेळ विसावला. आतां त्याला पोटाची जाणीव झाली. त्याला सडकून भूक लागली होती, समोरच्या रामलालच्या हॉटेलकडे त्याचें पाय वळू लागले. पण लगेच त्याला हसनची आठवण झाली. हसन अजून आला नव्हता. त्याचं काम बहुधां संपलं नसावं, त्यानं बराच वेळ वाट पाहिली. शेवटी शहरातल्या रस्त्या-वरले दिवे लागले. बराच वेळ छबिल्या नुसता झाडाखालीं कलडला होता, तो कसला तरी विचार करीत होता. आता दिव्याच्या अंधु-कशा प्रकाशांत दूरवर हसन घाईघाईन येतांना त्याला दिसला. त्याला जरा बरं वाटलं.

हसन डोलत डोलत येत होता. आतां त्याचं गुणगुणण छबिल्याला ऐकू येऊं लागलं. तो समजला– हसन खुशीत आहे. त्यानं आज खूप कमाविलेल असणार.

हसन आल्यावर थोडा वेळ दोघानीं गप्पा केल्या. रस्त्यावरल्या दिव्याखाली, हसननं छबिल्याची मिळकत पुढें वाढणारच असं भाकीत केलं. दोघांनीहि आपआपले पैसे पुन्हा मोजले. सर्व कांही ठाकठीक झाल्यावर दोघेहि शामलालच्या खाणावळींत गेले. भाजी पुरीचं जेवण रमत–गमत झालं. जेवतांना कुणी बोललं नाहीं. हसननंच दोघांचेहि पैसे मोठया ऐटीनं दिले. मग दोघेहि बाहेर पडूं लागले. धुरकटलेल्या भिंतीवर टांगलेल्या घडयाळानं

आठचे ठोके दिल्याचे छबिल्यानें मोजले. मग ते लगबगीनं चालू लागले.

" हसन भाई. धंद्यापान्याचं मागच जमतं त कायले अबोला होत होता घरांत. मानूस चांगला रायला असता त कायले असा काय भेंत होता ? "... छबिल्यानं हळहळंत विचारलं.

' हां ! वोईतो कैताहूं ! आगा, बरं झालं मायासारखा मानूस भेटला तुले.......' असं म्हणून हसन पोटभर हंसला.

"काय हासता भाई! हे धंद्यापान्याच आमच्या घरीं फौजदाराले समजाचं रायलं ते भल्ले वाट्टे. अहो ! नामीले समजलं त काय या घामाची किंमत रायली. घामवी गाया, शिव्याबी खा – न आखीन बोलू बी नका "– छबिल्या म्हणाला

" मैं कैसा भूलूंगा छब्रू भैया ! आगा पाय दो–चार दिसांत करतो त्याची सोय. नामीले समजलं का समजलंच अख्या गावाले समजाव. आतां तिचा मालक गोपाळा भेटनं तव्हाच कानी–" हसन उत्तरला.

अशा गप्पा करीत दोघेहि चालले होते. छबिल्याचं समाधान झालं होतं. आतां कुणी फारसं बोलत नव्हतं. भयाण शांतता पसरली होती. मधूनच आरडाओरड करणारे रातकिडे अन् हसनच्या जोड्याची नालच काय ती वाजत होती. त्या शांत वातावरणांत हाच आवाज विद्रूपपणें घुमत होता.

बराच वेळ दोघेहि चालत होते. शंकरचं हॉटेल त्या काळोखांत होतं की नव्हतं असं झालं होतं. हॉटेल बंद करून अंगणांतच तो झोंपी गेला होता. एक मिणमिणता कंदील त्यांन खाटेखालीं ठेवला होता इतकंच.

संध्याकाळचीं सारीं कामं आटोपून पार्वती घरीं आलीं होतीं. घरातं कोणी नाही हें पाहून तिला आश्चर्य वाटलं होतं. फुटक्या पायलीचा कंदील लावून भिंतीवर अडकवून ठेवला होता. तिला राग आला होता. भूक लागली होती. हात पाय धुवून नंतर तिनं आपलं जेवणहि आटोपलं होतं.

जेवण रात होऊन बराच वेळ झाला होता. तरी हा अजून परत कसा आला नाहीं ? अन् गेल्या एक–दोन दिवसांत हा जेवतो तरी कुठं? या सर्व विचारानं ती भांबावून गेली होती. हा अबोला कांहीं चांगला नव्हे याची तिला पुन्हा एकदां जाणीव झाली. अशानं तो व्यसनी लागेल अशी तिला भीति वाटली. बराच वेळ असा विचार करून तिनं आपलं अंथरूण घातलं. अन् ती पहुडली. तिचा डोळा लागत नव्हता. कांहींतरी अशुभ होणार असं उगाचच तिला वाटत होतं. एवढ्यांत बाहेर कांहीतरी वाजलं. कुत्र्यासारखं कुत्रं असून एरवीं रात्रीं ढाराढूर झोंपणारं जानकीआक्काचं लंगडं कुत्रं एक–दोनदा भुंकलं. तिनं ओळखलं. तो आला होता.

छबिल्या दाराशी आला. त्या भयाण अंधारांत तो चांचपडत घरांत शिरूं लागला. येवढ्यांत त्याचा पाय वांकडातिकडा पडला, अन् लचकला. छबिल्या धाडकन घराच्या दारावर आपटला. पण लगेच त्यानं स्वतःला सांवरलं. लचकलेला पाय आडवातिडवा फिरवला. झटकला. अन् जरा बरं वाटल्यावर तो घरांत आला.

त्याचं हें अचानक पडणं पार्वतीनं पाहिलं होतं.वेड्यासारखे वांकडे–तिकडे पाय फेकणंहि तिच्या नजरेतून सुटलं नव्हतं. ती समजायचें तें समजली.पूर्वी कधींच तो असा झोकल्यागत आला नव्हता. तिची खात्री झाली– तो चांगलाच पिऊन आला असावा.

छबिल्या कंदिलाजवळ गेला. त्याची वात त्यानं जरा मोठी केली. पडवीभर उजेड झाला. त्यानं अंगांतलं शर्ट काढलं. पडवींतल्या खुंटीवर टांगलं. शर्ट काढतांना बनियनच्या चोरखिशांतली घाम गाळून मिळवलेली मिळकत खिदळली...जोरानं खिदळली.

त्या शांत अन् संशयी वातावरणांत पैशयांचा आवाज विद्रूपपणें घुमून पार्वतीच्या कानांत तापलेल्या सळीसारखा घुसला. तिचे सारे वेत करपले. तिनं पक्क हेरलं. तिची खात्री झाली. तो आज खेळलाहि असेल.

अजूनहि थंड वारा सुटला नव्हता. अजूनहि चांगल उकडत होतं. तरीहि पार्वतीनं डोक्यावरून पांघरूण घेतलं. आतांपर्यंत आवरलेले आसू आवरता आवरेनात. बळजबरीन ते बाहेर आले. पार्वती मुसमुसून रडत होती. चोरून रडत होती. गुपचुप रडत होती. ती सारखी रडत होती. किती वेळ तिलाच एक ठाऊक !

●●●




## समाज प्रबोधन संस्था

१२४२, सदाशिव पेठ, पुणें २.

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आजचा महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अ[illegible]वर [illegible]जय : उषा मोहनी | २.६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : ( सं. निबंध ) | २·०० |

## पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

नकली वैद्यांपासून सावध राहावें.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन ( माणू. )
मु. पो. मंगरूळपीर. जि. अकोला ( महाराष्ट्र. )




## चव

**श्री**

तुझ्या दिव्यतेची चाखिली संगत
झालों अन् तृषार्थ
आयुष्यांत

शोधी करूनिया शब्दांची ओंजळ
तुझें प्रीतजळ
ठायीं ठायीं

शब्दांची ओंजळ राहिली कोरडी
केलीस उघडी
लाज माझी

संपलीसे माझी आदळ आपट
आणि पायपीट
आतां पुढें

माझ्याच अश्रूंनीं भिजवून ओठ
आळवितो गीत
मौनांतुन

अळणी आयुष्या तेवढीच चव
उरे, देवधेव
बाकी व्यर्थ!

## मुक्तक

**मधुकर केचे**

आंतल्या आंतलं बोलण्याआधीं
ठेवतेस माझ्या ओठांवर हात
तेव्हांच खरें तजावतात शब्द
नागासारखी टाकून कात
जादुगरणी !

उलटेल तुझी विद्या
माझा अडला जोम
घालील तुला विळखा
शब्दांना रोधण्यांतला
सांभाळ हा धोका

## भोंवळ

**ज्ञानेश्वर शंभरकर**

अशी वांकली मनाच्या
तीरावर डहाळी
आणि पडली जराशी
उन्हावर सांवली

तशी आली वेदनेला
अनोखी रे, भोंवळ
उमटलें पाण्यावर
अंतरंग कोमळ

अतां वळतां वळतां
गंधावली पुळण
लोभावले राईंतूनि
मुग्ध पाखरांचे वण........

अेका वाघिणीची प्रणयकथा ... ...





# नुसतेंच ना पाहूं आम्ही !

: लेखक :
वा. वा. पाटणकर

मी तर असं म्हणेन कीं, माझ्या यौवनाची चाहूल माझ्या अगोदर त्यांनाच लागली होती. आम्हां हिंस्त्र श्वापदांत विरहावस्थेंत एकाकी फार काळ रहावें लागत नाहीं. यदृच्छेनें वेळेवर जो कोणी सोबती दृष्टीस पडेल, त्याच्याच गळयांत आम्ही स्वेच्छेनें माळ घालतों. खरें सांगावयाचें तर तो सोबती आम्हांला तशी माळ घालावयास केवळ आपल्या बलानें भाग पाडतो. प्रणय हा मानवानें करावा. आम्हां हिंस्त्र पशूंत ही एक फजूल आणि लज्जास्पद गोष्ट मानली जाते. साऱ्या जंगलाचा राजा जो वाघ, तो आपल्या प्रेयसीसमोर गुडघे टेकून याचना करीत आहे हें दृश्यच किती हास्यास्पद आहे ! मी खरं सांगूं कां, प्रणय हा ज्या प्रमाणांत उच्च संस्कृतीचा निदर्शक आहे त्याच प्रमाणांत तो पौरुषहीनतेचाहि आहे; असं मी म्हणेन. ज्या पुरुषाच्या नजरेंत प्रेयसीला एकदम जिंकण्याची जरब नाहीं तो पुरुषच कसचा ? आणि दुसरी गोष्ट म्हणजे असे पौरुषहीन पुरुषच आमच्यांत मुळीं जन्मत नाहींत. आमच्यांतल्या स्त्रियाहि प्रणयाराधनेपेक्षां या पौरुषाचा जास्ती सन्मान करतात. पैसा आणि परिस्थिति ह्या मूर्ख कल्पनांचा आम्हांला संपर्कच नसल्यामुळें आमच्यापुढें वैवाहिक जीवनाच्या समस्या कधींच उत्पन्न झाल्या नाहींत.

खरं सांगायचं म्हणजे कौटुंबिक जीवनाची आमच्यांत प्रथा नाहीं. माझा बाप याच जंगलांत अजून जिवंत आहे. पण मीं त्याला कधींच पहिलें नाहीं. ज्या अर्थी मी जन्मले त्याअर्थी मला बाप असला पाहिजे असा माझा तर्क आहे. मला माझी आई आठवते, भाऊ आठवतो. पण हे दोघेहि आज कोठें आहेत हें मला माहीत नाहीं. तेहि याच जंगलांत आहेत. कधींकाळीं दिसताताहि. पण आम्हीं एकमेकांना कधीं हांकहि मारली नाहीं. अगदीं लहानपणीं आईच्याबरोबर मी माझ्या भावाला घेऊन शिकारीला जात असे. आईनें केलेली शिकार पुरेशी असल्यास ती आम्हांलाहि त्याचा वांटा देत होती. तो वांटा देण्यांत मातृवात्सल्यापेक्षां पुरेशी शिकार आहे हा आईचा विश्वासच आम्हांस जास्ती जाणवत होता. तिला कमी पडूं लागल्यास ती आम्हांला चपराका देण्यास मागेंपुढें पहात नसे. बाप तर आम्हीं बघितलाच नाहीं. आणि आईचं वात्सल्य हें या प्रकारचें. असें आमचें लहानपण गेलें. तरीपण आईच्या सहवासांत इतर श्वापदांपासून आम्ही सुरक्षित होतों याची आम्हांला खात्री होती. आणि म्हणूनच वात्सल्यहीन मातेबरोबर रहाणें आम्हांला जरूर होतें. तुमच्या एकेक गोष्टी ऐकल्या कीं नवलच वाटतें. तुमच्यांत आई तुमच्यावर प्रेम करते. तुम्ही तिला देव मानतां आणि तुमच्यांत आईवरची 'आई म्हणोनी कोणी' ही कविता तर खूपच गाजली आहे, असें ऐकते. माझा तर यावर मुळींच विश्वास नाहीं. असें सांगतात कीं, कवी अवास्तव अशा कांहीं काल्पनिक सृष्टींत रहातात; मला हेंच जास्त खरं वाटतं.

त्या दिवसाची मला नक्की आठवण आहे. तसं कांहींच कारण घडलं नव्हतं. एका मोठ्या वृक्षाच्या थंड छायेंत दुपारच्या वेळीं मी, माझी आई आणि भाऊ नित्याप्रमाणें स्वस्थ बसलों होतों. एकाएकीं आईनें माझ्याकडें बघून गर्जना केली. एखाद्या माणसावर हल्ला करण्याअगोदर त्याला भिवविण्या-

करितां जशी ती गर्जना करीत असे, अगदीं तशीच. मी भिऊन मागें सरलें. आई तशीच माझ्या भावाकडे बघून गर्जना करूं लागली. तोहि भिऊन मार्गे सरला. आम्हांला कांहीच कळेना. तिच्याजवळ जाण्याची तर आम्हांला हिंमतच उरली नाहीं. आज तिचा अवतार इतका भयंकर होता की, आम्हांला तिच्या सहवासांत जिवाचा धोका आहे असें नक्की वाटूं लागलें. माझ्या भावाच्या लक्षांत ही गोष्ट अगोदर आली. तो निमूटपणें तेथून उठून दूर जगलात निघून गेला. तो फिरून कधीं दिसला नाही. मीहि तशीच निघून गेलें त्या दिवसापासून आमची अजूनपर्यंत भेट नाहीं.

येथून माझ्या एकाकी जीवनाला सुरुवात झाली. प्रत्यक्ष मातेनें इतक्या क्रूरतेनें आम्हांला दूर करावें ही घटना चमत्कारिक आहे हें मीहि मानतें पण स्वत:च्या पायावर उभें रहाण्याचें सामर्थ्य एकदां मुळांत आलें कीं त्याचे फाजील लाड न करण्याचा आमच्यात मुळी नियमच आहे. ज्या दिवशीं आम्ही असे विभक्त झालों, त्या दिवशीं आमच्यातील हें सामर्थ्य आईला पूर्ण कळलें होतें. आवश्यकतेपेक्षा जास्ती दिवस एकत्र रहाण्याची आम्हाला सवय नाही आणि याचाच परिणाम म्हणजे तुमच्यासारख्या कौटुंबिक कटकटीना आम्हांला कधीच तोंड द्यावें लागत नाही. तुम्ही काही म्हणा, पण पिता, पुत्र, पत्नी वगैरे संबंधांच्या कल्पना मानवानें केवळ आपलें श्रेष्ठत्व दाखविण्याकरितां निर्माण केल्या आहेत असें आमचें मत आहे आणि मानवी जीवनांत जेव्हां या कल्पनांचा बोजवारा उडालेला आम्ही बघतों, तेव्हां आमच्या विधानाचें सत्य उघडकीस येतें. मानव मात्र असले अनुभव पदोपदीं येत असतांना काही शिकेल असे दिसत नाही. आणि त्यानेहि आम्हा पशूपासून हें सत्य कसें शिकावयाचे ?

माझें एकाकी जीवनहि अगदीं आनंदात जाऊं लागलें. एकाकी जीवनाचा कंटाळा येणे तर राहोच पण मला तें दिवसेदिवस अतिशय प्रिय वाटू लागलें. स्वजातीयांपैकी कोणाचेंहि दर्शन न घडो असेंच मला वाटे. त्या जगलांतील एक अतिशय निवांत जागा मीं माझ्याकरितां शोधली. दुपारभर तेथें राहून सूर्यास्ताच्या सुमारास मी माझें भक्ष्य शोधण्यासाठीं हिंडत असे. कित्येक दिवस उपास पडत पण मला त्याचें कांहींच वाटत नव्हतें. आम्हां हिंस्र श्वापदांत उपास घडतात हें खरें, पण उपासमारीनें मरण्याचा प्रसंग मात्र कोणावर अजून आलेला नाहीं. जंगलाचा जो भाग मीं माझ्याकरितां शोधला होता, त्या भागांत माझ्या व्यतिरिक्त कोणतेंहि हिंस्र श्वापद नव्हतें. चुकूनसुद्धां दुसरा कोणताहि वाघ तिकडे दिसला नाही. त्यानें तरी तिथें येण्याचें काय प्रयोजन ? त्यालाहि स्वत:चा असा स्वतत्र भूभाग होताच. त्याच्या जंगलांत मीहि गेलें नाही. पण एकमेकाच्या अस्तित्वाची एकमेकांला पूर्ण कल्पना होती. इतकेंच नव्हें तर, एकमेकाच्या बलाबलाचीहि नीट कल्पना होती. माझ्याजवळच्या जगलांत आणखीहि एक वाघ होता. कधीं काळी तो माझ्या दृष्टीस पडे. पण क्षणांत मला पाहून तो अदृष्य होई. माझ्या मानानें कदाचित् तो निर्बल असावा. माझ्या हाती सापडल्यास मी त्याचा फन्ना करेन याची त्याला जाणीव असावी. आम्हीं वाघ फक्त इतर श्वापदाचेंच काळ असतो असें नव्हें, तर एकमेकाचेहि काळच असतो. अगदीं नैसर्गिक गरजेशिवाय जर आमची एकमेकांची भेट झाली तर जसें भक्ष्यावर आम्ही तुटून पडूं तसें एकमेकावर हल्ला करूं. यात कोण विजयी होईल याचा नेम नसतो. आमचें द्वंद्व-युद्ध बलाबलापेक्षां डावपेंच आणि चापल्य यावरच जास्त अवलंबून असतें. स्त्रियांनीहि पुरुषावर विजय मिळविल्याची अनेक उदाहरणें आहेत. पण एकदरींत विजयाच्या अनिश्चिततेमुळें आम्हां वाघांत द्वंद्व-युद्धें बहुधा होत नाहींत.

आज मला विलक्षण हुरहुर वाटत होती. माझ्या एकाकीपणाचा मला आज एकदमच खूप कंटाळा आला. आज मला कुणाच्यातरी सहवासाची अत्यत ओढ लागून राहिली होती. आजपर्यंत स्वजातीयाचा तिरस्कार करणारी मी; पण आज मला स्वजातीयांपैकीं कुणीतरी हवासा वाटू लागला होता. मी अत्यंत अस्वस्थ झालें होतें. माझ्या आसमतात वस्तीस असलेल्या दोन वाघांपैकीं एकतरी आज माझ्या दृष्टीस पडेल या आशेनें मी धांवतच सर्व जंगल शोधू लागले. माझी कधीतरी अशी अवस्था होईल याची त्या दोन्ही वाघांना पूर्णपणें कल्पना होती. आणि म्हणूनच ते जरी प्रत्यक्ष मला कधीं भेटले नाहीत तरीपण माझ्याकडे ते बारीक लक्ष ठेवीत असत, याची मला जाणीव झाल्याखेरीज रहात नसे, मी जें प्रथमच बोलले कीं, माझ्या यौवनाची जाणीव माझ्या अगोदर त्यानाच झाली; हें अगदी सत्य होतें. ह्याच दिवसाची आणि माझ्या याच अस्वस्थतेची ते दोघेहि वाट पहात होते. माझं दुर्दैव हें की, ते दोघे होते. त्या दोघांनाहि मी हवी होते. अशा परिस्थितीत माझें भवितव्य अत्यंत अनिश्चित होतें. दोघांपैकी कोणीतरी एक दुसऱ्याला मारून टाकील हें जितकें संभवनीय होतें, तितकेंच द्वंद्व-युद्धात ते गतप्राण होण्याचाहि संभव होता निदान दोघेहि अतिशय घायाळ होऊन मृतप्राय होऊन पडणें अगदींच असंभवनीय नव्हतें. एका वाघिणीकरितां दोन वाघांचे द्वंद्व-युद्ध होणें ही घटना फार क्वचित् घडून येते. पण जेव्हां कधीं असें होतें, तेव्हां वाघिणीच्या प्रणयाचा अत्यंत दु:खद असाच शेवट होतो.

मीं एक-दोनदां मोठ्यानें गर्जना केली. प्रणयविव्हल वाघिणीची ती एक आर्त हांक होती आम्ही वाघ सहसा जंगलांत ओरडत नाहीं. आमच्या अस्तित्वाची आम्हांला कोणालाच कल्पना येऊं द्यायची नसते. आम्हीं ओरडून कसें चालेल ? आमच्या वाऱ्याला तरी इतर श्वापदें रहातील कां ? जंगलांत कधीकाळी वाघाची गर्जना आपल्याला ऐकूं आली तर ती ती एक प्रणयार्द्र वाघाची किंवा वाघिणीची हाक आहे असें खुशाल समजावें. या काळांत मात्र आम्ही तहानभूक विसरून गेलेलों असतों आणि सहचर किंवा सहचरी याच्या शोधांत आम्ही बेभान हिंडत असतो. पिंजऱ्यांत ठेवलेले वाघ आपल्या भुकेच्या वेळी ओरडतात यावरून वाघ आपल्या लहरीप्रमाणें वाटेल तेव्हां जंगलांत ओरडतो ही माणसाची समजूत चुकीची आहे. आपल्या ओरडण्याचे काय परिणाम होतील याचा विचार पिंजऱ्यातील वाघांना करावयाचा नसतो. त्यामुळें त्यांच्या वर्तनाशी आमचें साम्य असतें असें मुळीच नव्हे. वाघ हा प्रणयाच्या कालात गर्जना करील किंवा माणसावर हल्ला चढवितांना गर्जना करील. इतर कोणत्याहि प्रसगीं त्याची डरकाळी तुम्हाला ऐकू येणार नाहीं.

माझ्या दुरुप्राय आरोळीला मला गंभीर गर्जनेचा प्रतिसाद मिळाला. माझ्या आनदाला सीमा उरली नाहीं. प्रतिसादाबरोबरच एक आकृति दबदबत पण झपाट्यानें माझ्याकडे येतांना दिसली. मला आश्चर्य वाटलें. मला

पाहून नेहमीं पळून जाणाऱ्या वाघाची स्वारी आज माझ्याकडे मोठ्या आत्मविश्वासानें येत होती. तो शरीरयष्टीनें माझ्यापेक्षां फार मोठा नव्हता; थोडा लहानसरच म्हटला तरी चालेल. माझ्या गर्जनेतील आर्तता त्यानें ओळखलेली होती. आणि त्या गर्जनेवरूनच मी आतां एक हिंसक वाघीण राहिले नसून, एक प्रणयव्याकूल विरहिणी आहे हें त्यानें नक्की ताडलें असावें. तो अत्यत चपल आणि चलाख होता. त्याच्या चालण्यांत पौरुषाची ऐट होती. तो माझ्यापासून थोड्या दूर अंतरावर येऊन उभा राहिला. आणि निश्चलपणें माझ्याकडे बघू लागला. त्याच्या डोळ्यांत एक विलक्षण धुंदी होती. एखाद्या श्वापदावर अचानक हल्ला करण्याच्या अगोदर आम्ही जो पवित्रा घेतों, त्या पवित्र्यांत तो अंग चोरून उभा होता. त्याच्या दृष्टींत मला एक प्रकारचा त्वेष दिसला. मीच आज त्याच्या नुसत्या नजरेस घाबरले. त्याच्या नजरेंतच एवढी जरब होती कीं, निमूटपणे आत्मसमर्पणाची तयारी दाखविल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्याच्या इच्छापूर्तीत यत्किंचितहि व्यत्यय निर्माण केल्यास त्याच्या हातून माझें मरण निश्चित ओढवणार होतें. आम्हांला तुमच्यासारखे पुरुषाशीं खेळ करायला अवसरहि नसतो व हिंमतहि नसते. पुरुष एकतर आमच्याकडे कधी बघणारहि नाहीं आणि जर बघितलें तर कधीहि निराशा पत्करणार नाहीं. या बाबतींत आपल्या प्राणाची बाजी लावायला तो नेहमीच तयार असतो. प्रणयविव्हलता व प्रणयपूर्ति यामध्यें एक अनुनयाची पायरी असते असे आमचे पुरुष कधीच मानीत नाहीत. या प्रणयाचें वर्णन करणारा, नवीनच छापलेल्या 'मराठी शायरी' या पुस्तकांतला एक शेर मला आठवतो.-

" इतुकें खरें, कोणाकडे ना पाहूं आम्ही.
हेंहि खरें, कोणाकडे नुसतेंच ना पाहूं आम्ही. "

वाघाच्या प्रणयांतील या धुंदीचा आरोप मानवाच्या प्रणयावर केलेला पाहून मला वाईट वाटतें. वाघाच्या प्रणयाची ऐट शायरानें चोरल्याबद्दल मला राग येणें स्वाभाविक आहे. मलाहि मानवाच्या प्रणयातील दीन अवस्थेवर शेर करतां येणार नाही असें नव्हे.

"लाऊनी आशेंत डोळे सर्वांकडे पाहूं आम्ही
हात ना लावूं कुणा, नुसतेंच पण पाहूं आम्हीं"

वाघाची नजर माझ्यावर सारखी खिळली होती. माझ्या काळजानें अगदीं पाणी झालें. आनंद आणि भीति यांचें एक मनोहर समीश्रण झालें होतें. मला मूर्च्छा आल्यासारखी वाटली आणि मी धाडकन जमिनीवर पडलें. आणि गडबडा लोळू लागलें. पूर्ण आत्मसमर्पणाची ती एक खूण आहे. मी माझे डोळे घट्ट मिटून घेतले होते. पण इतक्यात दुसऱ्या बाजूने आणखी एक भीषण गर्जना ऐकू आली. मी चट्कन सावरून बसलें. पहाते तों दुसऱ्या बाजूनें एक प्रचड वाघ तसाच धांवत माझ्याकडे येताना मी पाहिला. जवळ आलेल्या वाघानेहि त्याला बघितलें. आणि तो जरा मागें दबला. नवीन आलेला वाघ हा वयानें बराच मोठा आणि धिप्पाड होता. माझ्याकडे बघण्याच्या ऐवजीं तो दबलेल्या वाघाकडे टक लावून बघत होता. त्याला घाबरविण्याकरितां मधून मधून तो मोठ्यानें गर्जना करीत होता. त्याच्या गर्जनेंला पहिल्या वाघाकडून तितकेंच जोराचें उत्तर येई. क्षणार्धांत तें जंगल वाघाच्या गर्जनांनी दुमदुमून गेलें. पण द्वंद्व-युद्धांत पहिल्या वाघाचा पराजय स्पष्टपणें दिसत होता. पण युद्ध करावे कां नाहीं किंवा केव्हां करावें याच विचारांत दोघेहि वाघ आहेत असे मला दिसलें. मोठा वाघ थोडासा चालून गेल्यावर लहान वाघ तितकेंच मागें पाऊल घेई. आणि हा वाघ परतल्यावर तो फिरून थोडासा पुढें येई. 'मी युद्ध करणार नाहीं पण हिला हात लावल्यास संधि साधून तुझ्या नरडीचा घोट घेतल्याशिवाय राहणार नाही.' असेच जणू तो सांगत होता. एकाच वेळेला प्रणय आणि युद्ध करणें अशक्य आहे याची दोघांनाहि खात्री होती. आणि म्हणून मनाच्या अनिश्चित अशा स्थितीत दोघेंहि एकमेकांसमोर नुसते उभे होते. प्रेक्षकाव्यतिरिक्त माझा यात काही भाग नव्हता. मी अगदीं दिङ्मूढ होऊन गेले. माझ्या आवडीनिवडीचा प्रश्नच उरला नव्हता. या दोघांपैकी विजयी होणारा वाघ मला आवडायला हवाच होता. तसा विचार केला तर विशेष निवड करण्यासारखं कोणांत काहीहि नव्हत. मी अधून मधून दोघाकडे बघत असे पण माझ्याकडे कोणीहि बघत नव्हतें. एकमेकाकडे टक लावून ते निश्चल उभे होते. हळूहळू त्यांचे एकमेकांला दरडावणेहि बंद पडलें. पुतळ्यासारखे ते निश्चल उभे होते. फक्त त्याच्या लांब शेपट्यांची जी काय हालचाल होईल तेवढीच. असाच जवळजवळ एक तास गेला. मीं या परिस्थितीत कंटाळून दूर निघून जाण्याच्या विचारांत चालूं लागले. माझ्यामागोमागच एकमेकात काहीं अंतर ठेवून हे दोन्ही वाघ माझा पाठलाग करूं लागले. प्रणय तर दूरच राहो, पण आज मला नुसतें एकटें राहण्याचीहि संधि मिळेना.

या कटकटीतून सुटण्याचा मला कोणताच मार्ग दिसेना. मी धावू लागले तर ते धावत. मी थांबले तर ते थाबत, आणि मी जर बसले तर तेहि माझ्या दोन्ही बाजूला कांही अंतरानें बसून रहात. तो दिवस गेला. संपूर्ण रात्रहि गेली. आम्हीं असेच एकत्र नुसते बसून होतों. शिकार तर करणे शक्यच नव्हतें. जवळच्या ओढ्यावर सूर्यास्ताच्या सुमाराला जें काय आम्ही पाणी पिऊन आलों तेवढेंच ! अधूनमधून त्यापैकी एखादा अत्यत बेचैन होऊन माझ्याजवळ येण्याचा प्रयत्न करी. त्याबरोबर दुसरा त्याच्यावर धांवून जाई. दुसरे दिवशी दुपारीं बारा वाजेपर्यंतचा काळ हा सगळा असाच गेला. जंगलाच्या शीवेवर एका झाडाखालीं आम्ही तिघेहि असे नुसते बसून होतों. जंगलाला लागूनच काही शेते होती. शेतांत लोकांची ये-जा सुरूच होती. पुष्कळांचें आमच्याकडे लक्षहि गेलें. त्याबरोबर खूप लांब उभे राहून ते आमच्याकडें बघू लागले. आम्ही सामान्यत: माणसांच्या दृष्टीस पडत नाही. माणसाबद्दल आम्हाला एक प्रकारची नैसर्गिक भीति वाटते. त्याला पाहून आम्ही नेहमीच पळून जातो. माणसाबद्दलच हें नैसर्गिक भय जर आमच्या मनात नसत तर पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यप्राणी कधीच जिवत राहिला नसता. या एकाच सिध्दान्ताच्या आधारावर दुर्बल मानव आमची शिकार करण्याकरिता जगलात विश्वासाने हिंडत असतो. त्याला ठाऊक असते की, सहजासहजी हल्ला करणें तर दूरच राहो. पण कोणताहि वाघ आपल्याला बघितल्यावर पळून गेल्याशिवाय रहाणार नाही. शिकाऱ्याच्या याच विश्वासाला सामान्य लोक धैर्य म्हणून समजू लागतात. पण आज माणसाच्या दर्शनाने आमच्यात काहीच चलबिचल झाली नाही. आम्हीं तिघेंहि आज अगदीं निराळ्या मन:स्थितीत होतों " कामातुराणा न भयं न लज्जा " हें वचन किती सत्य आहे याचा आज आम्ही प्रत्यय घेत होतो. आणि यातूनच आमच्या दुर्दैवाला प्रारंभ होणार होता.

माझ्या उजव्या बाजूला अदाजें तीस

याडीच्या अंतरावर मोठा वाघ बसून होता. माझ्या मागच्या पायाकडे माझ्यापासून साधारण तितक्याच अंतरावर दुसरा वाघ बसून होता. ते एकमेकांकडे डोळे लावून बसले होते. आजूबाजूला वळून पाहाण्याचें त्यांच्या मनांत आलें नाहीं. मी मात्र चौफेर नजर टाकावयास मोकळी होते. शेतांतलीं माणसें आमच्यापासून खूप अंतरावर होती. त्यापैकी दोघे हळू हळू शेताच्या बांधीकडे येताना मीं बघितले. शेतात उभीं असलेली माणमें आणि आम्ही असलेली जागा याच्यामध्यें ती शेताची बांध होती. मनुष्याच्या कमरेइतकी ती उंच असावी. बांधीकडे येणारी माणसें बांधीच्या आड लपून बसली असावीत. त्याचें निरीक्षण करण्याच्या मन:स्थितीत मीहि नव्हते. इतक्यात बंदुकीचा एक मोठा आवाज ऐकू आला. आणि त्या आवाजाबरोबरच कपाळात गोळी लागून तो मोठा वाघ, एकदम निपचित जमिनीवर निजला. आवाजाबरोबर घाबरून मी एकदम उभी राहिले. दुसरा वाघहि चमकून उभा राहिला. मी तेथून चट्‌कन जवळच्या झुडूपाआड उडी घेतली. माझ्यापाठोपाठ तो वाघहि उडी घेईल अशी माझी अपेक्षा होती. मी वळून पहाते तों मागें राहिलेल्या वाघानें जमिनीवर कोसळलेल्या वाघावरच उडी घेतली होती. आणि आपल्या जबड्यांत त्याचें नरडें धरून ठेवलें होतें. आपल्या शत्रूचा आपल्याच हातानें खातमा करून स्वत:चा मार्ग निष्कंटक करण्याची संधि तो सोडणार नव्हता. आपल्या प्रणयाच्या आड येणाऱ्याचा कांटा दूर केल्याचें समाधान त्याला लाभतें न लाभतें तोंच, बंदुकीचे एकामागून एक दोन आवाज ऐकू आले. एका गोळीने त्याच्या मस्तकाचा वेध घेतला होता. तर दुसरीनें त्याच्या काळजाचा. पहिल्या वाघाचे नरडें तसेंच तोंडांत धरून हा दुसरा वाघहि कोसळून खाली पडला. बांधीच्या आड लपलेले दोन शिकारी बांधीवर चढून उभे राहिले. शेतांत दूर उभें असलेल्या लोकाना त्यांनी हांका मारल्या. ती सर्व मंडळी हळू हळू पण मोठ्याने आरडाओरडा करीत वाघांना उचलण्याकरितां तेथें आलीं. मी अर्थातच त्या झुडुपासून खूप लांब निघून गेले. या प्रणयी वीराचा असा दुःखद अंत पहाण्याचें माझ्या नशिबीं होतें. माझ्या संभाव्य प्रियकराच्या निधनाबद्दल मला वाईट तर वाटलेच पण एका गोष्टीचें मला राहून राहून खूपच वाईट वाटतें. ही शिकार एका शायरानें केली. इष्क, दर्द, विरह असल्या कोमल भावनाचें सौंदर्य समजणाऱ्या एका शायरानें अशा प्रणयविव्हल वाघांच्या प्रणयाचा असा शेवट करावा हें मला अजूनहि नीटसें पटत नाहीं. !

●●●

## वाचकांस कांहीं प्रश्न

(वरील कथा वाचून वाचकांपैकीं कोणी शिकारी अथवा पशूजीवनाचे अभ्यासू असतील त्यांसाठीं लेखकानें खालील दोन प्रश्न विचारले आहेत. वाचकांनी उत्तरें पाठवावींत. योग्य उत्तरास प्रसिद्धी देण्यांत येईल.

(१) वीवट (बिबळ्या) वाघास कधीं आपण सहकुटुंब सहपरिवार पाहिलें आहे कां ?

२) वरील कथेंतील, ज्या वाघास दोन गोळ्या मारल्या. त्यांतील कोणती गोळी त्याला प्रथम लागली असेल ? डोक्यावरची का काळजावरची ? कोणतीहि एक गोळी प्रथम लागली असें म्हणावयास कथेंत कोणता पुरावा आहे ?

●●●




# गजान्तलक्ष्मी

'माणूस'चा पहिला दिवाळी अंक मुखपृष्ठाच्या वैशिष्ट्यापासून गाजला.

# महाराष्ट्रलक्ष्मी

हें यंदाच्या दिवाळी अंकाचें तितकेंच औचित्यपूर्ण व वास्तवतेचा स्पर्श असणारें मुखपृष्ठ चित्रकार दलाल 'माणूस' च्या वाचकांना सादर करीत आहेत.



# योगायोग

: लेखक :

दत्ता वालधूरकर

मानवी जीवनांत कांहींकांहीं वेळा अशा कांहीं अकल्पित, अनपेक्षित, अतर्क्य गोष्टी घडतात कीं त्यांची कारणमीमांसा सर्व-साधारण मनुष्य करूंच शकत नाहीं. ज्या व्यक्तीच्या जीवनांत असले प्रसंग येतात ती व्यक्ति मात्र अशा प्रसंगीं अगदीं गडबडून जाते एवढंच कशाला ? माझेंच उदाहरण घ्या ना ! मला तरी वाटलं कां कीं, मी या प्रसंगांतून जाईन ! अगदीं अनपेक्षित होतं तें सारं ! त्याचं असं झालं—

पण काय तें सांगण्यापूर्वीं मी कोण आहे ते सांगतों. मी साधा हायस्कूलशिक्षक आहे. अन् पेशा आवडीनं पत्करला म्हणून समाधानी आहे.

नेहमींप्रमाणें दिवस मजेंत जात होते सारं कसं अगदीं सुरळीत चाललं होतं. पण अक-स्मात् तो दिवस उजाडला व माझ्या जीवनांत प्रचंड खळबळ उडून गेली. मला वाटतं, तो जुलै महिना असावा. शाळा नुकत्याच सुरू झाल्या होत्या. नेहमींप्रमाणें माझा तास नववी 'अ' वर होता. मीं हजेरी घेण्यास सुरुवात केली. एकामागून एक नांवें घेतां घेतां एका नांवावर माझी नजर एकदम स्थिरावली. अशोक अपराजीत ! नांव प्रथमच दिसत होतें. मीं सर्व वर्गांत प्रश्नार्थक दृष्टीनें नजर फिरविली. मोठ्यांदा पुकारलें. 'अपराजीत'. सर्व मुलें एकमेकांकडे टकमका पाहूं लागलीं. तरीसुद्धां प्रतिसाद नाहीं, मी पुन्हा किंचित् रागीट आवाजांत पुकारलें, 'अपराजीत'. शेवटच्या कोपऱ्यावरील बांकावर थोडी चुळबूळ झाली. व पाठोपाठ एक पंधरा–सोळा वर्षांचा, किंचित् उग्रट चेहऱ्याचा सशक्त मुलगा उभा राहिला.

"आपलं लक्ष कुठं होतं ?" मी जरा नरम

आवाजांत विचारलें. त्यानें कांहींच प्रत्युत्तर दिलें नाही.

" सर ! हा कविता करत होता " शेजारच्या विद्यार्थ्यानें माहिती पुरविली.

" आपण कवि आहात ? " मीं हंसत त्याला जवळ बोलावलें व म्हटलें " बघूं तुझी कविता ! "

तो विद्यार्थी प्रथम किंचित् घाबरला. मग मात्र लाजत कवितेचा कागद लपवून ठेवायचा प्रयत्न करू लागला. मी त्याच्या हातांतील कागद काढून घेत उद्गारलों...

" अशा गोष्टी आपल्या शिक्षकाला अवश्य दाखविल्या पाहिजेत. मी अशा गोष्टींना उत्तेजनच देत असतों. " ती एक साधी कविता होती.

त्यानंतर त्या विद्यार्थ्यांची व माझी खूपच गट्टी जमली. तो आपली प्रत्येक नवीन कविता मला दाखवायचा. अभ्यासांत तो साधारणच होता. परंतु सर्व प्रकारच्या खेळांत आघाडीवर असे. स्वभावानें तर कमालीचा खोडकर. अन् म्हणूनच मला त्याच्याबद्दल विलक्षण आत्मीयता वाटूं लागली. त्याचा व आपला काहीतरी ऋणानुबंध असावा असें वाटत होतें. असेच बरेच दिवस गेल्यावर तो प्रसंग घडला.

त्या दिवशी रोजच्याप्रमाणें माझा तास " अ " वर होता. मी स्वा. सावरकराची " सागरा प्राण तळमळला " ही कविता शिकवीत होतो. माझी ती अतिशय आवडती कविता. ती शिकविताना मी अगदी सर्वस्व विसरून जात असे. संपूर्ण वर्ग अगदीं स्तब्ध होता. विद्यार्थी अगदीं तल्लीन होऊन रसग्रहण करीत होते. कवितेत प्रगट झालेल्या उत्कट भावनाचा अनुभव घेत होते. मी शिकवित होतों. विद्यार्थी ऐकत होते. इतक्यात आवाज आला..." सर ! " शेवटच्या बाकावरील एक मुलगा जोराने किंचाळला. माझी तंद्री खाड्कन् भंगली. वर्गांतील सर्व मुलेहि चिडून मागें पाहू लागलीं. मला तर फारच संताप आला. रागानें माझ्या तोंडून शब्दच फुटत नव्हता.

मी तावातावाने त्या विद्यार्थ्याजवळ गेलों.

" सर, हा अपराजीत मला मागें बसून चिमटे काढतो आहे " त्या मुलानें त्रासून तक्रार माडली. खोडी करणाऱ्याचें नाव ऐकतांच मी एकदम सर्दच झालों. मला विश्वास ठेवणे जरा जडच गेलें. त्याला उभें रहाण्यास सांगितलें. त्यानें न विचारतांच गुन्ह्याची कबुली दिली. मला त्याच्या निर्लज्जपणाची भयंकर चीड आली. रागाच्या भरांत मीं त्याच्या फाड्फाड् तोंडांत मारल्या. तो कांहीहि बोलला नाही.

अमळशानें माझा राग शांत झाल्यावर माझें मलाच वाईट वाटलें. मीं इतकी कडक शिक्षा करावयास नको होती व केलीहि नसती. परंतु अशोकबद्दल माझ्या ज्या काहीं अपेक्षा होत्या त्यांना एकदम धक्का बसला होता. थोडयाच वेळांत तास संपल्याची घंटा झाली व मी विषण्ण मनानें वर्गाबाहेर पडलों.

त्या रात्रीं माझं मन अगदीं नाराज होऊन गेलं. मला कांही सुचेना. मनांत सारखे विचार येत होते. आपण असं करायला नको होतं असं राहून राहून वाटत होतं. विचाराची अशी उलघाल चालूं असतानाच एकदम मनाच्या कप्प्यांत खोल दडलेली आठवण उसळी मारून वर आली.

मिडल्स्कूलमध्यें असतांना मीसुद्धां अगदीं व्रात्य म्हणून प्रसिद्ध होतों. शिक्षकाची गंमत करणें हें आमचं मोठं भूषण. नागपूरला होतों आम्ही तेव्हां. माझ्या काकांची बदली बालाघाटला झाली. मीसुद्धां त्यांच्याबरोबर बालाघाटला गेलों. तेथेंच एका शाळेंत आठवीच्या वर्गांत माझें नाव दाखल केलें. नवीनच आलेल्या हेडमास्तराचा आमच्या वर्गावर तास होता. तास मराठीचाच. गुरुजी अगदी तन्मय होऊन गडकऱ्याची कविता शिकवित होते. आजच्या सारखाच त्या दिवशीहि वर्ग अगदी शांत, स्तब्ध होता. माझें लक्ष मात्र खिडकीतून दिसणाऱ्या चिमणीच्या चिवचिवाटाकडे होतें. गुरुजीच्या भावपूर्ण शिकविण्याकडे माझें बिलकुल लक्षच नव्हतें.

गुरुजीनी शिकविणें थांबविलें. सर्व मुलें माझ्याकडे टकमका पाहूं लागली. मला वाटले, आतां भरलीं आपली शंभर वर्षें. अगदी घाबरून गलों, चेहरा शरमेनें अगदी रडवेला होऊन गेला. आपण असें करायला नको होते–हें मला एकदम समजले. गुरुजी माझ्याजवळ आले. माझ्या अंगाला अगदीं दरदरून घाम सुटला. मी आपण होऊनच रडक्या सुरात म्हणालों, " चुकलं सर ! पुन्हा नाहीं असं करणार ! " अन् काय आश्चर्य ! गुरुजीनी मारण्याऐवजीं मला प्रेमानें जवळ घेतले. अन् अगदी प्रेमळ आवाजात ते म्हणाले, " अरे, तुमच्या सर्वांविषयीं माझ्या केवढ्या अपेक्षा आहेत ? तुमच्याच चांगल्यासाठीं नं हें सर्व ! मग ही अशी आनंद–समाधी भंग करणं हें मोठं पाप आहे असं नाही कां वाटत ? "

मी मानेनेंच नाहीं म्हटलें. अन् डोळ्यांतल्या पाण्याला वाट करून दिली.

त्यानतर पुढील वर्षी काकांची बालाघाटहून पुन्हा बदली झाली. आणि अनेक प्रसंगांनीं मधील काळ विणला गेला. नंतर इतिहासाच्या पुनरावृत्तीसारखा आज हा प्रसंग घडला. माझ्या गुरुजींची ती रोड, वार्धक्यासमोर झुकलेली सात्विक मूर्ति माझ्या नजरेसमोर उभी राहिली. आणि आपणहि त्यांच्यासारखे वागलों असतों तर? मनाचा तोल सांभाळता आला नाहीं याचं वाईट वाटलं. याची परतफेड उद्या करू असा विचार करीत केव्हां निद्रेच्या स्वाधीन झालों तेंच कळलं नाही.

दुसरे दिवशी शाळेंत गेलों. अशोक शाळेंतच आला नव्हता. मुलाजवळ चौकशी केली. त्यांना कांहींच माहित नव्हतें. शाळा सुटल्यावर मीं तडक बोर्डिंगची वाट धरली. त्याच्या खोलीचें दार लोटलेलें होतें. मी आंत गेलों. अशोक कुठेंतरी आसपास असावा. खोलींत खुर्चीवर बसून मी आसपास नजर फिरविली अन् एका फोटोवर ती एकदम स्थिरावली. सर्दच झालों. त्या फोटोला मोगऱ्याचा सुगंधित हार वाहिलेला होता. माझ्या जीवनाला चागलें वळण ज्यांनीं लावलें त्या माझ्या परमपूज्य गुरुजीचा फोटो होता तो ! मी एकटक पहातच राहिलो.

तेवढ्यांत मागें पावलें वाजलीं. अशोक आत आला. मला पहाताच तो एकदम ओशाळला व म्हणाला...

" सर ! काल माझ्या हातून असं व्हायला नको होतं. मला क्षमा करा. " मीं त्याच्या पाठीवरून हात फिरवित म्हटले, " अशोक, काल झालं तें सर्वच विसरून जायचं आणि पुन्हा ही चूक कधीच करायची नाहीं. " माझें लक्ष फोटोवरच होतें. अशोकच्या तें लक्षात आले, " ते माझे वडिल आहेत सर ! दोन वर्षांपूर्वीच वारले. " अशोकनें धीर चेपतांच खुलासा केला. माझ्या डोळ्यात पाणी तरळलें तो दचकून म्हणाला, " सर, हें काय ? "

मी शब्दांनीं त्याला काहीच सांगू शकलों नाहीं. फक्त मी त्याला जवळ घेऊन त्याच्या मस्तकावरून हात फिरवित राहिलों.

● ● ●

## जत्रा

छोट्या मोठ्याहि माणसांची
भंवतीं भरली फक्कड जत्रा
मनुवंशांतिल तऱ्हेतऱ्हेच्या
तऱ्हेवाइकांची ही यात्रा

जो तो घाली असा मुखवटा
ज्याचा नित नव बदले रंग
भोळे डोळे त्यांना माहित
मिस्किल हंसण्याचाहि ढंग

माझें, माझें तुझेंहि माझें
'आहे विश्वचि हें माझें घर'
धुनि स्वार्थाची मनिं धगधगते
संतांचीं वचनें ओठांवर

लिलांव करूनी पुण्याईचा
संभावित साळसूद पाप
फिरते शोधित आहे कां कुणि
नवखा बुजरा आणि अपाप

असा दुपारीं, सांज सकाळीं
अवतीं भंवतीं फक्कड उरुस
इथें लाभतें फुटकळ सारें
परि लाभत नाहीं माणूस.

माधव गोविंद काटकर

## क वि ता

## देव निघालेत घरा

देव निघालेत घरा
वाद्य वाजे 'घर घरा'
फुलें उधळीते धरा

वादा पुढल्या सालाचा
देव शिरवा शिरवा
माती मातींत मिळवा

नवे वर्ष नवा देव
नवा देव नवी माती
साऱ्या मातीच्याच मूर्ती

नवें वर्ष नवा देव
देव खेळणें खेळणें
मन रंगे देवासंगे

देवा नका बोलूं, बोलूं
तोंड तुमचें केलें बंद
आम्हीं भजनांत धुंद

देवा, कंटाळला तरी
याहो पुन्हा पुढल्या सालीं
रंगो पुन्हा भातुकली

देव शिरवा शिरवा
माती मातींत मिळवा.

प्रभाकर

## भै र वी

घळघळत्या धारेची
आली घेवोनि कळसी
पाय उंबरी लागता
पडले मी तोंडघसी — १

पिवळे हळदीचे हात
त्यांच्या हातासी लागता
कसी आठवूं मी आतां!
जुन्या गोड भावगीता — २

सात पाऊलें मोजलीं
विसरूनि तुझी स्मृति
आतां आठवूनी तुला
कसी ओवाळूं आरती — ३

माझ्या सुखाला फुटली
नव्या हर्षाची पालवी
विसरूनी भावगीता
गाया बैसले भैरवी — ४

शशिकांत नागले

# दोन कथासंग्रह

समीक्षक

वि. ग. कानिटकर

### कथाकुंभ :

लेखक : स. कृ. जोशी.
प्रकाशक : लाखाणी बुक डेपो, मुंबई ४. मूल्य रुपये तीन.

" आज तीं माणसं नाहींत. आज ती मजा नाहीं. सणांत राम नाहीं. त्यावेळचीं माणसं अफाट होतीं. त्यांचा एकमेकांवर विश्वास होता. त्यांचें एकमेकांवर प्रेम होतें. " श्री. जोशी यांनीं आपल्या ' माणसं बदललीं, काळ पालटला,' या कथेंत हा विचार मांडला आहे. जें बदलल्यामुळें आज पहावयास मिळत नाहीं, त्या एकत्र कुटुंबपध्दतीचें ' जगावेगळया (आजच्या) सुनांचें, ' पूजाअर्चाचें, नाटकवेडाचें चित्रण श्री. जोशी आपल्या कथांतून पेरीत असतात. त्यामुळें या संग्रहांतील कथांत ढोबळ घरगुतीपणा आणि भावुकता निर्माण झालेली आहे. मात्र हें चित्रण पुरेसें सूक्ष्म नाहीं; आणि कलात्मकहि नाहीं. या जिद्दीपायीं बऱ्याच कथेंतील महत्वाचे प्रसंग कातरवेळीं घडतात. असें जरी असलें तरी श्री. जोशी यांच्या कथांत वाचनीयता हा मोठा गुण प्रत्ययास येतो. त्याचें मुख्य कारण म्हणजे कादंबरीच्या आराखड्यांचा लेखकानें कथांकरता वापर केलेला आहे. प्रसंग नाट्यपूर्ण निवडून ते श्री. जोशी एकापुढें एक सांगतात. आणि ते सांगतांना-जुन्याचा कळवळा त्यांत बेमालूम मिसळतात. त्यामुळें हें रसायन चवीचें होतें.

श्री. जोशी यांचा कथाकोनाडा सोज्वळ, सात्विक, सोंवळा असल्यामुळें त्यांतलीं दुःखें हीं कठोर नियतीनें निर्माण झालीं तरच होतात. ' नाना ' या कथेंतील बाप, मुलाच्या लग्नाच्या दिवशींच निधन पावतो. ' सिंधूची कुरुपता आतां दिसणार नाहीं. ' या कथेंतील ' सिंधू कुरुपतेपायीं स्वतःला जाळून घेते. ' तूं उद्यांचे माउली ' या कथेंतील प्रेमविवाह केलेल्या जोडप्याला मूलच होत नाहीं.

या संग्रहांतील ' ती तशी नव्हती ' ही कथा अतिशय सुंदर उतरलेली आहे. कथासंग्रहाच्या शेवटीं कांहीं वाचकांचीं जीं मतें दिलीं आहेत, त्यांत एक असें आहे— " तुमची गोष्ट वाचून मला माझ्या एका बालमित्राची आठवण होते. तोहि असाच गेला--" या मतांत श्री. जोशी यांचें यश आणि अपयश दिसून येते. या ' कुंभांत ' धुंदी देण्याचें सामर्थ्य नसलें तरी तहान भागविण्याची शक्ति आहे.

### न उलगडलेलं कोडं :

लेखक : रामचंद्र हिंगणे.
प्रकाशन : नलिनी साहित्य प्रकाशन, पुणें २. मूल्य रु. २.

दहा मनोरंजक कथांचा हा संग्रह आहे, बहुसंख्य कथेंत कथानकाचा चटकदारपणा आहे. चांगली कल्पनाशक्ति हा लेखकाचा उत्तम गुण त्यांत जाणतो. " दहा रुपये दंड भरीन " या कथेंत दंड भरण्यासाठीं दगडाखालीं रुपयाची नोट ठेवून, टवाळांना, दगड टाळक्यांत घालीन, अशी धमकी देणारा बापडा केशव दिसतो, तर प्रेम केलेल्या मुलीचं दुसऱ्याशीं लग्न ठरलं म्हणून चिडलेल्या माणसानें तिच्या नवऱ्याला पाठवलेलीं जुनीं पत्रं जाळून टाकणारा कल्पक पोस्टमन, " तें तुझं तूंच ठरव " या कथेंत भेटतो. बाळंतिणीच्या भुताचा बागुलबोवा करून खोली उपटणारे धूर्त गोपाळराव " बाळंतिणीचें भूत " या कथेंत गंमत आणतात. " न उलगडलेल्या कोड्यांत " आपल्या लग्नाची सगळी धडपड आपल्यालाच करावी लागते या दुःखानें रडणारा वसंत आपली सहानुभूती मागतो. भावाकरतां सांठवलेला पैसा संपूं नये म्हणून क्षय होतांच आत्महत्या करणारा दादा– " दादा " या कथेंत पुष्कळच प्राण भरतो. " तूं माझी बायको " "घोंगडी" आणि " विहिरीचें पाणी " या पुनर्जन्म आणि चेटूक अशा समजुतीवर बांधलेल्या कथाहि मालतीमाधवाच्या प्रेमकथा वाचून कंटाळलेल्या वाचकांना रोचक वाटतील यांत शंका नाहीं. लेखक हातांत धरलेल्या कथानकानें एवढा भारून कथा लिहितो कीं, फारसें सौष्ठव नसलेली त्याची भाषाहि वाचकांना कुठें खटकत नाहीं. उल्लेख न केलेल्या दोन कथा मात्र रटाळ आहेत.

मराठींतले बहुतेक कथाकार जीवनांतला आशय शोधण्यांत गुंतलेले असल्यामुळें श्री. हिंगणे यांच्यासारख्या कल्पक लेखकानें भरपूर लेखन करणें अगत्याचें आहे.

● ● ●




शाकाहारी । मांसाहारी

# पागलखान्यांतील साहित्य-चर्चा

जून १९६२ च्या 'माणूस' वर्षारंभ अंकांत आम्हीं 'वेडयांच्या सहवासांत काळ कंठणारे साहित्यिक डॉ. अत्तरदे' या नांवाचा प्रा. भाऊ माडवलकर याचा एक लेख प्रसिद्ध केल्याचें वाचकाना स्मरत असेलच. तो लेख वाचून अनेकांना डॉक्टर महाशयांच्या सध्यांच्या वास्तव्याविषयीं कुतुहल निर्माण झालें. कांहीं धीट वाचकानीं तर पत्र पाठवून 'पुण्याच्या जवळच येरवडा रुग्णालय आहे. संपादकांनी तेथें समक्ष जाऊन यासबधीची खातरजमा करण्यास काय हरकत होती ?' अशी विचारणा करून आमच्यावर थोडा दोषारोपाहि ठेवला. या सर्व वाचकमित्राना आम्ही कळवूं इच्छितों कीं, प्रा. माडवलर यांचा लेख आमच्या हातीं आल्यावर लगेच आम्ही डॉक्टरासबधीं अधिक माहिती मिळविण्याच्या प्रयत्नास लागलों. प्रथम त्याचें उपलब्ध साहित्य मिळविलें. फोटो हस्तगत केला आणि परिचयाच्या गृहस्थांमार्फत येरवडयाच्या रुग्णालयांत डॉ. अत्तरदे यांची समक्ष भेटहि घेतली. याबाबत गेले दोन महिने आम्ही मौन पाळलें. परंतु वाचकाकडून सतत विचारणा झाल्यानें भेटीचा हा त्रोटक वृत्तांत येथें सादर करीत आहोत.

—संपादक

"आम्हीं तुम्हांला भेटायला आलों आहोंत." डॉ. श्रीराम अत्तरदे समोर येताच आम्हीं उभें राहून साशक मनाने त्यांच्याशी संभाषण सुरूं केलें.

प्रसंग जरा विचित्र होता. आजपर्यंत मुलाखतीचा अनुभव असला तरी वेडा समजल्या गेलेल्या माणसाशी बोलण्याचा हा पहिलाच प्रसंग ! आम्हांला पाहून अत्तरदे याची काय प्रतिक्रिया होईल याचा कांहींच कयास नव्हता. आणि सुरुवातीला डॉक्टरांनी द्यायचा तो धक्का दिलाच. आमचें पहिलें वाक्य सपतें न सपते तोच ते तुसडयासारखे उद्गारले—

"मी तुम्हांला ओळखीत नाही. मला भेटायची गरज काय ?—"

आम्हीं जरा वेळ गोंधळलों ! काय बोलावें हें सुचेना. दोन वाक्यांतच मुलाखतीचा प्रपंच आटोपणार असें वाटलें. पण तेवढयांत एक कल्पना सुचली. बरोबर घेतलेलीं त्याचीं पुस्तकें आम्ही त्याना दाखविलीं. एखाद्या स्फोटक वस्तूला जपून हात लावावा तशा सावधगिरीनें त्यांनी ती पुस्तके हातांत घेतलीं. पुस्तकाची ओळख पटतांच ते पानें चाळू लागले. आईनं आपल्या पिल्यापिल्यांना जवळ घ्यावे तसें त्याचे तें पुस्तक चाळणें सुरूं झाले. हळूहळू त्यांच्या चेहऱ्यावर सूक्ष्म फरक पडत गेल्याचें आमच्या ध्यानांत आलें.

"तुम्ही खरोखर मनापासून भेटायला आलात कां ?" त्यांनीं बोलायला सुरुवात केली.

"त्याशिवाय आम्ही एवढी तसदी कशाला घेऊं ? प्रा. मांडवलकर यांनीं आपल्यासंबंधी एक लेख लिहिला आहे तो—आम्ही आमच्या जून अंकांत प्रसिद्ध करणार आहोंत. तेव्हां तत्पूर्वी आपली भेट घ्यावी व जमल्यास आपल्या साहित्याविषयी कांही माहिती मिळाल्यास पहावें म्हणून तर आम्ही येथें आलों आहोंत !"

बरोबरच्या वॉर्डरकडे वळून उपहासानें डॉक्टर म्हणाले, "इथें पागलखान्यात काय साहित्यावर बोलणार ! त्याला वातावरण निराळें हवे !"



तरीपण डॉक्टर निवळले होते. त्यांच्या डोळयांत चीड ठेचून भरलेली दिसत होती, तरी चेहऱ्यावर वेडसरपणाची यत्किंचितहि झाक नव्हती. काळया मिशा ओंठाच्या दोन्ही कडांवर पसरल्या होत्या. दाढी मात्र तीन-चार दिवसांची वाढलेली व पांढरी झालेली होती. डोक्यावरचे सर्व केस पाढरे झालेले व बारीक कापलेले होते. चेहरा काळवडलेला, करपलेला होता. अंगांत खादीचा आंखूड कोट होता. कुणीतरी भेटायला आले म्हणून घाईघाईनें ते कोट घालून आलेले असावेत-कारण बटणें वर-खाली लागलेली होती. बिन कॉलरचा शर्ट, खाकी टांगेवाल्यासारखी पँट आणि चपला असा त्यांचा वेष होता.

जवळच्या रिकाम्या बाकावर आम्हीं बसलों. मागील बाजूची खिडकी इस्पितळाच्या आवारात उघडणारी होती. त्या खिडकीशी वेडसर चेहऱ्याचे दोन-तीन रोगी जमा झाले होते, व आम्ही काय बोलतों ते एकाग्रतेनें ऐकत होते.

डॉक्टरांच्या "सगीत चालढकल" या नाटकाचा आम्हीं प्रथम उल्लेख केला. तेव्हां ते म्हणाले—

"त्या नाटकांत काही दम नाहीं. सुरुवातीला आपलं कांहीतरी लिहिलं——"

त्याची ही प्रतिक्रिया पहातांच स्वतःच्या संपूर्ण लिखाणाचा त्याना यत्किंचित्हि विसर पडलेला नाही हें आमच्या लक्षात आलें. त्याचा

"अत्तरगंगा" हा कवितासंग्रह त्यांच्या हातांत होता. त्याची अर्पण-पत्रिका पहातांच ते रागावून म्हणाले.

"हा गोळे कोण ? या उपटसुभाला मी पुस्तक अर्पण केलेलें नाहीं. माझ्या मार्गे–मला इथें पोलिसानीं बेशुद्ध करून आणून टाकलें. या लोकानीं माझीं पुस्तकें वाटेल तशी छापून काढलीं आहेत. हें शुद्धिपत्र बघा, किती चुका या–!"

"चोर सुवर्णा तुळी–द्या संन्याशाला सुळी,
समर्थनास्तव तत्वकोविदे उभी अर्धवर्तुळी"

ही संग्रहांतील कविता आम्ही खूण करून ठेवलेली होती. ती त्यांनीं संपूर्ण वाचली. ती वाचल्यावर ते म्हणाले–

"मी साम्यवादी वाङ्मय लिहिलें म्हणून मला सरकारनें इथें आणून डांबलें आहे. हा माझा छळ आहे. माझी 'अन्नपूर्णा' ही कादंबरी-हस्तलिखित–सरकारनें जप्त केले. तेव्हां मी नंदुरबारला होतों–"

"अजून तुम्हांला या गोष्टी आठवतात कां ?" आम्हीं विचारलें.

ते उसळून म्हणाले–"मी वेडा नाहीं. मला सगळ्या गोष्टी–जशाच्या तशा आठवतात–"

आम्ही त्यांच्या पत्नीसबंधी विचारले–ते म्हणाले–"माझ्या पहिल्या बायकोला तीन मुलें, दोन मुली, आणि एक मुलगा; मुली भेटून गेल्या. मुलगा नाही आला. दुसऱ्या बायकोला दोन मुलें आहेत. वऱ्हाडातल्या नादेड गावच्या पाटील घराण्यातील ही मुलगी. मला बेशुद्ध केले तेव्हा माझे वडील तिथें होते. माझें त्यांच्याशीहि पटत नव्हतें. मला इथें आणल्यावर पुढें घराचे काय झालें, बायको कुठें आहे–पोरं कुठें आहेत, मला काय सांगतां येणार ?—"

त्यांच्या बोलण्यात सुसूत्रता होती. ते मध्येंच आपल्या पुस्तकासंबंधीं सागू लागले––

"मी स्वत: या पुस्तकात पैसा घातला. एकदंर आठ पुस्तकें झालीं. पण माझ्या पुस्तकावर पुण्या–मुबईतील वृत्तपत्रानीं अभिप्रायदेखील दिले नाहीत."

कोटी जनाच्या चिर दैन्याची मय बोंबले
भल्या पहाटे ( भोगा म्हणती गिरणीचा तो )
आणि दौडती धापा टाकित, डोळे चोळीत,
अनवाणी, दुड्दुडत हुडाडत–
मुखी थोटुके जळती शोषित–

गिरणीकडे धांवणाऱ्या अर्धपोटी मजुराचीं, खेडयांतल्या अन्यायाचीं चित्रें आपण तळमळीनें रेखाटलीं. पण त्याची योग्य ती दखल घेतली गेली नाहीं म्हणून त्यांनीं उद्विग्नता आल्याचें सागितलें.

माझा डॉक्टरेटचा प्रबध 'छंदोमयी मऱ्हाठी नागपूर विद्यापीठांत धूळ खात आहे. भवानीशंकर पडित माझे गाईड होते. माझ्या पुष्कळशा कविता नागपूरला डॉ. कोलत्यांकडे मीं दिल्या होत्या. कोण छापणार आता हें ?"

## तत्त्वज्ञानी 'कवि'–विंदा

विषय बदलावा म्हणून आम्हीं 'माणूस' चा 'मे' अंक त्यांच्या हातात दिला. 'तुमची माहिती जून अंकांत देणार आहोंत' असें सागताच ते म्हणाले–"मी इथें आहे हेंच कुणाला माहीत नाही. माझा जगाशी सबधच तोडून टाकलेला आहे–मला इथून बाहेर काढा असं सरकारला कोण सांगणार ?"

हातीं दिलेल्या अंकांतील मुखपृष्ठावर असलेल्या विंदा करंदीकर यांच्या कवितेनें करंदीकरांची आठवण होताच डॉक्टर उदगारले,

"तत्वज्ञानाच्या मुशींत प्रतिभा ओतणारा 'विंदा' हा एकच कवि आहे. दुसरे आपले कुसुमाग्रज. पण आतां बदलत्या काळांत त्यांच्या काव्यांतील मानवता, समता, देशभक्ति यांचे रंग उडून गेल्यासारखे वाटतात–"

"करंदीकरांचा संग्रह माझ्यापाशी होता. मर्ढेकरांचें 'वाङमयीन महात्मता' पुस्तक वाचलय् कां ? इंदिरा संत–ना. म. संत यांचा 'सहवास' हा सग्रह निघून फार वर्षें झाली. आतां इंदिराबाईंचा एखादा संग्रह निघाला कां हो– ?"

आम्ही "मेंदी" चा उल्लेख केला, तेव्हां ते म्हणाले–"तो कशाला आम्हांला मिळतोय इथें वाचायला ? कुठलेतरी जुने दिवाळी अंक देतात. त्याचा काय उपयोग हो मला ?"

डॉक्टर इतक्या मोठयानें बोलत होते की, आसपासच्या रोग्याना भेटायला आलेली मंडळीहि आमच्याभोंवतीं गोळा झाली होती. बोलतां बोलतां ते आपलीं पुस्तकें चाळीत होतेच. त्यांची नजर–"ही जमीन हें अस्मान" या आगामी कवितासंग्रहाच्या जाहिरातींकडे गेली. ते म्हणाले––

"अहो, हा कवितासंग्रह नव्हता ! ही होती दीर्घकथा ! हें, ', अरणीचीं फुलें व इतर कविता" हें नांव मात्र कवितासंग्रहाचें बरोबर दिलें आहे. हा सग्रह तयार होता. "शिवाय वऱ्हाडी लोकगीतें" या पुस्तकांवर शें–दीडशें पानांची प्रस्तावना लिहिणार होतो. त्यांत वऱ्हाडांतील स्त्री-गीतातून व्यक्त होणारे सामाजिक आशय यासंबंधीं विवरण होतें. टिपणें तयार होती. प्रस्तावना डोक्यांत सर्व तयार होती. पण १९५४ नंतर अधूनमधून मला इथें आणतात. आतां इथें येऊन मला चार वर्षें होतील.–"

या ठिकाणीं त्यानी तीन वर्षें कां चार वर्षें यावर वॉर्डरशी थोडा वाद घातला. वॉर्डरचें म्हणणे ते ५९ साली येथें आले.

हळू हळू काव्यावरून आम्ही कथा–कादंबरीकडे वळलों. त्या संदर्भांत त्यानी भावे, गाडगीळ, गोखले, पेंडसे याचे उल्लेख भराभर केले. घडयाळाचा काटा चारकडे सरकत होता. वेळ संपत आली होती. आम्ही आतां निघतों असें म्हणताच तेहि उठले. दरवाजाकडे जातां जातां ते म्हणाले–


"मी तुमच्याशी सुरुवातीला नीट वागलों नाहीं. कारण सांगू कां–या वेडयांशी मला जखडून टाकलं आहे. तुमच्यासारखी मंडळी भेटायला आली की मला मेंटल अॅड्जेस्टमेंट करायला त्रास पडतो. मनावर विलक्षण ताण पडतो–हा छळच आहे !"

आमच्याबरोबर चालता चालतां ते म्हणाले–"माझ्या छंदोमयी मऱ्हाठीत मीं माधवराव पटवर्धनाची थिअरी मानलेली नाहीं. पटवर्धनांवर थोडया वेळात बोलतां येणार नाहीं. त्याला चार–दोन तास हवेत. मुद्दे माडायला हवेत.—"

आम्हीं त्यांना पुन: येऊं तेव्हां बोलूं असें आश्वसन दिलें. मोकळेपणानें बोलल्याबद्दल आभार मानले. हस्तांदोलन करून आणि नमस्कार करून आम्हीं त्यांचा निरोप घेतला.

●●●

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफझलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका


आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.



लिओनार्ड मोस्ले यांच्या
“The Last Days of The
British Raj” या ग्रंथाचा

प्रदीर्घ परिचय.

+

रा. म. शास्त्री

# स्वातंत्र्य जेव्हां मिळालें

माउंट बॅटन



मधु तिष्ठति जिव्हाग्रे

भारताला सत्तादान १ जून १९४८ ला करावयाचें असें पंतप्रधान ॲटलींनीं ठरवलेलें नव्हतें; तर लॉर्ड माऊंट बॅटनसाहेबांनीं आपल्या सोईकरतांच हा नजिकचा मुहूर्त धरला होता. भारतांत येण्यापूर्वी त्यांची नाविक दलांतील "फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ॲडमिरॅलिटी" या सर्वोच्च पदावर नियुक्ति होण्याचा क्षण जवळ आलेला होता व ती जागा त्यांच्याकरतां रिकामी राखण्यांत येईल असें ॲटलींनीं त्यांना अभिवचन दिलें होतें. तेव्हां फाळणीचें श्राद्ध चटावर उरकून त्वरित परदेशीं जाण्याचा व्हाईसरॉयसाहेबांचा इरादा होता.

माऊंट बॅटन यांनीं लगेच फाळणीचा आराखडा पक्का करण्याच्या सूचना आपल्या सहकाऱ्यांना दिल्या. त्याचबरोबर, हें सर्व शक्य तितक्या लवकर उरका; काँग्रेस-लीग कोणत्या क्षणीं पुनः वर्दळीवर येतील याचा नेम नाहीं, असा इशाराहि त्यांनीं दिला. लॉर्ड इस्मे यांनीं यावेळच्या परिस्थितीचें वर्णन एका पत्रांत दिलें आहे—

"वस्तुतः माउंट बॅटन यांनीं सर्व कांहीं सबुरीनें घ्यावें व या दृष्टीनें त्यांच्यावर दडपण ठेवणें हें माझें काम. परंतु मलाच आतां ही फाळणी जेवढी लवकर होईल तेवढें बरें असें वाटूं लागलें. सगळीकडे कत्तली ऐकूं येत होत्या. सर्व जबाबदारी आम्हां ब्रिटिशांवर आणि सत्ता मात्र काडीची नाहीं, अशी परिस्थिति. पोलिसांत जातीय बेदिली माजलेली, आणि सरकारी यंत्रणा खिळखिळी झालेली. नेहरू–जिना दोघे, सर्व दोष आम्हांलाच देत होते. व्हॉईसरॉयच्या कौन्सिलवर आतां नऊ काँग्रेसवाले आणि पांच लीगवाले आले होते. त्यांचें कशांतहि एकमत नव्हतें. नाहीं म्हणायला, आम्हीं लगेच चालतें व्हावें एवढी एकच गोष्ट दोघांना मान्य होती.–"

लॉर्ड ॲबेल तर पंजाबमधील आणि सरहद्द प्रांतांतील दंगलीच्या हकिगतींनीं हतबुद्ध झाले होते. म्हणजे व्हॉईसरॉयांचे दोघे विश्वासू सहकारी माउंट बॅटनच्याच मताचे झाले होते. त्यांची वृत्ति लाडानें वाढवलेल्या व भलत्याच माणसाचा हात धरून पळून गेलेल्या मुलीच्या बापासारखी झाली होती. जणूं लॉर्ड इस्मे म्हणत होते, "जेवढें करायचें तेवढें केलें, आतां ज्याचें त्याचें नशिब–" आणि लॉर्ड ॲबेल म्हणत होते, "पळून गेलेली मुलगी आतां आपल्याला मेली.–"

मोस्ले लिहितो –"आतांपर्यंत व्हॉईसरॉयनीं वेळोवेळी व्ही. पी. मेनन यांचा सल्ला घेतलेला होता. परंतु फाळणीची योजना शिजूं लागतांच मेननना कांहीं काळ खड्यासारखें बाजूला ठेवण्यांत आलें. याचें कारण उघड होतें. मेनन हिंदू होते आणि त्यांचा फाळणी योजनेंत हात असला तर मुसलमानांच्या मनांत उगाच संशयाचें वारें शिरायचें!"

मेननना विश्वासांत वेळींच घेतलें गेलें असतें तर पुढचा एक धक्का टळला असतां असें मत मोस्लेनें दिलें आहे. मेनन हे पटेलांच्या विश्वासांतले होते. आणि काँग्रेसला त्यांच्या मार्फत विश्वासांत घेणें व्हॉईसरॉयना जमलें असतें. परंतु होणारें न टळे! माउंट बॅटननीं सहकाऱ्यांनीं केलेल्या स्वातंत्र्याच्या मसुद्यावर सही केली आणि ही योजना घेऊन २ मे १९४७ ला लॉर्ड इस्मे आणि जॉर्ज ॲबेल लंडनला रवाना झाले.

या योजनेप्रमाणें सत्तात्यागानंतर सर्वच प्रांत स्वायत्त होणार होते. या छोट्या छोट्या राज्यांना कांहींहि ठरविण्याची मुभा मिळणार होती. व्ही. पी. मेनन यांनीं आपल्या पुस्तकांत The Transfer of Power लिहिलें आहे–

"या योजनेला माझा विरोध होता. मीं ही योजना लंडनला पाठवूं नका असें वारंवार आपणहून बजावलें, परंतु तिकडे सर्वांनीं दुर्लक्ष केलें—"

ही योजना लंडनला जाऊन कॅबिनेटला समजावून सांगून, ब्रिटिश मंत्रिमंडळाची संमति आणण्याचें काम इस्मे–ॲबेल यांचेकडे सोपविलेलें होतें.

## जपून टाक पाऊलें

इस्मे निघून गेल्यावर माउंट बॅटन यांच्या मनांत पुन: पुन: असें येऊं लागलें की, जीना यांनीं अजून कांहीं हातचें राखून ठेवण्याची शक्यता आहे. त्यांनी लगेच इस्मे यांना जी तार पाठविली ती मोस्ले यांनी उधृत केली आहे. माउंट बॅटननीं कळवले होतें—

" माझें नुकतेंच जीनांशी जें बोलणें झालें त्यावरून खंडित पाकिस्तानास जीनाचा विरोध असेल असें वाटत नाहीं. माझा जीना व लियाकतखान या दोघांविषयीं असाच होरा आहे कीं, त्यांचा आपली योजना फेटाळण्याचा विचार नाहीं. जीनाहि कांही हातचें राखून वागत आहेत असें दिसत नाहीं. ३० एप्रिलला प्रांताच्या फाळणीला विरोध करणारें जें पत्रक जीनांनीं काढलें आहे तें केवळ हिंदू-शिखांच्या आत्यंतिक मागणीला शह द्यावा म्हणूनच काढलेलें दिसतें. परंतु असेंच गृहित धरून पुढें जाण्यांत निश्चित धोका आहे. 'तुम्हाला खंडित पाकिस्तान चालेल ना?' हा सरळ प्रश्न मीं मुद्दामच जीनाना विचारलेला नाहीं. कारण नकार देऊन अधिक कांही पदरांत पडेल या आशेनें त्यांनी नकार दिला असतां अशी माझी खात्री आहे. म्हणून अजूनहि आपल्याला सावधपणेंच पावलें उचलावयास हवींत. मला हें पक्कें ठाऊक आहे कीं, जीना वस्ताद मूर्ति आहेत. आणि ते आपल्याला फसवणार नाहीत याची काळजी घेणें आवश्यक आहे— "

जसजसे दिवस जाऊं लागले, तसतशी माउंट बॅटन यांची खात्री पटूं लागली, की, सर्व कांही सुरळीत पार पडणार. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें पंजाबची फाळणी मागतांच गांधीजी लगबगीनें दिल्लीला आले होते. व्हॉईसरॉयना भेटून महात्माजींनी अखंड हिंदुस्थानचाच माउंटन बॅटन यांनीं पुरस्कार करावा अशी त्याना गळ घातली. व्हॉसरॉयनीं जबाब दिला–

" हें आतां माझ्याच्यानें होणार नाहीं. जर जीना व लीग यांचीच कुणीं खात्री पटवली तरच कांही होईल.–"

## वांझोटी भेट-भोंगळ पत्रक

गांधींना जीनांची पुरती ओळख पटावी म्हणून माउंट बॅटन यानीं दोघांशी अशा भेटीच्या वेळा आंखल्या कीं, दोघांची समोरासमोर भेट व्हावी. दोघे समोरासमोर येतांच–नमस्कार झाले आणि चमत्काराहि झाला. माउंट बॅटन याच्या आग्रहावरून गांधीनी जीनांना भेटावें असे ठरले. ६ मे १९४७ ला औरंगजेब रोड येथील जीनाच्या निवास्थानीं गाधी त्यांना भेटायला गेले.

ज्या खोलीत ही भेट झाली त्या खोलीत भारताचा नकाशा टांगलेला होता. आणि पाकिस्तान गडद हिरव्या रंगांत चितारलेले होतें. या दोन वृद्ध नेत्यांनी तीन तास गप्पा झोडल्या आणि शेवटीं खालील पत्रक निघालें.–

"आम्ही दोन गोष्टींबाबत प्रामुख्यानें विचार केला. एक म्हणजे भारताची पाकिस्तान व हिंदुस्थान अशी फाळणी करावी काय? गांधींना फाळणीचे तत्त्वच मान्य नाहीं. त्यांचें म्हणणें, फाळणी आवश्यकच आहे असे नाहीं. परतु जीनाच्या मतें फाळणी अटळ आहे. इतकेंच नव्हें तर तोच एक भारताचा राजकीय प्रश्न सुटण्याचा व्यवहार्य मार्ग आहे—

"दुसऱ्या ज्या गोष्टीची आम्हीं चर्चा केली ती म्हणजे लोकांनीं शांतता राखावी यासाठी आम्हीं काढावयाच्या पत्रकासबंधीं आम्ही दोघें या निर्णयाला येऊन पोचलों की, आम्हीं दोघानीं आपआपल्या क्षेत्रांत या विनंतीप्रमाणें लोकांनीं वागावें याची काळजी घ्यावी आणि आम्ही यासाठीं सर्व ते प्रयत्न करूं— "

इतकें भोंगळ पत्रक कधीं कुणीं काढलें नसेल. चर्चा करून याच गोष्टी निघणार होत्या तर तीन तास चर्चा तरी कसली केली? हिंदु मुसलमान हे शब्द वापरायचे नाहींत या जिद्दीखातर "आपआपलीं क्षेत्रें" असा शब्दप्रयोग केला तरी भावार्थ कसा बदलणार?

मोस्ले लिहितो कीं— "या पत्रकानंतर माउंट बॅटन यांची उरली सुरली, भीतीहि मावळली— " आपलें काम फत्ते होणार याविषयीं आतां त्यांना शंकाच उरली नाही.

व्हॉईसरॉयनीं लगेंच दिल्लींतील आपला मुक्काम हलवण्याचें ठरवलें. कॅम्बेल जॉनसननी जाहीर केलें कीं, व्हॉईसरॉय विश्रांतीसाठीं लवकरच सिमल्याला रवाना होतील. जवळजवळ ३५० नोकर माणसांचा लवाजमा घेऊन व्हॉईसरॉय सिमल्याच्या थंड हवेंत दाखल झाले.

या तीनशें पन्नास माणसात व्ही. पी. मेनन यांचा समावेश होता. व्हॉईसरॉयसाहेबाच्या नेहमी कानाशीं असणारे इस्मे–ॲबेल हे मिशनची योजना घेऊन लडनला गेलेले होते आणि मेनन यांना प्रथमच व्हॉईसरॉयशीं मोकळेपणानें बोलण्याची संधि लाभली.

प्रश्न निघाला की, सत्तादानानतर भारत कॉमनवेल्थ कुटुंबांत राहील कीं नाही? मेनन यानीं व्हॉईसरॉयांना सांगितलें.

" मी यासंबंधीं वल्लभभाईंशी बोललों आहे, पटेलानीं मला असें आश्वासन दिले आहे कीं, जर डोमिनिअन सेट्सच्या तत्त्वावर ब्रिटिश लगेच सत्ता सोडीत असतील तर कॉंग्रेसनें ती योजना स्वीकारावी याकरितां ते आपलें वजन खर्ची घालतील.–"

श्री. मेनन यांनीं पुढें सागितलें कीं, "पटेलांच्या देखतच मीं ही योजना कागदावर नक्की केली आणि त्याचा मसुदा सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया याचेकडे पाठवला."

माउंट बॅटन याना ही घटना सर्वस्वीं माहीत नव्हती. मेनन यांचेकडून ही माहिती कळतांच व्हॉईसरॉयना आश्चर्य वाटलें. मोस्ले लिहितो.—

" आपल्या हातांतील फुग्यावर खूष असणाऱ्या लहान मुलाला दुसऱ्या मुलाच्या हातांत त्याहून चांगला फुगा दिसला कीं तो जसा हुरळतो तसें माउंट बॅटन मेननची माहिती ऐकून हुरळले.–"

माउंट बॅटननीं मेननना विचारलें.–

" जी योजना मीं लडनला पाठवली आहे त्यासंबंधीं तुमचें काय मत आहे–? "

" हा प्रश्न तुम्हीं मला फार उशिरा विचारलांत. आतां उशीर झाला आहे.–" मेननानीं तो विषय बंद करून टाकला.

८ मेला पंडितजी आपले परममित्र आणि विश्वासू जोडीदार श्री. कृष्ण मेनन यांच्यासह, व्हॉईसरॉयचे पाहुणे म्हणून सिमल्याला आले.

माउंट बॅटन यांनीं श्री. व्ही. पी. मेनन यांना नेहरूंशी पटेलांनीं मान्यता दिलेल्या बाबीविषयीं चर्चा करण्यास सागितलें.

व्ही. पी. मेनन–नेहरू गांठ झाली.

या भेटीविषयीं मोस्ले लिहितो.–

" भेटीची सुरवात चमत्कारिक वातावरणांत किंचित् अढींतच सुरू झाली. कारण नेहरूना हें कळलेलें होतें कीं, जी योजना मेनन पुढें मांडीत आहेत ती पटेलांनीं चार महिने आधीच पक्की केली आहे. सरदार आपल्याला अंधारांत ठेवून कांही गोष्टी करतात हा नेहरूंना

मोठाच धक्का होता. परंतु मेनन यानीं मांडलेली योजना त्यांना अखेर विचारार्ह वाटली आणि १० मेला चर्चा मुक्रर झाली."

## मेनन–योजना

१० मेला ही बैठक झाली. व्हॉईसरॉय माउंट बॅटन, नेहरू, व्ही. पी. मेनन, सर मेलव्हिल, आणि लेफ्टनंट कर्नल अर्स्कीन एवढी मंडळी हजर होती. मेनन यांनी व्हॉईसरॉय यांच्या सूचनेवरून आपली सत्तादानाची योजना विस्तारानें मांडली. त्याचा आशय असा होता.

(१) मुसलमान बहुसंख्य प्रदेशाचें पाकिस्तान व उरलेला भूभाग हा हिंदुस्थान अशी फाळणी करावी.

(२) दोन्ही देशांच्या दोन मध्यवर्ति सरकाराना त्या त्या भूभागाचें सत्तादान व्हावे; याकरता दोघांना दोन गव्हर्नर जनरल नेमावेत.

(३) देशाची घटना तयार होईपर्यंत, १९३५ च्या कायद्यावर आधारित घटना अमलात रहावी व तीच दोन्ही डोमिनिअननी तात्पुरती स्वीकारावी.

यावर नेहरूंनीं सागितलें की, भारतांत संपूर्ण स्वतंत्रतेची लोकांची तीव्र मागणी आहे. तरीहि भारताला केव्हांहि कॉमनवेल्थमधून फुटण्याचा अधिकार असल्यामुळें ही योजना स्वीकारण्यास प्रत्यवाय नाहीं.

सत्तादानाची ही योजना सर्वांना मान्य झाली. परतु सत्तादानाची एक योजना माउंट बॅटन यांनीं लडनला पाठवलेली होती. आतां त्या योजनेला कसा खो देणार ?

लॉर्ड माउट बॅटन आतां खरोखरच पेंचांत पडले होते. परतु मोस्ले सागतो त्याप्रमाणें–मुत्सद्देगिरी, धूर्तपणा, विलक्षण स्मरणशक्ति, आकर्षक व्यक्तिमत्व, या सर्व गुणांबरोबर त्यांचे बाबतीत आणिक एक गोष्ट त्याचा सतत पाठपुरावा करीत होती. ती म्हणजे त्यांचें दैव ! बलवत्तर दैव !! यापुढची हकिगत मोस्ले सांगतो–

"कॅम्बेल जॉनसन यानीं सिमल्यातून जाहीर केले कीं, दि. १७ मे १९४७ ला व्हॉईसरॉय दिल्लीत एक महत्त्वाची बैठक घेतील. या बैठकीसाठी, काँग्रेसतर्फे नेहरू-पटेल, लीगचे वतीने जीना-लियाकत आणि शिखांचे प्रतिनिधी म्हणून सरदार बलदेवसिंग यांना निमंत्रणें गेलीं आहेत."

"या बैठकींत आपण इंग्लडला पाठवलेल्या आणि तोंपर्यंत कॅबिनेटने स्वीकृत केलेल्या सत्तादानाच्या योजनेची माहिती पुढाऱ्यांना देण्याचा माऊट बॅटन याचा बेत होता. यावेळी करण्यात यावयाचा भाषणाचा तर्जुमाहि तारेनें लंडनला पाठवण्यांत आला."

"१० मेला सायंकाळी व्हॉईसरॉयनी नेहरूंना रात्री जेवणानंतर व्हिस्कीसाठी बगल्यावर बोलावलें. नेहरू आले. व्हिस्कीचे पेले दोघांनीं ओठाला लावले. वस्तुत: लडनला पाठवलेली योजना १७ मेपर्यंत कुणालाच दाखवावयाची नाहीं असे पक्कें ठरले होतें. परतु माउंट बॅटन याना अचानक कसलातरी झटका आला. माउंट बॅटन उठले आणि जवळच्या लोखडी सेफमधून त्यानी योजनेची प्रत बाहेर काढली. आणि नेहरूपुढें टाकली–"

"पुढचा अर्धा तास माउंट बॅटनच्या आयुष्यांतला सर्वांत विचित्र-पणें गेलेला काल असावा. नेहरूंना भावना लपवता येत नाहीत. जर एखाद्या भावनेच्या आवर्तांत ते सांपडले तर त्या त्यांच्या चेहेऱ्यावर दृग्गोचर होतात. नेहरूंचा चेहरा प्रथम संतापानें लालसर झाला आणि अखेरीस विषादानें भरून गेला. हातातली योजना फेकल्याच्या अविर्भावांत त्यांनी समोरच्या डेस्कावर टाकली. आणि ते उद्‌गारले–

"अशक्य आहे–ही योजना मी कधीच स्वीकारणार नाहीं–"

त्या योजनेवर यथेच्छ टीका करून नेहरू बंगल्याच्या बाहेर पडले.

नेहरू आपल्या निवासस्थानीं आले. परंतु त्याना झोंप लागणें शक्य नव्हतें. त्यांनी रातोरात व्हॉईसरॉयना आपलें म्हणणें पत्रानें कळविण्याचे ठरवलें.

नेहरूंची ही चिठ्ठी हॉईसरॉयना सकाळीं मिळाली. या चिठ्ठीत नेहरूंनी माउट बॅटन यांना स्पष्ट लिहिले. कीं, सर्व प्रांतांना सत्तादान करून आपले भवितव्य ठरविण्याची मुभा देणारी आपली योजना ही अत्यंत घातुक असून त्यामूळें भारतांत अराजक माजून रक्तपात मात्र होईल. ही योजना काँग्रेस कालत्रयीहि मानणार नाहीं.

दुसऱ्या दिवशी सकाळीं मेनन यानी नेहरूंची गाठ घेतली. आपण माडलेलीच योजना कशी स्वीकारार्ह आहे यासबंधीं नेहरूंचें मन वळवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. नेहरूंनी आक्षेप घेतला कीं–व्हॉईसरॉयची योजना मेननना माहीत असून त्यानी ती माहिती यापूर्वीच नेहरूंना कां दिली नाही ? मेननना हें उघड करता येईना कीं, ही योजना कुणाला सागावयाची नाहीं असाच माउट बॅटन याचा हुकूम होता. त्यांनीं गुळमुळीत उत्तरे देऊन तेथून पळ काढला. आणि ते तडक माउंट बॅटनसाहेबाकडे आले.

व्ही. पी. मेनन यांनी आपल्या पुस्तकात लिहिलें आहे—

—"मीं व्हॉईसरॉयाना हें पटवून दिलें कीं, माझी योजनाच काँग्रेस स्वीकारील. कारण पटेल–नेहरूंचा तिला पाठिंबा आहे. जीना ही योजना स्वीकारतील कीं नाहीं एवढाच प्रश्न आहे. परतु मी व्हॉईसरॉयांना याची आठवण करून दिली की, जीना पजाब–बंगालच्या फाळणीला विरोध करणार नाहींत असें आपलें मत झाल्याचे त्यांनीच मला सागितलेले होतें."

मेननचें म्हणणें पुरतें संपण्यापूर्वीच माउंट बॅटन यानी नेहरूंशी पुन: बोलणें करण्याचा निश्चय केला.

## नेहरूंनीं 'मम' म्हटलें

वस्तुत: पटेलाशीं चर्चा करून आपल्या पाठीमागें व्ही. पी मेनन यांनी योजना आंखली याबद्दल नेहरूना राग आलेला होता. तरीहि ज्याअर्थी नेहरूनीं अखेर मेननची योजना स्वीकारली त्याअर्थी मेननच्या योजनेंत बरेच तथ्य आहे आणि जर कांहीं यशाची आशा असली तर त्याच योजनेला आहे हें माउट बॅटन याच्या ध्यानात आलें होतें. त्याच्या आणखी एक गोष्ट लक्षात आली कीं, नेहरूंचा उत्साह टिकावयाचा तर नेहरूनीं आपल्या योजनेवर केलेली टीका आपण ग्राह्य मानली असा देखावा करण्यास तयारी हवी. त्यानीं मेननमार्फत नेहरूंना भेटण्यासाठी पुन: निमत्रण दिलें.

या भेटीत माउटबॅटन यानीं नेहरूंना विचारलें—

"मी एक सरळच प्रश्न विचारतों. आपलें माझ्या योजनेविषयी जें म्हणणें आहे तें लक्षांत घेऊन योग्य तो फेरबदल केला तर काँग्रेस ही योजना स्वीकारील काय ?"

नेहरूंनीं उत्तर दिलें—

"तें मी नक्की सांगू शकत नाही. फेरबदल केल्यावर योजनेचें काय स्वरूप होते तें मला पहावें लागेल."

नेहरू निघून गेले. व्हॉईसरॉय आणि व्ही. पी. विचारविनिमय करण्याकरतां मागें थांबले. माउटबॅटननीं मेननना सांगितलें.

—" नेहरू आज संध्याकाळीं दिल्लीला परतणार आहेत आणि ते निघण्यापूर्वी त्याना नवीन योजनेचा मसुदा दाखववयास हवा. संध्याकाळच्या आत योजना लिहून काढतां येईल काय ? "

वस्तुतः माउंट टनच्या योजनेंत बॅफेरबदल करून तयार होणारी सत्तादानाची योजना म्हणजे मेनन–पटेलांचीच योजना होती आणि ती ' फेरबदल केलेली योजना ' म्हणून नेहरूच्या गळीं उतरवण्यासाठीं माउंट बॅटननीं घडवलेला हा सर्व बनाव होता हें उघड आहे.

यावेळीं दुपारचे दोन वाजत आले होते. व्ही. पी. मेनन योजनेचा आराखडा लिहिण्यासाठीं बसलें.

व्हॉईरॉयनीं घाईघाईनें कॅम्बेल जॉनसनना बोलावून १७ मे ची बैठक पुढें ढकलल्याचें जाहीर करण्यास फर्मावलें.

जॉनसननी विचारलें—

" पण कारण काय द्यायचें— ? "

" काय सुचेल तें द्या— " माउंट बॅटननीं तो विषय त्वरित बंद केला.

लंडनला ताबडतोब तारा रवाना झाल्या. एका तारेंत मजकूर होता—

" जो ड्राफ्ट प्लॅन मंजूर झाला आहे तो रद्द समजावा. नवीन योजनेची वाट पहावी— "

कॅम्बेल जॉनसन यांनीं सरकारी पत्रक काढलें—

" ब्रिटिश पार्लमेंट आतां सुटीसाठी बरखास्त होणार असल्यामुळें सोईच्या दृष्टीनें व्हॉईसरॉय व पुढारी यांची १७ मे शनिवारीं होणारी बैठक २ जून—सोमवारपर्यंत पुढें ढकलावी लागत आहे— "

या पत्रकानें कुणाचेंच समाधान झालें नाहीं. कारण पार्लमेंट बरखास्त होण्याचें कांहीं नव्यानें ठरलें होतें असें नाहीं. त्या तारखा ठरलेल्याच होत्या. काहीतरी निराळें शिजत आहे असाच सर्वांना वास आला.

सायंकाळी सहाच्या ठोक्याला मेनन यांनी योजना लिहून पुरी केली. सर मेलव्हील् हें पाठीकडून वांकून मजकूर वाचीत होते. लिहिणें संपतांच त्यांनी कागद ओढून घेतले आणि योजना नेहरूंच्या निवासस्थानाकडे निघाली.

मेनन थकून गेले होते. त्यांचे डोकें दुखूं लागल्यामुळें अॅस्पिरिनच्या चार गोळ्या घेऊन ते स्वस्थ झोंपी गेले.

रात्री खाना होता. खान्याला सुरुवात होण्यापूर्वी लेडी एड्विना मेननच्या जवळ जाऊन म्हणाल्या– " व्ही. पी.–नेहरूंनीं योजना स्वीकारली— "

माउट बॅटनची आतां खात्री पटली की, ही योजनाच अखेर भारताच्या सत्तादानाची योजना म्हणून मुक्रर होणार.

पण तिकडें लंडनला घबराट उडाली होती. माउट बॅटनच्या तारेने गोंधळ उडाला होता, तारा येत होत्या–

" खुलासा करा—खुलासा करा– "

माउट बॅटन १४ मेला दिल्लीला परतले आणि पोचतांक्षणीच लंडनचा खलिता त्यांच्या हाती पडला—

" ताबडतोब लंडनला या– "

लॉर्ड इस्मेची तार आली—

" पुढें काय करायचें त्याचे मार्गदर्शन करा– "

माउंट बॅटननीं वैतागून मेननना म्हटलें–" मी आतां मुळीच लंडनला जाणार नाहीं. मी त्याना तार करतो कीं, एकतर मी पाठवत असलेली नवी योजना स्वीकारा, नाहीतर माझा राजीनामा घ्या–"

परंतु मेननंनी सांगितलें कीं, असा त्रागा करून काम फसेल. त्यापेक्षां लंडनला जाणें इष्ट. ब्रिटिश मंत्रिमंडळाला विश्वासांत घेऊन सर्व घटना कांहीहि लपवून न ठेवतां सांगाव्यात आणि नवीन योजना मान्य करवून आणावी—

माउंट बॅटननीं १४ मेलाच सायंकाळीं लॉर्ड इस्मेना तार केली–

" माझें विमान परत पाठवा. मी येत आहे– "

१८ मेला माउट बॅटननी सपत्निक पालम् विमानतळ सोडला. बरोबर व्ही. पी. मेनन होते—

मोस्लेनें स्पष्ट लिहिलें आहे—

" व्ही. पी. मेनन यांनीं सरदाराच्या पाठिंब्यानें कुशाग्रपणें आणि धीरानें ही योजना लंडनपर्यंत पोंचवली– "

माउट बॅटन यांनी श्री. व्ही. पी मेनन याना पाठविलेल्या एका पत्रांत फारच गौरवपर लिहिलें आहे.–

माउंट बॅटन लिहितात.–

" तुम्ही माझ्या राजवटींत रिफॉर्मस् कमिशनर होता, ही खरोखर भाग्याचीच गोष्ट. डोमिनियन स्टेट्सला अनुकूल असणारे तुम्हींच पहिले हिंदी गृहस्थ मला भेटला. जी गोष्ट मला सुचली नाहीं आणि मी करूं शकलों नाहीं ती गोष्ट तुम्ही सुचविली आणि त्वरित सत्तादान शक्य झालें. भारताच्या इतिहासांत तुम्ही मला घ्यावयास लावलेल्या या निर्णयाला फार महत्त्व राहील. तुम्हीं दिलेला सल्ला फार महत्त्वाचा ठरला आणि इतर सल्लागाराचा प्रखर विरोध असताना तुम्हीं योग्य तो सल्ला दिला हें त्याचें मोठें वैशिष्ट्य. "

भारताच्या फाळणीची योजना चार तासांत लिहून पांच मिनिटांत त्यावर शिक्कामोर्तब करणें ही तशी फारशी कठीण गोष्ट नव्हती !

मोस्ले म्हणतो—" घी देखा था लेकिन बडगा नही—! पंचवीस कोटी हिंदु, नऊ कोटी मुसलमान, एक कोटी ख्रिश्चन आणि पन्नास लाख तिरसट शिखांच्या या देशांत ही योजना अंमलांत आणणें म्हणजे काहीं थट्टा नव्हती ! "

पुस्तकाचें हें पांचवें प्रकरण म्हणजे या सत्तादानाच्या योजनेचा वर दिलेला इतिहास आहे.

### Please Mr. Jinnah !

सहाव्या प्रकरणाचा मथळाच आहे—" Please Mr. Jinnah! " (जीनासाहेब, कृपा करा आणि–) या प्रकरणांत मोस्ले यानी महंमदअली जीना यांनीं स्वतःच पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल होण्याचें ठरवून माउट बॅटन याना जो धक्का दिला त्याची हकिगत आहे.

३ जून १९४७ ला सायकाळी ऑल इंडिया रेडिओच्या दिल्ली केंद्रावरून आपापल्या जमातीसाठी कॉंग्रेस, लीग आणि शिखांच्या पुढाऱ्याचीं भाषणें झाली. मोस्ले म्हणतो, " देशाला उद्देशून ही भाषणें नव्हतीच; कारण देश दुभंगत होता. जातीय तत्त्वावर दुभंगत होता. पाकिस्तान जन्माला येत होतें. कॉंग्रेसच्या हिंदु–मुस्लीम ऐक्याचा आणि मुसलमान अनुनयाचा पुरता फज्जा उडाला होता "

मध्यंतरीच्या काळात माउंट बॅटन लंडनहून वाटाघाटीवरून परत आले होते. महंमदअली जीना यांनी पूर्व पश्चिम पाकिस्तानला जोडण्यासाठीं भूपट्ट्याची (Corridor) ची मागणी जोरानें पुढें सारली

होती. एक हजार मैलाचा हा भूपट्टा पाकिस्तानचीं शकलें एकत्र सांधण्यासाठीं, भारताचीं आणखी दोन छकलें उडवून त्याना हवा होता. कॉंग्रेसी नेत्यात पुन्हा कल्लोळ उडाला. परंतु लवकरच त्याचा जीव भांड्यांत पडला. कारण जीनांच्या या मागणीत फारसा जोर नव्हता.

महात्माजी मात्र सांगत होते— " Let it not be said that Gandhi was a party of India's vivisection—" (उद्यां कुणीं असे म्हणू नये की, भारताच्या विभाजनाला गांधीनी हातभार लावला म्हणून.) बस्. एवढीच त्यांच्या विरोधाला धार उरली होती. कारण त्यांनीच पुढें सांगून टाकलें होतें--Everyone to-day is impatient for independence. Congress has practically decided to accept partition. They have been handed a wooden loaf in the new plaec. If they eat it they die of colic. If they leave it, they starve" (स्वातंत्र्यासाठी आज जो तो अधीर झाला आहे. कॉंग्रेसने फाळणी जवळजवळ पत्करली आहे. त्यांच्यापुढें असाच प्रश्न आहे कीं, धरलें तर चावतें आणि सोडलें पळतें—)

तरीसुद्धां अखंड भारताचा हा महान पाईक बिहारमधून दिल्लीला आला. महात्माजीना आशा होती, की, अखेरचा प्रयत्न करून पहाण्यास हरकत नाही. दिल्लीला येताना वाटेंत त्याचें अनेक वर्षे जतन केलेले घडयाळ चोरीस गेलें. मोस्ले सांगतो--" ही घटना मोठी उद्बोधकच म्हटली पाहिजे. अनेक वर्षे जवळ बाळगलेले घडयाळ जर चोरीस जाऊं शकतें, तर त्यांनी उराशीं बाळगलेला अखंड भारतहि कां चोरता येऊ नये ?"

दिल्लीला स्टेशनवर उतरताच बापूजीनीं वार्ताहारांना सागितलें--

" आयुष्यभर मी लढे करीत आलो. ज्यात माझा पराभव उघड दिसत आहे अशी शेवटची लढाई करण्यासाठीं मी आलों आहे — To fight a loosing battle—!"

गाधीचें यावेळी दिल्लीला होणारे आगमन माउट बॅटन याना अस्वस्थ करूं लागले. गाधीचा नेहरू-पटेलावर इतका प्रभाव अजूनहि शिल्लक होता की, एखाद्या शब्दानिशी किंवा उपासानें माउंट बॅटनचे मनोरथ धुळीस मिळणें शक्य होते. लेखक लिहितो की, ही भीति मात्र यथार्थ ठरली नाहीं. भेटीचें वर्णन पाहण्यासारखें आहे.

### मौनीबाबा

" गाधीजी आले. तो त्याचा मौनाचा दिवस होता. भेट होतांच त्यांनी व्हॉईसरॉयना एका कपटयावर लिहून विचारलें—

" मीं मौनच पाळावं अशी आपली इच्छा आहे हें खरें ना ?" माउट बॅटन यांना नशिबाने हात दिला. गाधींजींनी परिणामकारक अशी कोणतीच उपाययोजना केली नाही.

मौलाना आझाद यानी माउट बॅटन याची गाठ घेऊन फाळणी योजना स्वीकारूं नका असा पुनः एकदां सल्ला दिला. परतु आझादाचे म्हणणें म्हणजे आता केवळ अरण्यरुदन ठरत होते. मौलाना आझाद यावेळच्या भेटीसंबधी आपल्या India Wins Freedom या पुस्तकांत लिहितात–' मी माउंट बॅटन यांना फाळणीमुळें उत्पन्न होणाऱ्या परिणामांचा विचार करण्यास सांगितलें. फाळणी नव्हती तरी कलकत्ता, नोआखाली, बिहार, मुबई, पंजाब इथें जातीय दंगली उसळल्या होत्या. हिंदूनी मुसलमानांवर हल्ले केले होते आणि मुसलमानांनी हिंदूंवर हल्ले केले होते. उद्यां देशाचें विभाजनच झालें तर

## चैन आणि बेचैन !

१९४६ चा सरता एप्रिल आणि मेचे सुरुवातीचे दिवस माउंट बॅटन रोज दोन तास आपल्या वशावळीचीं झाडें तयार करण्यात व्यतीत करीत होते. याउलट याच कालावधींत पडित नेहरूंची झोपेंत मोठयानें बोलण्याची संवय पुन्हा उफाळली होती असे इदिरा गांधींनी नमूद केलेलें आहे. माउंट बॅटन अगदी खुषीत असले की त्याना आपल्या पूर्वजाची वशावळ तयार करण्याची लहर येई. तर झोंपेंतील बडबड ही नेहरूंच्या कमालीच्या बेचैन मनःस्थितीची द्योतक होती.

त्या वातावरणांत देशाच्या निरनिराळया भागात रक्ताच्या नद्या वाहू लागतील. आणि या सर्व हत्याकांडाला ब्रिटिश जबाबदार राहतील."

माउट बॅटन यानी मौ. आझादाना शाब्दिक आश्वासन दिलें— " हत्याकाडाबाबत म्हणाल तर रक्ताचा एक थेंबहि साडणार नाही याविषयीं मीं खबरदारी घेईन. मी सैनिक आहे. साधासुधा माणूस नाहीं. एकदा फाळणी तत्त्व म्हणून स्वीकारल्यावर कुठेंहि देशात जातीय दंगल होता कामा नये असा सक्त हुकूम मी काढीन. जर कुठें थोडीजरी दंगल झाली तर अत्यत कडक उपाय आम्ही योजू. मग त्यासाठी सैन्याचा आणि विमानदलाचा उपयोग करावा लागला तरी बेहेत्तर. रणगाडे, विमानें, यांच्या साहाय्याने दगल करणाऱ्याची आम्ही नांगी ठेंचल्याशिवाय रहाणार नाही.– "

हें आश्वासन माउंट बॅटनकडून कसे पाळलें गेले, कितपत पाळलें गेंले याचा शोध इतिहास घेईलच. परंतु हें आश्वासन देताना मात्र माउंट बॅटन याचा आत्मविश्वास जबर वाढलेला होता. २ जूनला पुढाऱ्याशी झालेल्या बैठकीत सर्व काहीं अत्यत शातपणें कामें उरकली गेली होती. या बैठकीचें वर्णन मोस्ले यानी विस्तृत केलें आहे.–

"व्हॉईसरीगल् लॉजमध्ये माउंटबॅटन याच्या अभ्यासिकेंत ही बैठक झाली. एका वाटोळया टेबलाभोवती सर्व पुढारी बसले होते. माउट बॅटन यांच्या उजव्या हातास नेहरू, डावीकडे जीना होते. आपल्या नेत्यांच्या मागें व शेजारी, पटेल, कृपलानी, अब्दुलरब निश्तार, लियाकत अल्ली, बल्देवसिग होते वस्तुतः बलदेवसिगानी या बैठकीत आपला दृष्टिकोन परिणामकारकरित्या सागायला हवा होता. परतु झालेल्या घाटाघाटीत शिखांच्या हितसंबंधाचा खिमा उडवण्यांत आला—

" माउटबॅटन याच्या खुर्चीमागें लॉर्ड इस्मे, सर मिलव्हील् होते. परतु या योजनेचे पिता–व्ही. पी. मेनन मात्र बैठकीला हजर नव्हते."

लॉर्ड इस्मे यांनी आपल्या आठवणीत–या दिवसाचे आणि विषेषतः माउंट बॅटन याच्या कर्तबगारीचें उत्तम चित्रण केलें आहे. लॉर्ड इस्मे लिहितात—

" Mountbatten was in fact completely master of the situation from start to finish. He was in the powerful positton of having extracted concessions from all of

them even Jinnah and with great charm, subtlety and fineness he exploited the weakness of their various positions."

(माउंट बॅटन हे या बैठकीत सुरुवातीपासून शेवटपर्यंत पुरता कबजा राखून होते. कारण प्रत्येकाकडून-जीनांकडूनदेखील- त्यानी निरनिराळचा सवलती आधीच पदरांत पाडून घेतलेल्या होत्या. आणि या सर्व गोष्टींचा हिकमतीने आणि अक्कलहुषारीने वापर करून त्यांनीं प्रत्येकाच्या भूमिकेतील कच्च्या दुव्याच्या आधारें ही बैठक यशस्वी करून दाखविली— )

२ जूनची बैठक आटोपल्यावर महंमदअली जीना यांनी छोटेसें नाटक केलें. त्यांनीं सांगितलें-

"मी केवळ माझ्या जमातीचा पाईक आहे. ही योजना लीग वर्किंग कमिटीच्या सहाय्याशिवाय मी कशी स्वीकारू-?"

सायंकाळीं भेटून जीनानी वर्किंग कमिटीचें म्हणणें व्हॉईसरॉयना कळवावें असें जरी ठरलें, तरी जीना काय सांगणार याचा पुरता अंदाज माउंट बॅटन यांना होता. आणि तसा तो माउंट बॅटनना आहे हें जीनाहि ओळखून होते.

माउट बॅटन यांनीं या बैठकीनंतर जीनांच्या मन:स्थितीचें वर्णन करतांना लिहिलें आहे—"His delight was unconcealed- (जीनांना झालेला आनंद इतका स्पष्ट दिसत होता कीं, तो त्यांच्या चेहेऱ्याला लपवणें अशक्य झालें होतें-)

## सरहद्द प्रांतांत जीव अडकला

३ जूनला सकाळी पुन: थोडें वादळ निर्माण झालें. कॉंग्रेसतर्फे योजना स्वीकृतीच्या आलेल्या पत्रांत दोन परिच्छेद विशेष होते. त्यांतला एक डोमिनिअन स्टेट्ससंबधीं होता व दुसरा- वायव्य सरहद्द प्रातासंबंधीं होता. पहिल्या परिच्छेदात कॉंग्रेसनें अशी मागणी केली होती कीं, जर हिंदुस्याननें कॉमनवेल्थमधून बाहेर पडण्याचें ठरवलें तर पाकिस्तानलाहि कॉमनवेल्थमध्यें रहाण्यास ब्रिटननें मंजुरी देऊं नये. दुसऱ्या परिच्छेदांत कॉंग्रेसनें अशी मागणी केली होती की, वायव्य सरहद्द प्रांतांत होणाऱ्या सार्वमतांत तो प्रात हिंदुस्थानात जावा की, पाकिस्तानात जावा एवढाच पर्याय न ठेवतां- त्या प्रांताला स्वतंत्र रहाण्याचीहि मुभा ठेवावी. याचें कारण असें होते कीं, खानसाहेबानीं या वेळेसच स्वतंत्र पठाणिस्तानाची मागणी केली होती.

या दोन मागण्या पाहून महमदअली जीना म्हणाले-

"The trouble with the Hindus is that they always try to get seventeen annas for their Rupee." (या हिंदूना त्रासदायक खोडच आहे की, आपल्या रुपयाचे नेहमीं त्यांना सतरा आणे हवे असतात—)

जीनासाहेबांचे हे उद्गार यथार्थच होते असें म्हणावें लागतें. कारण कॉंग्रेसच्या दोन्ही मागण्या खरोखर मूर्खपणाच्या होत्या. भारत कॉमनवेल्यमधून बाहेर पडल्यास तसें करण्याचा त्याला अधिकार होता. परंतु त्याचा पाकिस्तानच्या कॉमनवेल्थमध्यें रहाण्या न रहाण्याशी खरोखर काय संबंध? पाकिस्ताननें त्यांना योग्य वाटेल तें करावें, हीच रास्त भूमिका होती. परतु पाकिस्तान-भारताचे संबंध जुळया भावासारखे आहेत असें सिद्ध करण्याचा हा एक पोरकट प्रयत्न होता. दुसऱ्या मागणीचीहि तीच तऱ्हा! वस्तुत: पहिल्या माउंट बॅटन योजनेप्रमाणें सर्व प्रातांनाच स्वातंत्र्य देण्याची योजना होती. देशांत अनर्थ माजेल या सबबीवर नेहरूंनीं ती फेटाळण्यांत योग्य तेंच केलें. परंतु असे असतांना फक्त सरहद्द प्रांतालाच ही स्वतंत्र रहाण्याची मुभा देणें म्हणजे फेटाळलेलेंच तत्व सोईखातर एका प्रांताला लावा असें सागण्यासारखें होतें. कॉंग्रेसमध्यें राहिलेल्या आणि कॉंग्रेसवर विश्वास टाकलेल्या खानबधू आणि लाल डगलेवाले यांचा कॉंग्रेसनें फाळणी मान्य करून जो विश्वासघात केला त्यावर थोडी रंगसफेती या मागणीद्वारें करण्याचा हा एक धूर्त प्रयत्न होता. फाळणी करायला बसल्यानंतर खानबंधूचा विश्वासघात केल्याची रुखरुख टोंचत राहील हें काय कॉंग्रेसी पुढाऱ्यांना आधीं कळत नव्हतें की काय? परंतु प्रत्येक बाबतींत अर्धवट विचार, मग त्यांतून दगली आणि शेवटीं सुचणारें शहाणपण हेंच कॉंग्रेसी नेत्यांच्या विचारसरणीचें व्यवच्छेदक लक्षण होतें.

माउंट बॅटन आणि व्ही पी. मेनन यांनी अशाच युक्तिवादानें कॉंग्रेसला हे दोन्ही परिच्छेद मागें घेण्यास भाग पाडले.

कॉंग्रेसकडून अशी कांहीतरी सूचना सरहद्द प्रांताबाबत येणार हें तर्कानें जाणून त्याला काटशह म्हणून जीनानीं बंगाल प्राताला स्वतंत्र रहायचें आहे किंवा काय यासबधीहि सार्वमत घेण्यांत यावें अशी मागणी, योजना स्वीकृतीच्या पत्रात दाखल केली होती. परतु माउंट बॅटन यानी जीनाना अशी मागणी पुढें आली तर सारेंच ऑफस होईल याची जाणीव दिली आणि ही मागणी जीनासाहेबांनी मागें घेतली.

## सरदारजी, कुछ बोलो ना

"या सर्व प्रकरणांत जर खरोखर कुणी नुसती मान डोलावण्यापलिकडे कांही बोलणें अगत्याचें होतें तर तें बलदेवसिंग यानीं-" असें सांगून मोस्ले लिहितो—

"परंतु बलदेवसिंग हे कांहीं मोठेसे विचारी नव्हते. त्याना आपली जबाबदारीहि नीट जाणवलेली नव्हती. शीख जमात पंजाबभर पसरलेली होती आणि पंजाबची फाळणी निश्चित होती. शिखांची गुरुद्वारें आणि धर्मस्थानें पश्चिम पंजाबातच अधिक होती. कुठल्याहि स्वाभिमानी शीख माणसानें दूरवर विचार करता पंजाबची फाळणी स्वीकारली नसती.

माउट बॅटन यांनीं या बैठकीच्या वृत्तांतांत लिहिलें आहे-"पंजाबची फाळणी करतांना शिखाच्या हितसंबंधांचा विशेष विचार व्हावा अशी बलदेवसिंगानी मागणी केली आणि मीं ती फेटाळली-"

बस्स! एवढाच काय तो बलदेवसिंगाचा उल्लेख आणि त्यांच्या कर्तृत्वाचा कागदोपत्री आलेख!

बैठक संपल्यावर दि. ३ जूनला ऑल इंडिआ रेडिओवरून भाषणाचा कार्यक्रम मुक्रर झाला. माउंट बॅटन या वेळच्या घटनेसबंधी लिहितात—

"मीं सर्व पुढाऱ्यांना योजनेच्या प्रति दिल्या. त्याच्या बैठकीतील प्रतिक्रिया पहातांना मला एक गोष्ट समजून चुकली होती कीं, यांतून काय कटकटी निर्माण होणार आहेत याचा विचारदेखील कुणाला अस्वस्थ करीत नव्हता. परंतु होते आहे तें ठीकच असा माझा विचार झाला. कारण हें सर्व असेच बिनघोर राहिले तर पुढील वाटाघाटींत व्हॉईसरॉयपदाचा वरचष्मा राहूं शकेल हें मला ठाऊक होतें.-"

या विधानावरून एक गोष्ट लक्षांत येते की, दूरवर विचार हा जसा शिखांना माहीत नव्हता तसाच तो किती कॉंग्रेसी पुढाऱ्यांना माहीत होता हें परमेश्वरच जाणें!

## तीन जूनची आकाशवाणी

३ जूनची सायंकाळ उजाडली. एका पाठोपाठ एक पुढाऱ्यांची भाषणें रेडिओ प्रसृत करूं लागला.

माउंट बॅटन प्रास्ताविकांत म्हणाले--

" शंभरांहून अधिक वर्षे भारतीय जनता एकत्र रहात आहे. परंतु भारताची एकता कायम ठेवून स्वातंत्र्य देण्याची एकहि सर्वमान्य योजना निघू शकली नाही. ज्या भूभागांत विशिष्ट जमात बहुसंख्येंत आहे अशा दोन निरनिराळ्या भूभागाना एकत्रच रहाण्याची सक्ति करणें योग्य ठरणार नाही. ही सक्ति टाळायची तर एकच पर्याय उरतो आणि तो म्हणजे फाळणी- "

नेहरूंचें भाषण भावना हेलावण्याप्रसगीं नेहमी उत्कृष्ट होतें तसाच या वेळीहि अनुभव आला. पंडितजी म्हणाले--

" मी देशबांधवांना ही योजना स्वीकारण्यास सागत आहे. परंतु असें करतांना माझा आनंद हरपलेला आहे. असें जरी असले तरी प्राप्त परिस्थितीत हाच एक, त्यातल्या त्यात चांगला मार्ग आहे अशी माझी खात्री पटली आहे. महान कार्ये अगावर पडलेली आम्ही लहान माणसें आहोंत. परंतु मुळांत कार्याचे स्वरूप महान असल्यामुळें काहीं मोठेपणा आम्हाला चिकटला आहे एवढेंच ! ( we are little men raising great cause; but because the cause is great some of that greatness falls upon us also. )

वस्तुत: जीनांचा हा विजयाचा क्षण होता. परंतु या क्षणीं आपण हुरळून गेल्याचा संशय उत्पन्न होण्यात धोका आहे हें जीना जाणून होते. नेहमींप्रमाणें त्यांनीं अत्यंत कोरडेपणानें आणि थडपणानें आपलें भाषण केलें--

" जी योजना ब्रिटिश सरकारनें आपल्यापुढें ठेवली आहे ती आपण तडजोड म्हणून स्वीकारणार आहोंत की न्याय्य म्हणून स्वीकारणार आहोंत हें आपण ठरवावयाचें आहे. पाकिस्तान झिंदाबाद--! "

बलदेवसिंग म्हणाले-- " ही फाळणीची योजना प्रत्येकाचें समाधान करूं शकत नाहीं. शीखाचें समाधान ही योजना करू शकलेली नाहीं. परंतु तरीहि ती अगदी टाकावू नाही. आणि आपण ती तशीच स्वीकारावयास हवी-- "

झाले ! अखेर फाळणी सर्व हिंदी पुढाऱ्यांनीं स्वीकारली. लंडन-मध्यें ब्रिटिश मत्रिमडळाने ती स्वीकारली. विन्स्टन चर्चिल आणि कॉन्झर्वेटिव्ह सभासदांनीहि ही योजना स्वीकारली. मोस्लेनें विचारलें आहे--

**" पण यांपैकीं किती जणांना आपण काय करीत आहोंत याची जाणीव होती-- ? "**

चार जून १९४७ ला लॉर्ड माउटबॅटन यांनी दिल्लींत जाहीर केलें--फक्त नऊ आठवड्यात म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ला सत्तादान करण्यांत येईल. म्हणजे ठरलेल्या मुदतीपेक्षां जवळजवळ दहा महिने अगोदरच माउट बॅटन यांनी सत्तादानाचा मुहूर्त मुक्रर केला.

## सैन्याची फाळणी

दोन स्वतत्र राष्ट्रें जन्माला घालायचीं म्हणजे हिंदी सैन्याचें विभाजन अटळ होतें. यावेळीं हिंदी सैन्याचे अधिपति होते. फील्ड मार्शल क्लॉड् ऑकिनलेक. सैन्याच्या शिस्तीखातर यानीच युध्दसमाप्तीनंतर सुभाषबाबूंना मिळालेल्या सैन्यातील अधिकाऱ्यांवर लाल किल्यांत खटले भरले. जें सैन्य ब्रिटिशाशी इमान ठेवून वागले त्याच्या प्रतिष्ठेखातर हे खटले आवश्यक होते असें त्यांचें लष्करी मत असणें स्वाभाविक होतें. परंतु ज्या उद्देशानें ऑकिनलेकनीं हा उद्योग आरंभला त्याचा पार विचका झाला. पंडित नेहरूनीं, भुलाभाईंनी बॅरिस्टरचे झगे अगावर चढवलें आणि ज्याना गुन्हेगार म्हणून पिंजऱ्यांत आणले ते भारतीय जनतेच्या नजरेंत स्वातत्र्य सैनिक ठरले.

लॉर्ड माउंट बॅटन आणि इस्मे यांनीं अशी सूचना प्रथम केली. पाकिस्तान-भारत ही राष्ट्रें स्वतत्रपणें व्यवहार करूं लागली तरी कांही काल सैन्याचें विभाजन करूं नये. तें मागाहून सावकाशीनें करावें. यामुळें लष्करी सत्ता अबाधित राहील व दंगली होण्याचा संभव कमीत कमी राहील. परतु पंडित नेहरू आणि जीना या दोघानी या सूचनेविरुद्ध गिल्ला उडवला. दोघानी अशी मागणी केली कीं, १५ ऑगस्टलाच दोन्ही देशांना आपआपलीं सैन्यें ताब्यात मिळाली पाहिजेत.

ऑकिनलेक याचा सैन्य विभाजनाला सक्त विरोध होता. त्यांनीं या गोष्टीला इस्मे यांना नकार दिला. परंतु माउंट बॅटन याना जीना-नेहरू याना दुखविण्याची इच्छा नव्हती. त्यानी आकिनलेक यांना सैन्याची फेररचना करण्यास फर्मावलें.

वस्तुत: ऑकिनलेकच्या खालोखाल सैन्यांत महत्त्वाचें पद भूषविणारे जनरल टुकर यांनीं युद्ध संपतांच भारताची फाळणी झाली तर काय करावे यासबधीं जें टिपण तयार केलें होतें त्यात सैन्याच्या विभाजनाचा सपूर्ण विचार १९४५ सालीच संपूर्ण दिलेला होता. परतु सैन्य विभाजनाचा विचारच ऑकिनलेक याना सहन होऊन न शकल्यामुळें हें टिपण केराच्या टोपलींत गेलें आणि ऑकिनलेक यांनी पुढच्या १८ महिन्यात नुसत्या झोंपा काढल्या. याचा परिणाम म्हणून माऊट बॅटन याचा हुकूम सुटतांच ऑकिनलेक यांची तारावळ उडाली.

मोस्ले यानी लिहिलें आहे--

" या क्षणापासून ऑकिनलेक यांना एकच काळजी वाटत होती की, सत्तादानानंतर भारतातील ब्रिटिश लोकांचें काय होणार ? स्वातत्र्य पदरांत पडताच गोऱ्याच्या कत्तली सुरु होतील अशी त्यांची खात्री होती. खरोखर असा भलताच समज त्यानी उराशीं का बाळगावा हें समजणें कठीण आहे. "

या भीतिपोटी ब्रिटिश सैन्य १ जानेवारी १९४८ पर्यंत भारतांत व पाकिस्तानात ठेवावे अशी त्यानी माउट बॅटन यांना सूचना केली. याला इस्मे यानी व्हॉईसरॉयच्या वतीने उत्तर पाठविलें. त्यांत ते लिहितात--

" आपली सूचना स्वीकारावी तर या सैन्यावर अधिकार ब्रिटिश सरकारचा असणार व ही गोष्ट स्वतत्र भारताला वा पाकिस्तानला मंजूर होणार नाही. येथील ब्रिटिश जनतेच्या सुरक्षिततेसाठी हें आवश्यक आहे असेहि म्हणतां येत नाही. कारण एकतर ब्रिटिशाची उरलेली सख्या अत्यत अल्प असेल व त्याच्या जीवित सरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी स्वतत्र झालेल्या उभय देशांची राहील-- उलट माउंट बॅटन याची अशी इच्छा आहे कीं, जितक्या लवकर ब्रिटिश सैन्य दोन्ही देशातून मायदेशी पाठवता येईल तेवढें चागले. कारण त्याचा राजकीयदृष्ट्या उत्तम परिणाम होईल. यासंबंधी तुम्हांला कांही चर्चा करावयाची असल्यास आपण केव्हांहि बोलावल्यास मी येऊं शकेन. सदैव आपला इस्मे. "

या पत्राला ऑकिनलेक यानीं २० जून १९४७ रोजी मासलेवाईक उत्तर दिलें. त्यांतला महत्त्वाचा भाग मोस्ले यांनीं दिला आहे.--

"प्रिय इस्मे,

आपल्या दि. १८ जूनच्या पत्राबद्दल आभारी आहे. मीं पाठविलेली सूचना व्हॉईसरॉय यांचा जबाबदार सल्लागार या नात्यानें केलेली होती. भारताचा सांप्रतचा कमांडर इन चीफ् या नात्यानें देशात कायदा आणि सुव्यवस्था राखणें ही माझी जबाबदारी आहे. मीं जो सल्ला दिला आहे त्यापासून मी ढळूं इच्छित नाही. अर्थात् तो मानणें न मानणें हा व्हॉईसरॉय यांच्या मर्जीचा प्रश्न आहे हें मला माहीत आहे. ही सवस्वी त्यांची जबाबदारी आहे. आणि त्याच्या निर्णयावर वक्तव्य करणें हे माझें काम नाहीं. त्यांचा निर्णय मी मानीन, कारण तें माझें कर्तव्य आहे.

माझी अशी विनति आहे की, मी दिलेला सल्ला नोंदवून घेण्यांत यावा. आणि तो ब्रिटिश सरकारला व्हॉईसरॉय यानी आपल्या निवेदनांतून कळवावा— ऑकिनलेक."

माउंटबॅटन यानी आपला निर्णय फिरवला नाही. परतु १५ ऑगस्टनंतर ब्रिटिश सैन्य इथें रहावें का असा प्रश्न त्यांनीं लीग आणि काँग्रेस पुढाऱ्याना विचारला. लियाकतखानानी उत्तर पाठविलें कीं, पाकिस्तान या सूचनेचा सहानुभूतीने विचार करू शकेल. परतु नेहरूनी कळवले—

"I would sooner have every village in India put to flames than keep the British Army here after August 15 th—"

("भारतांतील प्रत्येक खेड्यापाड्याला आग लागली तरी चालेल. परतु हें टाळण्याकरता १५ ऑगस्टनंतर मला भारतात ब्रिटिश सैन्य असलेलें चालणार नाही."

मोस्ले सांगतो— "वाक्यावरची शाई वाळण्यापूर्वीच नेहरूंना या उक्तीचा पश्चात्ताप करण्याची पाळी आली."

## मॉउंट बॅटनचे दोन ध्वज

मोस्ले यानीं यापुढील काही दिवसातील गमतीदार घटना नमूद केल्या आहेत—

"इंडिया ऑफिस लडनकडून तार आली—

ड्राफ्ट बिलांत Esquire एस्क्वायर हा शब्द कुणापुढें लावायचा तें कळवा. पटेल व बलदेवसिंग हे सरदार आहेत. झहीर यांच्या नांवा मागें सय्यद लावायचें, प्रसाद आणि मथाय हे डॉक्टर आहेत. नेहरूंच्या नांवामागें पडित म्हणायचें. राजगोपाळाचारींच्या मागें नुसतें श्री. म्हणायचे. परंतु शरद बोस आणि असफअल्ली यांच्या नावाच्या पुढें मागें काय लावायचे तें कळवा—"

अॅवेल यानीं कळवले—"सर्व उपाध्या बरोवर आहेत. बोस व असफअल्ली याच्या नावापुढे Esquire चालेल."

दोन्ही डोमिनिअनचा उल्लेख ड्राफ्ट बिलात—टू इडियन डोमिनिअन्स असा होता. जीनानी राग प्रदर्शित केला.

"दोन्ही इडियन डोमिनिअन्स कशी—?" बिलात काटछाट झाली. नुसताच 'डोमिनिअन्स' असा उल्लेख झाला.

माउट बॅटन हे फावल्या वेळांत वशावळी लावीत. बसत त्याचप्रमाणें इतरहि नाना उद्योग करीत. त्यानीं पाकिस्तान व भारताकरता—दोन राष्ट्रध्वज तयार केले. या दोन्ही ध्वजांच्या कोपऱ्यांत एकनवमांश भागांत युनिअन जॅक दाखवलेलें होतें. या दोन प्रतिकृति त्यांनीं जीना व नेहरू याना पाठवल्या.

जीना यानीं ताड्कन उत्तर दिलें की, आमच्या ध्वजावर चांदाबरोबर क्रॉस दिसला तर मुसलमानाच्या धार्मिक भावना दुखावतात तेव्हां हा ध्वज आम्ही कधीहि स्वीकारणार नाही.

नेहरूनी काँग्रेसनें तयार केलेला अशोकचक्रासहित सध्याचा राष्ट्रध्वज माउट बॅटन याना पाठवून दिला.

## —मेननची कुशंका—

लडनमध्यें इडिया ऑफिसमध्यें सत्तादानाचे विधेयक तयार होत होतें. एकदर चाललेल्या प्रकारावरून व्ही. पी मेनन याना असा सशय आला की, माउट बॅटन यानीच दोन्ही डोमिनिअन्सचे पहिले गव्हर्नर जनरल असावे अशी पाकिस्तान व भारत याची इच्छा असणार, असें गृहीत धरून सगळ्या गोष्टी आखण्यात येत आहेत.

व्ही. पी. यानी असें सुचविले की, यासबधी निदान जीनासाहेबांकडून खात्री करून घेणे इष्ट आहे. मोस्ले सागतो—

"व्ही. पी. मेनन याची ही सूचना अगदीं योग्य होती. कारण पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल कोणी असावे या सबंधात माउट बॅटन याना पुढें विलक्षण धक्का देणारा अनुभव आला."

काँग्रेस यापूर्वीच शब्द देऊन चुकलेली होती. १७ मे १९४७ ला माउट बॅटन लडनला निघण्यापूर्वी नेहरूनी माउंट बॅटन याना लिहलें होतें—

"आम्हाला (काँग्रेसला) ही सूचना मान्य आहे की, डोमिनिअन स्टेट्स या मध्यतरीच्या अवस्थेंत दोन्ही डोमिनिअन्सचा गव्हर्नर जनरल एकच रहावा. आमच्यापुरतें सागायचें तर आपणच हें पद स्वीकारल्यास आम्हाला ती गोष्ट आनददायकच होईल. कारण त्यामुळें आपल्या अनुभवाचा व सल्ल्याचा आम्हाला उपयोग होईल—"

माउट बॅटनना तर दोन्ही देशांचे पहिले गव्हर्नर जनरल होण्याची कल्पना अत्यत सुखदायक वाटली.

मोस्ले लिहितो— "भावी इतिहासांत भारत खडाला स्वातंत्र्याचा मार्ग देणारा केवळ शिल्पकार म्हणून नव्हे तर त्यांचा पहिला गव्हर्नर जनरल या नात्यानें त्याचें सुरुवातीचें सगोपन करणारा म्हणून आपलें नाव झळकणार ही कल्पना त्याना घेरू लागली. अशीच इच्छा पाकिस्तानी नेत्याकडूनहि प्रदर्शित होईल असा त्याना विश्वास वाटत होता—"

परंतु १७ मेलाच जीना यांनी दोन्हीं डोमिनिअन्सना एकच गव्हर्नर जनरल असावा ही सूचना फेटाळून लावली होती. परंतु असें करताना त्यानी जी सूचना केली ती पाहण्यासारखी आहे. जीना माउट बॅटन यांना म्हणाले—

"आपल्या नि:पक्षपातीपणाबद्दल मला यत्किंचितहि शका नाहीं. आणि तुम्हीं दिलेले निर्णय आम्हीं बिनतक्रार मानू. माझी अशी इच्छा आहे कीं, आपण ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी म्हणून (सुप्रीम आरबिट्रेटर) भारतातच रहावें. कारण आम्हाला तुमची जरूरी वाटते."

माऊंट बॅटननी धूर्तपणें जबाब दिला.—

" तुमची सुप्रीम आरबिट्रटरची सूचना ही व्यक्तिशः मला गौरवास्पद असली तरी ती ब्रिटिश सरकार स्वीकारण्याचा सभव नाही. त्यामुळें गव्हर्नर जनरलपदाला बाध येईल. तुम्हीं मला इतकें आश्वासन तरी जरूर द्यावयास हवे की, जर सुप्रीम आरबिट्रेटरची स्थापना ब्रिटिश मत्रिमडळाला योग्य वाटली नाहीं तर तात्पुरती योजना म्हणून दोन्ही डेमियन्सना एकच गव्हर्नर जनरल असण्यास आपली हरकत नाही."

जीनाच्या हे तत्क्षणीं लक्षांत आले की, माउट बॅटन घाईघाईने आपल्याकडून भलतीच कबुली मागत आहेत. त्यानी काढता पाय घेतला. जीनानी सागितले की यावर विचार करावा लागेल. परतु दि. १९ मेपर्यंत सर मेलव्हिल याना निर्णय पत्राने कळवूं.

## माउंट बॅटनना जीनांचा जमालगोटा

माउंट बॅटन १७ मेला लडनला गेले. १९ मे उजाडला आणि मावळला. जीनाचें उत्तर गुलदस्तातच राहिले. जीना-लियाकतअली-सर मेलव्हीलला दाद देईनात.

व्हॉईसरॉय परतहि आले तरी पाकिस्तानचा गव्हर्नर जनरलचा प्रश्न लोंबकळतच होता. डोमिनिअन्सचे गव्हर्नर जनरल होण्याच्या कल्पनेने माउट बॅटन इतके भारले होते कीं, कांहीं करून जीनाचें मन पळविण्याचेंच त्यांनी ठरवलें. मोस्ले सांगतो.–

" It should surely have been obvious to him by this time that Jinhah, selfish, proud, jealous was going to allow no such thing–but Mountbatten persisted–

(खरें पहातां जीनांसारखा स्वार्थी, मिजासखोर, दीर्घद्वेषी माणूस ही गोष्ट कदापि मानणार नाही ही गोष्ट माउंट बॅटन याच्या लक्षांत येण्याइतकी उघड झालेली होती. परतु त्यांची आशा सुटत नव्हती."

२० जूनला अखेर कटाळून इस्मे-मेलव्हील या दुकलीने लियाकत अलीखानाची भेट घेतली. दोन्ही देशांना सुरुवातीच्या काळांत एकच गव्हर्नर जनरल असण्याचे फायदे त्यानीं लियाकत अलीखानाना ऐकवले. परंतु जीनांच्या मनांत काय होतें याचा लियाकतना तरी कुठे अंदाज होता? जीना कधीच कुणाहि सहकाऱ्याला विश्वासात घेत नसत. आणि त्याच्या सल्यानें तर कधीच वागत नसत. ही भेट फुकट गेली.

२३ जून उजाडला. व्हॉईसरॉयनी जीनाना भेटीला बोलावलें. ताकाला जाऊन भाडें लपवणें आतां व्हॉईसरॉय व जीना या दोघानाहि अशक्य होतें. जीनानी सांगितलें.–

" so far as the decision I shall reach is concerned, I hope it will not be interpreted as not wanting your Excellency in whom I have implicit trust and confidence. But it is a rule of my life that I must always consider the interests of my people. At various times in my life I have had to pass over those nearest and dearest to me. But I have my duty to do–"

(मी जो निर्णय घेण्याचें ठरवलें आहे त्याचा अर्थ आम्हांला तुम्ही नको आहांत असा घेतला जाऊ नये. तुमच्यावर माझा पुरेपुर विश्वास आणि श्रद्धा आहे. परतु माझ्या जीवनाच्या नियमानुसार माझ्या जमातीचें हित हेंच मीं प्रथम पाहिलें पाहिजे. यामुळें माझ्या आयुष्यांत असे अनेक प्रसंग आले की, जे लोक मला अत्यंत जवळचे व प्रिय होते त्याच्या मनाविरुद्ध मला जावें लागलें. परंतु मी कर्तव्य सोडूं शकत नाहीं.)

एवढ्या लांबलचक प्रस्तावनेनंतर जीनानी सागितलें काय तर माझा निर्णय मी दोन-तीन दिवसात कळवतों.

या मुलखतीलाहि नऊ दिवस उलटले. जीनाचा निर्णय आला नाहीं. २ जुलै १९४७ ला जीनानी निर्णय कळवला की, ते स्वःच पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल होऊं इच्छितात ! माउट बॅटन याचें दिवास्वप्न सरलें. परतु त्याची दुबळी महत्त्वाकाक्षा पुरती ठेचली गेली नव्हती.

भोपाळच्या नवाबावामार्फत २ जुलै ४७ ला माउट बॅटन यानी जीनाना फेरविचार करण्याची विनति केली.

५ जुलैला लियाकत अलीखानानी पत्राने माउटबॅटन यांना पुन: कळवलें की, जीनानी फेरविचार करून पाहिला, परतु व्हॉईसरॉयनी, पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल म्हणून लडनला मइमदअली जीना याचेंच नाव कळवावें हाच विचार पक्का आहे. या पत्रात लियाकतनी एक पुस्ती मात्र अशी जोडली–" आम्हाला मात्र अशी आशा आहे कीं आपणच भारताचे पहिले गव्हर्नर जनरल रहावें."

या धाष्टर्याला काय म्हणावें ! आमचें हित आम्ही पाहूं आणि तुम्ही हितकर्ते असाल तर भारतांत राहून तुम्ही आमचे हित पहाल ही आशा आहेच !

४ जुलैलाच ब्रिटिश पार्लमेंटमध्यें भारताच्या स्वातंत्र्याचें विधेयक माडले गेलें होतें. दि. ७ जुलैला गव्हर्नर जनरलपदाची नावें घेऊन इस्मे विमानानें लंडनला गेले. ॲटली, चर्चिल, सहावे जॉर्ज यांच्या गाठीभेटी घेऊन माउंट बॅटन यांनाच भारताचे गव्हर्नर जनरलपद स्वीकारण्याची परवागी त्यांनीं काढली.

ब्रिटिश पार्लमेंटनें दोन आठवड्याच्या चर्चेनतर भारताच्या स्वातंत्र्याचें व पाकिस्तानच्या जन्माचें विधेयक मजूर करून त्याला कायद्याचें रूप दिलें. या नवजात डोमिनिअन्सच्या गव्हर्नर जनरल पदासाठीं दोन नावें मुक्रर झालीं. लॉर्ड माउट बटन आणि कायदे आझम महंमदअली जीना ! !

● ● ●

[ अपूर्ण ]

वास्तविक याच अंकांत मोस्ले-पुस्तक-परिचय संपायला हवा होता पण अनेक वाचकांनीं समक्ष भेटून वा पत्रद्वारें विनंती केली कीं दोन भागांत आटपण्यासाठीं परिचय त्रोटक करूं नये. या विनंतीला मान देण्यासाठीं व विषयाचें महत्त्व लक्षांत घेऊन परिचयाचा तिसरा व शेवटचा हप्ता आक्टोबर अंकासाठीं राखून ठेवण्यांत आलेला आहे.

— संपादक.

# आयुष्मान् भव....!

## तुमच्या दीर्घायुष्याची वाटचाल

पु. ना. ओक

लेखांक दुसरा

सर्वसाधारण व्यक्तींची अशी कल्पना झालेली असते कीं, एकदां वार्धक्य येऊं लागलें म्हणजे पुन्हा तरुण होणें अशक्य होय. परंतु हा समज चुकीचा आहे. याबाबतींत एका लहान मुलीनें आपल्या आजीस एक मोठा मार्मिक प्रश्न विचारला. तो असा कीं, "का गं आजी, माणूस कोणत्या वयापासून म्हातारा होऊं लागतो ?" ह्याला एक निश्चित असें उत्तर नाहीं. याचाच अर्थ असा कीं, म्हातारपण हें वयावर अवलंबून नसून आंतरिक प्रकृतीवर अवलंबून असतें. जाड भिंगांचा चष्मा लावणारा आजचा आठ वर्षांचा मुलगा हा सिंहगडावर अपरात्रीं समशेर गाजवणाऱ्या शेलारमामाहून प्राकृतिक दृष्टया अधिक म्हातारा ठरेल.

ह्याच मुद्याचा आपण दुसऱ्या रीतीनें विचार करूंया. समजा, आजपासून आपण खूप चहा पिऊं लागलों, दारू–धूम्रपान ह्यांच्या आहारी गेलों, नाटक–जलसे–रेडिओ यांच्या मैफलींत दंग होऊन रात्रीच्या रात्रीं जागून काढूं लागलों तर आपण म्हातारे म्हातारे होत भर्रकन् मृत्यूच्या आहारीं पडूं. ह्याचे उलट आपण दूध पिऊं लागलों, व्यायाम सुरूं केला, पहाटे लवकर उठलों, रात्रीं लवकर निजलों तर आपण सशक्त व तरुण होत जाऊं. ह्यावरून हा निष्कर्ष निघतो कीं, आरोग्यकारी आचार ठेवला तर वार्धक्य येण्याचें कारण नाहीं. अनैसर्गिक आचरण सतत चालूं राहिलें तरच वार्धक्य येऊं लागतें. वार्धक्य अनैसर्गिक आचरणाने आलें तर नैसर्गिक आचरणानें नष्ट झालें पाहिजे हें त्याचबरोबर सिद्ध होतें.

दुसऱ्या एका बाजूनें ह्या प्रश्नाकडे पाहिलें तरी हाच निष्कर्ष निघतो. लहानपणीं असलेलेच अवयव म्हातारपणींही आंतून, बाहेरून सर्व शाबूत असतात. त्यांतला कोणताहि भाग कमी झालेला नसतो. मग ती व्यक्ति वृद्ध का दिसावी ?

शास्त्रीय प्रयोगशाळेंचेंहि उदाहरण घेऊंया. प्रयोगशाळेंत दोन स्टोव्हवर सारख्या उष्णतेवर समान पाण्याचीं भांडीं तापत ठेवलीं तर दोघांचें तापमान सारख्या प्रमाणांतच वाढायला हवें, तद्वत एका घरांतलीं, एका कुटुंबांतलीं तेंच अन्न खाणारीं मुलें मात्र सशक्त व उत्साही व्हावींत आणि प्रौढ व्यक्ती रोगजर्जर आणि दुर्बल होत जाव्यात हें का ?

भौतिक शास्त्राचा असा एक सिद्धांत आहे कीं, एकाद्या वस्तूस एकदां का गति मिळाली कीं ती अखंड घरंगळतच गेली पाहिजे. ती जर तशी फिरत राहिली नाहीं तर त्याचा अर्थ तिच्या गतीला कसलातरी विरोध होत असला पाहिजे. हेंच तत्त्व मनुष्याच्या शरीरप्रकृतीला लागू करून आपण असें म्हणूंया कीं, एकदां तरणाबांड व सशक्त झालेला मनुष्य तसा रहात नाहीं ह्याचें कारण त्याच्या प्रकृतिस्वास्थ्यास कसलातरी अडथळा होत असला पाहिजे. तो अडथळा जर निघाला तर ती व्यक्ति पुन्हा वृध्दत्वांतून जोमदार झाली पाहिजे.

प्रत्येकाच्या आयुष्यासंबंधीं व शरीर प्रकृतिसंबंधीं शारीरशास्त्रदृष्टया दुसरी एक गोष्ट सूक्ष्म निरीक्षणानें स्पष्ट होते. ती अशी कीं, शक्तिसंवर्धन आणि नंतर शक्तिक्षय व मरण हीं एखाद्या कमानीप्रमाणें रेखीव कधींच असणार नाहींत. कल्पना करा कीं, एकादी व्यक्ति ७४ वर्षें १० महिने, १२ दिवस व १० तास एवढें आयुष्य कंठून दिवंगत झाली. या व्यक्तीच्या प्राकृतिक स्वास्थ्याचें रेखांकन (Graph) करायचें असलें तर असें कधींच होणार नाहीं कीं, एखाद्या इंद्रधनुष्याप्रमाणें ३७ वर्षें, ४ महिने, ६ दिवस व ५ तास या व्यक्तीच्या आयुष्याची चढती कमानच राहिली व त्यानंतर पद्धतशीर उतरंडीनें गणिती हिशेबानें, उत्तरार्ध संपल्यावर तो मरण पावला.

### आयुष्याचा ग्राफ

त्या व्यक्तीच्या आयुष्याचा Graph हें दर्शवील कीं तिसऱ्या वर्षींच ती व्यक्ति अचानक मृत्युसन्निध पोंचली होती. नंतर पुन्हा सशक्त होत होत पुन्हा २३ वें वर्षीं पुन्हा नवज्वरानें पछाडली जाऊन मरते कीं जगते अशी धागधुग उत्पन्न झाली. अशा तऱ्हेनें मध्यम वा अल्पवयांत माणूस सशक्तच असला पाहिजे व मध्यम वयानंतर दुर्बलच होत गेला पाहिजे असें म्हणणें चुकीचें होईल. आरोग्याचे नियम डावलले तर वार्धक्य व मरण जवळ येऊं लागेल. पुन्हां कांटेकोरपणें आरोग्याचे नियम पाळले तर मरण दूरदूर पळूं लागेल. जी गोष्ट मरणाची तीच वार्धक्याची. ह्यावरून आपणांस असा निष्कर्ष काढतां येईल कीं, सूक्ष्मदृष्टया पहातां आयुष्यभर मनुष्य कधीं म्हातारा, कधीं पुन्हा तरुण होत असतो.

जीवन किंवा जिवंतपणा (व पर्यायानें तारुण्य, सौन्दर्य आरोग्य, उत्साह, शक्ति) हें काटेतोल तराजूप्रमाणें असतें. ज्या पारड्यांत भर घालावी तें झुकेल. जीवनास पोषक परिस्थिति जेव्हां जेव्हां मिळत जाईल तेव्हां तेव्हां शक्ति वाढेल किंवा निदान शक्तिक्षय होणार नाही. परिस्थिती जेव्हां जव्हां मिळत जाईल तेव्हां जीवनास घातक असलेली किंवा पोषक नसलेली वागणूक ठेवली तर म्हातारपण म्हणजेच ऱ्हास व मृत्यु ओढवेल.

किंबहुना सोनें तोलण्याच्या नाजूक तराजूप्रमाणें आपल्या प्रकृतींत शरीरांतील शक्ति व जोम वाढवारे किंवा नष्ट करणारे सूक्ष्म फेरबदल सतत चालू असतात. व्यक्ति झोंपली तरी हृदयाचे ठोके पडणें, श्वासोच्छ्वास, पचनक्रिया आणि मेंदूची काही कामें चाललेलीच असतात.

तसेच ऊन, वारा, पाऊस, थंडी, आहार-विहार, भाषण, झोंप विश्रांति, धूळ इत्यादीचा शरीराच्या आंतील व बाहेरील भागावर सतत परिणाम होत असतो. म्हणून कोणत्याहि क्षणी शरीरप्रकृति स्थिर असते असें कधींच म्हणता येणार नाही. जे असें समजतात कीं सर्व नाशवंत वस्तूंना उत्पत्ति, स्थिति व लय अशा तीन अवस्था असतात त्यानी निदान शरीरयंत्राबाबतीत तरी वरील परिस्थिती समजून घ्यावी. शरीराचे आंतरिक व्यवहार हे दरक्षणीं त्यांची ( Cumulative effect अथवा resultant ) गोळाबेरीज पहातां शरीरास पोषक किंवा मारक होता असतात. या चांगल्या किंवा वाईट प्रतिक्रिया (शोधक नजर ठेवल्यास) सूक्ष्म असतांहि त्या व्यक्तीस किंवा इतरांस कळू शकतात. अर्थात ऱ्हासकारी प्रतिक्रिया दिसतांच त्याच्या योग्य उपायास लागले तर म्हातारपणाचा घसरतां गाडा पुन्हा तारुण्याच्या राजमार्गावर आणतां येईल.

माणसाच्या आवाक्याबाहेरील कित्येक गोष्टी माणसाच्या शारीरिक ऱ्हासास व मरणास कारणीभूत होतात खऱ्या. परंतु शेंकडा नव्याण्णव माणसे स्वतः जाणूनबुजून, अज्ञानानें, निष्काळजीपणानें आपला शारीरिक ऱ्हास घडवून आणतात.

ज्यास सर्व प्रकारच्या सुखसोयीं उपलब्ध आहेत, इच्छा आहे व भगिरथ प्रयत्न करण्याची तयारी आहे त्यास त्याच्या इच्छेनुरूप व हातून योग्य प्रयत्न घडेल त्या प्रमाणात शारीरऱ्हास टाळणे, गेलेला जोम वा शक्ति परत मिळवणें व आयुर्वर्धन करणें शक्य आहे.

कोणी म्हणेल की, आजपर्यंत सगळेच लोक म्हातारे झाले व मेले. कोणाचेंच तारुण्य अखंड टिकलें नाही किंवा कोणी अमर झाला नाहीं. हें जरी खरें असलें तरी सर्व एका ठराविक वयालाच मेले नाहीत. तसेच प्रत्यकाचें तारुण्य एका ठरीव कालमर्यादेपुरतेंच टिकलें

आयुष्य वर्षशत पूर्ण मिळो तुला तें ।
होवो सुवृद्धियुत सौख्यद सर्व तूतें ॥
हेमंत ते शत वसंत तुवां पाहावें ।
इंद्रादि देव तुजलागी सहाय व्हावें ॥

हा केवळ एक भोळाभावडा आशीर्वाद नाहीं. हा एक मंत्र आहे. हा आम्हां भारतीयांचा एक जीवनादर्श आहे वास्तवांत साध्य होऊं शकणारें हें एक ध्येय आहे.

शरीर हें बगिच्यासारखें आहे. त्याची मशागत केली तर गुलाब फुलवतां येतात व हेळसांड केली तर त्यांत कांटेरी झुडपांचें रान माजून रोगजंतूंची पीडा उद्भवते.


समतोल, सशक्त, सौंदर्यपूर्ण व कार्यक्षम दीर्घायुर्जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठीं

# दीर्घायुष्य व कायाकल्प

ही पुढील अंकापासून 'माणूस' मध्यें सुरू होणारी श्री. पु. ना. ओक यांची उपयुक्त लेखमाला वाचा.

असेंहि नाहीं. मग दीर्घायु व्यक्तीइतकें किंवा त्याचेहूनहि अधिक आपण का जगूं नये ?

### तारक व मारक शक्ति

शरीराचा ऱ्हास घडवणारी विषें, अग्नि, दूषित वायू अशी संहारक द्रव्ये जशीं सृष्टीत आहेत, तशाच प्राणवायु, पौष्टिक आहार, व्यायाम इत्यादि तारक शक्तीहि जगांत आहेत. मानवी शरीरात तारक व मारक शक्तींची झुंज सतत चाललेली असते. या झटापटीत संहारक द्रव्यास माणसाच्या अज्ञानाचें, मूर्खपणाचें, उद्दामपणाचें, अविचाराचें अथवा निष्काळजीपणाचें साहाय्य मिळत गेलें तर त्याचें आयुष्य कमी होईल. ह्या उलट शरीरांतील तारकतत्वास माणसाच्या बुद्धीचें,सारासार विचारशक्तीचें, निश्चयाचे आणि प्रयत्नाचें साहाय्य मिळत गेले तर त्याचे आयुर्मान (आणि पर्यायानें शक्ति, सौंदर्य, तारुण्य) वाटेल तेवढें वाढू शकतें.

आयुर्मर्यादा वाढवणें किंवा अल्पायुषी होणें ह्यावर आपला कांहीच तावा नसता तर 'व्यायाम करा, दूध प्या, स्वच्छ व मोकळया जागेंत रहा' असे लहान मुलांच्या कानीकपाळीं ओरडण्याचे काहीच प्रयोजन नसतें. लहान मुलास त्याच्या हयगयीबद्दल, तरुणास त्याच्या उच्छृंखलपणाबद्दल व सरकारास सार्वजनिक आरोग्यासबधी दोष देण्यास आपण कमी करत नाहीं, तर सुखानें घरबसल्या पोटापुरतें पेन्शन मिळत असतासुद्धां जें स्वतःच्या शारीरयंत्राकडें दुर्लक्ष करून स्वत.चे केस पांढरे होऊं देतात, दंतपक्ति हालू लागल्या तरी लक्ष देत नाहीत. त्याना समाजानें तितकाच दोष का देऊ नये ? अमुक एका वयानंतर निष्काळजी आळशी आणि बेदरकार व्हावे असे कोणीं सागितलें आहे ? तसे जे करतात ते स्वत: मृत्यु पावल्यानें व अपंग झाल्याने आप्तेष्ट व समाज त्यांच्या सेवेस व सहवासास मुकतात! एवढेंच नव्हें, तर त्यांचेमुळें अकाली वार्धक्य व मृत्यू ओढवण्याचा, पराभूततेचा आणि नामुष्कीचा पायंडा पडतो.

वादाच्या भरात लोक म्हणतात की, उत्पत्ति, स्थिति व लय ह्या अवस्था शरीरासहि लागू आहेत. हें विधान खरे भासले तरी तर्कशास्त्राच्या कसोटीस उतरत नाहीं, ह्या तिन्ही अवस्थाच्या मर्यादा शरीराचे बाबतीत कोणत्या हें कोणालाच ठरवतां येणार नाही. भारतीयांचें सरासरी आयुर्मान २६ वर्षें, पाश्चात्याचे ७० वर्षें. उपनिषदाचा दंडक आहे कीं १०० वर्षे तरी जगावें, ज्योतिषशास्त्रात जीवनचक्र १२० वर्षांचें धरतात व प्रत्यक्षात माणसें १५० वर्षेंहि जगतात त्याहून अधिकहि मानव जगू शकतात ह्याचे पुराणांतरी पुरावें सांपडतात. ही झाली सबध आयुष्याची गोष्ट. परंतु त्यातील तारुण्याचा कालहि तसाच वाढवला जाऊ शकतो.

स्थूलमानानें सर्व वस्तूचा उदय, स्थैर्य व ऱ्हास होतो हा निसर्ग नियम मानला तरीहि त्या नियमाचे उल्लघन अशक्य नाही. गतप्राण शरीरें दोन-तीन दिवसातच कुजू लागतात हा निसर्ग नियम आहे. पण तीं आपण औषधांनी ताजी ठेवूं शकतोच कीं नाहीं ? पाणी उतरडीकडे वहाते हा निसर्ग नियम आहे. परंतु पंपाचें साहाय्यानें पाणी उभ्या नळात शेंकडों फूट वर चढतेच कीं नाही ? एकूण, सृष्टीत नियम व प्रतिनियम, विष व अमृत, शस्त्रें व चिलखतें अशा जोड्या अस्तित्वांत आहेत. जीवनवर्धनासाठी ह्यात त्या कोणत्या नियमाचा कसा उपयोग करुन घ्यायचा तें वृद्धि, प्रयत्न व ऐपतीवर अवलंबून आहे. या नियमा-प्रतिनियमाचा ताळमेळ ठेवून वार्धक्य रोघून पुन्हा तरुण होणें शक्य आहे.

तारुण्यप्राप्तीचा प्रयत्न करण्याची हिंमत यावी यासाठीं 'वार्धक्य' म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना असली पाहिजे. 'वृद्ध' शब्द 'वर्ध' धातूपासून झालेला असून त्याचा अर्थ 'वयानें वाढलेला (गलितागं नव्हे) एवढाच अभिप्रेत आहे. तसेच 'म्हातारा' हा 'महत्तर' (म्हणजे 'अधिक मोठा') याचा अपभ्रंश आहे. म्हणून दोन्ही शब्दांचा अर्थ 'लहान नाही तो' एवढाच आहे. त्यातून वाकलेली, केस पिकलेली, भग्नदत अशी मूर्ति डोळ्यासमोर येण्याचें कारण नाही. म्हणूनच आपण ज्याना म्हातारे म्हणतो त्याच्या त्याच्यांतसुद्धा मृत्यूचे वेळीं ५० ते १५० वर्षें एवढें वयात अंतर असू शकतें.

वरील विवेचनावरून हें दिसून येऊं शकतें की, तारुण्य व म्हातारपण ह्याना मर्यादा नाहीत. कारण मानवी शरीर टिकवलें तर टिकू शकतें व लवकर झिजवलें तर लवकर मृत्यु येऊ शकतो.

तसेंच एकदां केंस पाढरे होऊं लागल्यावर माणसाच्या शक्तीचा ऱ्हासच होत राहील व काहीं केल्या म्हातारपणांतून सुटका होणार नाही असें समजणें चुकीचें होईल. शरीर यत्राचे व्यापार व नियम समजून माणूस वागू लागेल तर केंस पुन्हा काळे होऊन अन्य इंद्रियेंहि तारुण्यावस्थेंत त्याप्रमाणें काम करूं लागतील. त्या यंत्रात बिघाड होत राहिला तर वार्धक्य, शक्तिक्षय व मरण हीं ओढवतील सुधार होत राहिला तर त्यातून सौंदर्य, लावण्य, जोम व उत्साह ओसडेल. म्हणून वृद्धास प्रयत्नांनीं पुन्हा तरुण होणें शक्य आहे असेंच म्हणावें लागेल. त्याचा मार्ग कोणता हें आपण पुढें पाहूंच. ● ● ●


महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ग्रंथ

**गुजरातेंतील मराठी राजवट**

वि. गो. खोबरेकर

मूल्य सात रुपये

**राजहंस प्रकाशन ४१९ नारायण पेठ पुणें २**

थोरामोठ्यांच्या मुलाखती
सर्वच घेत असतात.
परंतु एका सामान्य पट्टेवाल्याची
आमच्या प्रतिनिधीनें
घेतलेली ही मुलाखत
निराळी नाहीं असें कोण म्हणेल ?

# गणपत जाधव

गणपत जाधव हें गणपत जाधव म्हणून डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या ऑफिसमध्यें ओळखले जात असले तरी ते राहातात त्या भागांत ते 'बबनराव' याच नावानें ओळखले जात आहेत. कचेरीतल्या लोकांना त्याचें बबनराव हें टोपण नांव आहे हें माहीत नाहीं. आणि त्यांच्या राहात्या भागांत, त्यांच्या मित्र-मंडळीत त्यांचं कचेरीत 'गणपत' हें नांव आहे असं सागावं लागतं.

दोन नांवाप्रमाणें त्यांचं दोनहि ठिकाणचं व्यक्तिमत्व अगदीं अलग आहे. कचेरींत चपराशाचं हलकं काम करणारा गणपत त्यांच्या घरच्या वातावरणांत एक जबाबदार व्यक्ति म्हणून वावरत आहे. त्याची मित्रमडळी महत्त्वाच्या कामांत त्यांचा सल्ला जरूर घेतात. आणि लोकांनीं त्यांना विचाराव जबाबदारीच्या कामात सल्ला घ्यावा. इतकं महत्त्व त्यांनीं समाजांत मोठ्या कष्टानें मिळवलें आहे.

चपराशाचं व्यक्तिमत्व तें काय असेल ? असा कुणालाहि सहाजिकच प्रश्न पडेल ! पण जाणकारांनीहि आपलं मोठेंपण विसरून, त्यांना गुरु करावं इतका समंजसपणा, इतका थोरपणा त्याच्या ठिकाणी आहे.

जाधवाच्या घरांत अकरा माणसे आहेत. ते स्वतः, पत्नी, चार मुलगे, एक मुलगी, भाऊ, आई वडील आणि एक लग्नाची बहीण. सध्यां महागाईच्या दिवसांत अकरा माणसांचा प्रपंच पट्टेवाल्याच्या पगारांत चालवतांना किती यातना होत असतील, किती तारेवरची कसरत करावी लागत असेल हें न सागितलेलें बरें. प्रपंचाचा प्रचड गाडा ओढीत असताना कितीहि काटकसरीने खर्च केला तरी प्रत्येक महिन्याचा नित्य खर्च १७० च्या दरम्यान रेंगाळत असतो. या १७० रुपयाच्या खर्चांत कपडे, डॉक्टर, पाहुणे, सण आणि लग्नसराई यासारख्या अकस्मिक खर्चाचा समावेश नाही.

त्यांचा पगार अवघा ९५ रुपये आहे. डॉ अप्पासाहेब मा डायरेक्टर ऑफ एज्युकेशन पवारसाहेबाचे ड्रायव्हर म्हणून काम करीत असल्यामुळें त्यांना साहेब आपणहून ३० रुपयें देतात. आई आणि बहीण दिवसभर विड्या करीत असतें. त्यांचे ३५ ते ४५ च्या दरम्यान पैंसे येतात. त्यातच डे. डायरेक्टर मिमांसीसाहेब मधूनमधून त्याच्या प्रपंचाला आयत्यावेळी हातभार लावीत असतात.

१७० रुपयात जो मासिक खर्च येतो त्यात सणावाराला फाटा आहे. खर्चाचा आकडा त्या दरम्यान रेंगाळावा म्हणून बबनरावांना ठराविक गोष्टी पाळाव्या लागतात. सकाळी भाकरी आणि एखादी स्वस्त पालेभाजीच अथवा कडधान्याची उसळ. सध्याकाळीं वरणभात नाहीं तर खिचडी. संध्याकाळीं थोड्या बहुत भाकरी कराव्या लागतातच.

या खर्चाशिवाय आणखीन काहीं अकस्मिक खर्च वाढला तर त्याना भारी यातायात सहन करावी लागते. तरी पण ते कधी चिडलेले दिसत नाहीत. कधी वखवखलेले दिसत नाहीत. कधी त्रासलेले दिसत नाहीत.

घरांत एक नवीन पैसा खर्च करतांना जाधवांना अनक वेळां विचार करावा लागतो. तर बाहेरच्या वातावरणांत दुसऱ्याची बरीच मोठी रक्कम सभाळण्याचें काम त्याच्यावर येत असतें. तें काम त्यांनाच करावें लागतें. जोखमीनेच करावें लागतें.

काहीं वर्षांपूर्वी माजी डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मा. मिमांसीसाहेब यांच्या मुलीच्या लग्नाच्या सोहळ्यांत सारी रोकड आणि दागदागिन्यांची पेटी गणपतच्या ताब्यांत होती. घरातली माणसं त्यांच्याकडून पैसे नेत, आणून ठेवीत. दागिने घालीत, परत काढून ठेवीत. हिशेब नाही. काहीं नाहीं. लग्नाचा सोहळा संपल्या नतर उरलेसुरले पैसे त्यानीं मिमासीसाहेबांच्या ताब्यात दिले. त्यांनी हिशेब विचारला नाहीं कीं, दागिने पाहून घेतले नाहीत.

पण हा एवढा विश्वास संपादन करण्यासाठी कित्येक वर्षे त्याना अविश्रांत श्रम प्रामाणिकपणें करावे लागले असतील ! जी परिस्थिति मिमासीसाहेबाच्या घरची आहे, तीच परिस्थिति इतर ठिकाणचीहि आहे.

—मीं मुद्दाम माजी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मिमासीसाहेबाची गांठ घेतली. हे त्यांच्या घरात मुलासारखे वावरत असतात हें मला माहीत असतांनासुद्धां. "मी गणपतला ओळखतो. पण तुम्ही तुमचा त्याच्या बद्दलचा दृष्टिकोन मला सांगता कां ?" असें त्यांना मी म्हटल्यावर त्यांना मोठ नवल वाटलं. सोनं हें सोनं आहे, हें सांगण्याचं कारण काय ? हा भाव त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसला. ते म्हणाले, "गणपत अतिशय कष्टाळू आहे. तसाच तो विश्वासूपण आहे. त्याला कोणतीच कामं सांगावीं लागत नाहीत. आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांनादेखील कोणत्या वेळी काय लागतें हें त्याला कसें काय कळतें कुणाला ठाऊक ! तो कमालीचा भिडस्त आहे. फिरतीवर तो माझ्याबरोबरच असतांना मलाच त्याच्या जेवण्याखाण्याचो

व्यवस्था प्रथम करावी लागे. त्याची काळजी मी माझ्यापेक्षाहि जास्त घेई ! " मला मनातल्या मनांत हसू आलं. अधिकाऱ्याला आपल्या नोकराची काळजी करावी लागते.

—जाधवांच्या आर्थिक परिस्थितीवरून त्यांच्या मुलांचं शिक्षण फारसं होणार नाहीं हें सांगण्याचं कारण नाही. तरीपण त्यावद्दल जाधवांना काय वाटतें हें विचारावं म्हणून मीं विचारलं, "बबनराव, तुमच्या मुलाचं शिक्षण जास्त व्हावं असं तुम्हांला वाटत नाही ? " माझ्या प्रश्नाचा घाव त्यांच्या जिव्हारी बसला असावा. ते वरकरणी हसले पण त्या हंसण्याला दु:खाची झालर होती. मला वाटलं मी हा प्रश्न त्यांना उगाच विचारला. दु:ख आंतल्या आंत लपवीत बबनराव म्हणाले. " त्यांनीं खूप शिकावं असं मला वाटतं, इतकंच ! " पण त्यांच्या उत्तरांत अगतिकपणा होता. आपण मुलाचं शिक्षण करण्याला असमर्थ आहोत याचं दुःख होतं.

अगदीं सामान्य परिस्थितीतहि त्याच्या लग्नाला ९०० रुपये खर्च आला. लग्न ठरले त्या दिवशीं लग्न करण्यासाठीं म्हणून पैसे शिल्लक नव्हते. असणं शक्य नव्हतं. ४०० रुपये मुलीकडून मिळालें. ३०० रुपये मिमांसीसाहेबांनी दिले. आणि बाकीचे पैसे सोसायटी मधून काढले.

" साहेब पैसे देतांना काय म्हणाले ?— त्यांच्या पैशाची फेड कशी केलीत ?—

" लग्नाकरतां जास्त पैसे खर्च करूं नकोस. महिना १० ते १५ रुपयानी जमेल तशी मी फेड केली. एकदां साहेबानीच मला विचारले,- त्यावेळीं २५० रुपये फिटलेत म्हणून सागितलें. ५० रुपयाची त्यानी मला सूट दिली— "

जाधवाच्या बोलण्यावरून कळलं—त्यांना वाटतं, त्याची आर्थिक परिस्थिति फार चागली आहे. मला आश्चर्य वाटल- मी म्हणालो, " असं कसं ? " त्यावर ते म्हणाले, " अहो, काही शिपायाच्या हातात कधी कधीं नव्हे बऱ्याच महिन्यात ३०-३२ रुपयेच पगार मिळतो. त्याच्याहि घरात माझ्या इतकीच माणस असतील. त्याचे कसे होत असेल ? " " खरच, त्याचं कस होत असेल ?" त्यावर ते परत म्हणाले, " मी तरी काय सागूं ?" मग नडलेला माणूस रुपयाला दोन आणें व्याजानेसुद्धां पैसे घेतो. आणि ही गोष्ट खरी आहे. सरकारी लायसेन्स नसतांना देखील इतक्या जबर व्याजाने पैसे देणारे आणि पगाराच्या दिवशीं आक्रस्ताळेपणा करून ताकतीच्या जोरावर पैसे वसूल करणारे किती तरी लोक दिसून येतात. सरकारने त्यांचा बदोबस्त करूं नये. कारण वेळ पडल्यास तेंच लोक त्याना पैशाचा आधार देतात. व्याजाच दु:ख नड भागल्यामुळं फारसं वाटत नाहीं.

सर्वसाधारणपणें पट्टेवाला कर्जबाजारी असतो हें विधान खोट नाहीं. फावल्या वेळात दुसरा एखादा किरकोळ धदा करणारा पट्टेवाला याला अपवाद असू शकेल. बहुतेकांना मुलंबाळं भरपूर असतात. लायकीप्रमाणें मोकळा वेळ चकाट्या पिटणें अगर एखाद्या व्यसनांत घालवतात. अलीकडची कांही तरुण पोर रात्रीचं शिक्षण घेतात अथवा एखादी कला हस्तगत करतात ह्याहि बाबीचा उल्लेख करणं जरूर आहे.

—न बोलता घरीं, दारी कचेरींत विश्वासानें, आत्मीयतेनें काम करणं हा जाधवांचा स्थायी भाव आहे.

आळींत एका माणसाचा जबरदस्त वचक आहे. तो माणूस जाधवांचा बालमित्र. त्याच्या हातून न व्हावी अशी गोष्ट होऊं लागतांच जाधवांनीं त्याला खडसून सांगितलें. " तूं हें करतोस हें बरं नाहीं–" आणि तो माणूस तेव्हापासून जाधवांना वचकून आहे. लोक त्याला भितात आणि तो जाधवांना भितो.

परवां परवां त्यांनीं मुलं होऊं नयेत म्हणून स्वत:चं ऑपरेशन करून घेतलं. तरीपण मला जरा उशीरच झाला असं त्यानीं बोलून दाखवल.

सकाळीं आठ वाजल्यापासून रात्रीं ८॥ वाजेपर्यंत ते कामावरच असतात. संध्याकाळीं ९॥ च्या पुढं मित्रमंडळीत तास सव्वातास गप्पा मारीत बसतात. तोच वेळ त्यांच्या करमणुकीचा व आयुष्यांतल्या विरंगुळ्याचा.

चार-सहा महिन्यांतून एखादे वेळी मित्राच्या आग्रहाखातर ते सिनेमाला जातात. साहेबाच्याबरोबर नाटक पाहण्याचा प्रसंग आला तर ते नाकारीत नाहीत. मासाहाराचा त्याना शोक आहे. ते जेवण त्यांना भारी प्रिय. त्यांचा चेहरा विशेष खुललेला दिसला कीं, आपण खुशाल समजावे......

*त्यांच नवीन लग्न झालं त्यावेळीं लोकांनीं* त्यांना चहापाण्याला बोलावलं असेल तेवढेच ते पत्नीबरोबर बाहेर जातांना मला दिसले. एरवी नाही. आणि आतां तें शक्य नाहीं... शनिवारी रात्री ते स्व:चे कपडे स्वत:च धुतात. तो एक त्यांचा कार्यक्रम आहे !!

जाधवानी एक डायरी ठेंवली आहे. त्यात त्याच्या आयुष्यांत घडलेल्या नोंदी ठेवल्या आहेत.

१-४-४२ एज्युकेशन इन्स्पेक्टर याचे ऑफिसांत नोकरीस राहिलों...१-६-५० फंड कापण्यास सुरुवात झाली... ५-१२-१९४२ सौ. इदुमतीशी सायंकाळीं ५-५५ ला लग्न... २२-१-५१ १ वाजून २० मिनिटानी दिलीपचा जन्म झाला. १-६-५० रोजी कायम झालों. १-७-५७ रोजीं सोसायटीचें सभासदत्व रद्द केलें. मोटारचा लायसन्स नंबर ३७२१४ काढल्याची तारीख ९-१०-५२.


साहसाच्या सहा कथा

**सहा साहसें**

लेखक : दा. सी. देसाई

मूल्य दोन रुपये

एका युवकाची विकासकथा

**विद्यालंकार**

लेखक : प्रभाकर इनामदार

मूल्य १ रु. २० न. पै.

श्वापदांच्या भावकथा

**परसूच्या पशुकथा**

लेखक : वसंत सबनीस

मूल्य दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणें २

जाधव ज्या लोकांत वावरतात त्यांना जाधवांची कल्पना आली. ते सध्यां शिपाई म्हणून डायरेक्टर ऑफ एज्युकेशन डॉ. अप्पासाहेब पवार यांचेकडे आहेत. त्यांचें मत घ्यावें म्हणून मीं माननीय पवारसाहेब यांची मुद्दाम भेट घेतली. जाधवांचा मी परिचय देणार आहे असं त्यांना सांगतांच त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधान दिसलं. " प्रथम तुमचेंच मी याबद्दल अभिनंदन करतो. त्याच्यासारखा कष्टाळू प्रामाणिक सज्जन माणूस सहसा सांपडणार नाहीं. आमच्या घरांतल्या प्रत्येक माणसाशीं तो मोठ्या आदबीनें आणि प्रसन्नतेनें वागतो. कोणतेंहि काम करतांना तो कधींच कटाळलेला दिसत नाहीं. कचेरींतल्या कामांतहि तो कधीं हलगर्जीपणा करीत नाहीं... "

" त्यांच्या वागण्यांतलं काहीं विशेष ?–" असं मी म्हणतांच समाधानानें ते म्हणाले " त्याच्या उत्तम स्वभावाचें मी तुम्हांला एकच गमक सांगतों. आतांपर्यंत त्यानें चार-पांच अधिकाऱ्यांच्या हाताखालीं काम केलं. पण त्या सगळ्याच अधिकाऱ्यांना तो सारखाच प्रिय आहे. सगळ्याच माणसांना एक माणूस सारखाच आवडत आहे, यांतच त्याची थोरवी आहे. त्याच्या स्वभावांत अतिशय गोडवा आहे. "

बोलतां बोलतां जाधवांच्या घरच्या एक अत्यंत दुःखद घटनेचा मीं उल्लेख केला. ती घटना ऐकून साहेबांचं शरीर शहारलं. त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या ओल्या झाल्या. साहेब मोठ्या दुःखानें म्हणालें. " इतकीं निर्दय माणसें दुनियेंत आहेत तर !–"

जाधवांचं अंतःकरणपूर्वक कौतुक त्यांच्या साहेबांनीं केल्यानें मला समाधान झालं. साहेब पुढें म्हणाले. " सकाळीं सांगितलेलं काम तो ज्या प्रसन्नतेनें करतो तितक्याच प्रसन्नतेनें कामानें तो त्रासला असतांना सायंकाळीं देखील करतो. इतकेंच काय रात्रीं झोपेंतून उठवल्यानंतरहि तो कधींहि त्रासलेला दिसत नाहीं.–...

–जाधव असेच काम करीत राहाणार आहेत. पगारांत फारशी वाढ होणार नाहीं. वस्तूंची महागाई अशीच सारखी वाढत जाणार आहे. घरांतलीं लहान मुलं त्याच गतीनें मोठीं होणार आहेत. त्यांच्या राहाण्याचा, अन्न पाण्याचा खर्च असाच वाढत जाणार आहे ! थोरला मुलगा हाताशीं येईपर्यंत त्यांच्या त्रासाची कमान सारखी वाढतच जाणार आहे ! आणि हा विचार मनांत आला कीं, परमेश्वराजवळ प्रार्थना करावीशी वाटतें. परमेश्वरा, वाढत्या वयाबरोबर कष्ट करण्याचा त्याचा जोम कमी होऊं देऊं नकोस! तेवढी तरी कृपा या सज्जनावर कर !

●●●




अल्पावधींत प्रथम श्रेणी मिळाविणारी

सरकारमान्य

**प्रोफिशियण्ट शॉर्टहँड् अँड् टाईपरायटिंग इन्स्टिटयूट**

६८६ बुधवार पेठ, पुणें २.

[ फोन— ५७३७६ ]

सूचना : मराठी रेमिंग्टन नवीन मशीन्सवर नांवें नोंदणी चालू आहे.

# रंगभूमि



" जे मला जाणून माझ्याकडे येतील, माझी निष्ठा व लेखनमूल्य ह्यांना कायम ठेवून जे माझ्याकडे लेखन मागतील, त्यांच्यासाठींच मी माझी लेखणी झिजवीन. बाजारी नटवा वेष मी तिला कधींहि चढविणार नाहीं. ज्या परमेश्वरानें मला आजवर यश दिलें आणि अमूर्ततेनें माझ्या सांगातीं राहून मला चालविलें, बोलविलें तोच पुढेंहि मला आंधळयाच्या काठी-प्रमाणें मार्गदर्शन करील अशी मला खात्री आहे. "

ह्या निर्धारानें केवळ लेखनावरती सुखासमाधानांत ज्यांनीं वयाची साठी ओलांडली त्या स. अ. शुक्लांची रंगभूमीच्या संक्रमण कालांतल्या कौतुकाध्यायांत मश्गुल असलेल्या हल्लींच्या कलावंतांना जाण नसेल. पण १९२० पासून कवि, १९२४ पासून नाटककार, व नंतर चित्रपटकथा–संवाद लेखक म्हणून मराठी वाङ्मय रसिक त्यांना ओळखतो.

केवळ लेखनावरती जीवन जगूनमुद्धां त्याचें अवास्तव प्रदर्शन न करणारे मराठींतील एकमेव लेखक म्हणजे श्री. शुक्ल. त्याला त्यांचा अबोल स्वभाव कारणीभूत आहे कां प्रसिद्धीविन्मुखता कारणीभूत आहे हें ठरवणें अवघड आहे. नाहींतर कादंबरी, काव्य, नाटक, चित्रपट व इतर दालनांत सहजतेनें सारखेंच प्रभुत्व गाजवणारे श्री. शुक्ल यांचे ऐवजीं दुसरा कुणी सिद्धहस्त लेखक असतां तर स्वतःच्या वाङ्मयसेवेचें त्यानें निश्चित चीज करून घेतलें असतें. पण साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं त्यांनीं स्वतःचं नांव सुचवूंसुद्धां दिल नाहीं, ह्यामध्यें त्यांची एक फार मोठी जबर तत्त्वनिष्ठा दिसून येते.

त्यांनीं 'सौभाग्य लक्ष्मी' सारख्या सामाजिक नाटकाचें यशस्वी लेखन केलं असलं तरी त्यांचं मन खरं रमतं पौराणिक कथांमधेंच. आपणांला निश्चित कांहीं बोधपर सांगतां येतें असं त्यांच्या मना-मध्यें गणित बसलेलं आहे. त्यांच्या यशस्वी 'सत्याग्रही' नाटका-संबंधींसुद्धां त्यावेळच्या नाटकरसिकांनीं तत्कालीन राजकीय परि-स्थितीचं रूपक बसवलं होतं.

ह्या त्यांच्या मनोधारणेमुळें धार्मिक सणाला त्यांची व क. वाशीकरांची भारतीय आकाशवाणीला आठवण झाली तर त्यांत नवल नाहीं. पण आकाशवाणीला साजेलसं लेखन करण्याचं तंत्रहि त्यांनीं मोठ्या यशस्वीपणें आत्मसात् करून घेतलं आहे. हें त्यांच्या वेळोवेळीं ध्वनिक्षेपित होणाऱ्या श्रुतिकांवरून सहज लक्षांत येतें.

काव्यजगांत त्यांना 'कुमुद बांधव' म्हणून फार मोठं मानाचं स्थान आहे. काव्यगेयता, सरळ पण अर्थवाही प्रासादिक शब्दरचना ह्या वैशिष्टयांमुळें त्यांचीं गाणीं त्या त्या वेळेला अत्यंत लोकप्रिय ठरलीं; एकापाठोपाठ एक निघणाऱ्या ध्वनिमुद्रिकांमुळें आबाल-तरुणांच्या तोंडीं बसलीं, घोळूं लागलीं, " रमला कुठें ग कान्हा " " जरा हळूं जपून चाल बाई ग ! " वगैरे भावगीतें आजहि मोठ्या आवडीनं गुणगुणलीं जातात. सध्यांचा रसिकवृन्द आजहि त्यांना गीतकार म्हणून मान देतो.

## नव्या रंगभूमीविषयीं गैरसमज

अशा सिद्धहस्त लेखकाच्या षष्ठ्यब्दिपूर्तीच्या वेळीं त्याचा मुक्तकंठानें गौरव करून त्यांना यशस्वी, कीर्तिमान् दीर्घायुष्य लाभण्याविषयीं सदिच्छा प्रदर्शित करणें हें जितकें उचित, तितकेंच, त्याहूनहि जास्त महत्त्वाचं काम म्हणजे त्यांचे नव्या रंगभूमीविषयीं असलेले गैरसमज दूर करणें हें आहे. तिच्या नाट्यविन्मुखतेविषयीं विचारतां त्यांनीं नव्या दमाच्या कलावंतांविषयीं साशंक उद्‌गार काढले. त्यांच्या नाटकांची किमानपक्षीं पंचवीस प्रयोगांची हमी देणाऱ्या नाटकसंस्थेला ते आपलें नाटक द्यावयास तयार आहेत. त्यांच्या नाटकांनीं वैभवशाली काळ पाहिला आहे व त्यांच्या चरितार्थाचें नाटक एक साधन आहे, ह्या गोष्टी जमेला धरूनहि अशा प्रकारची हमी मागणें हें उचित नव्हें. मुंबई मराठी साहित्य संघानें " तुझे आहे तुजपाशी " आणि " सुंदर मी होणार " चे अगणित प्रयोग केले. " ससा आणि कासव " चे रंगायननें २५ प्रयोग केले. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशननें " प्रेमा तुझा रंग कसा " आणि " वेडयाचं घर उन्हांत " चेहि प्रयोग केले. दाराशी चालून आलेली लक्ष्मी लाथाडायला कोणीहि तयार नसतो. हौशी कलावंतांनीं कुंतीसारखा " मला दारिद्र्य दे " म्हणून वर मागितला नाहीं. पण त्यांच्यापासून अपेक्षा करणाऱ्यांनींसुद्धां त्यांचें आर्थिक स्थैर्यहि लक्षांत घ्यावें. एका प्रथित नाटककारानें आपल्या अत्यंत सुमार नाटकाच्या पन्नास प्रयोगांची हमी मागितली, शेवटीं दहावर हमी येऊन ठेपली. आजतागायत तें नाटक झाल्याचें ऐकिवांत नाहीं. तसंच दुसऱ्या एका नाटककारांनीं आपलं नाटक दोनसंस्थांना विकत देऊन (कारण विशिष्ट रक्कम अगाऊ शिवाय मानधन अशी त्यांची मागणी होती) आपलं उखळ पांढरं केलं असं ऐकिवांत आहे, " हौसेला मोल नसते " हें जितकें खरें तितकंच " मागणीला सुद्धां मर्यादा असावी " हेंहि खरें. नाणं खणखणीत असलं तर कुठंहि वाजतं. त्याला स्थळकाळाचीं बंधनं हवींतच कशाला ? अर्थात् साशंक मनानं बंदोबस्ताची तजवीज करावी हें रास्तच आहे.

## सरकारी मदतीची परतफेड

पण बंदोबस्त करतांनासुद्धां तो बाजवीपेक्षां जास्त होऊं नये याची जास्तींत जास्ती काळजी घेतली जावी. मराठी नाट्यपरिषदेच्या पुणें शाखेनें पुढाकार घेऊन पुणें नकलाकार संघाची स्थापना केली. स्थापनेच्या उद्दीष्टांची महति गाऊन पुरी होण्यापूर्वींच ज्येष्ठ कलावंतांकरितां निवृत्तिधन मिळावे अशी तिनें मागणी केली. सरकारी नोकरींतून निवृत्त झालेल्यांना सुध्दां वाढीव निवृत्तिधन देण्याची कल्पना सरकार फेटाळून लावते. आणि अपवाद वजा जातां बेबंद, बेछूट आयुष्य घालवणारे कलावंत जेव्हां आयुष्यसीमेवर उभे राहून स्वच्छंदी आयुष्याचा मोबदला मागतात तेव्हां गंमत वाटल्याशिवाय रहात नाहीं. राष्ट्राकरितां, समाजाकरतां किमान आपल्या कलेकरता तनमनधन अर्पिणाऱ्या व्यक्तींची सरकारनें दखल घ्यावी हें उचित आहे. मान्यवर संस्थांनीं व व्यक्तींनीं सरकारला ती दखल घ्यायला भाग पाडणं हेंहि ठीक आहे. पण शिफारस करतांना संस्थांनीं ही आपुलकी बाजूला ठेवून पात्रापात्रतेचा अवश्य विचार करावा. एका दृष्टीनें सरकारची इमानेंइतबारें सेवा केलेल्या व्यक्तींच्या निवृत्त धनाचा प्रश्नहि आपण अवघड करून ठेवित आहों ह्याचीहि जाणीव संस्थांनीं व व्यक्तींनीं अवश्य ठेवायला हवी. निवृत्तधन मिळालेल्या व्यक्तींनींहि सरकारनें बंधनें घातलीं नसलीं तरी थोडी ओशाळगत स्वीकारून व्यक्तिगत अगर संघटित त्या त्या कलेची सेवा करावी. वस्तुतः सरकारी मदत मिळालेल्या व्यक्तींची संख्या बरीच आहे. पण मदत मिळाल्यानंतर कलेची सेवा करून अप्रत्यक्षरित्या सरकारचें ऋण फेडल्याचीं उदाहरणें फार कमी आहेत. किमानपक्षीं रंगभूमीवर तरी सरकारी मदत अपुरी असल्यामुळें धंदेवाईक पेशा पुढें चालणें हें साहजिक आहे. पण तशांतहि किंचित् पदरमोड करून जुन्या रंगभूमीचं दर्शन अधूनमधून जुन्या कलावंतांनीं दाखवलं तर तें अगदींच वांया जाणार नाहीं. ज्या नाटकामुळें नानासाहेब फाटक पुढें आले. तें " क्षारबंधन " नाटक व त्यांतील गिरिधरची भूमिका नानासाहेबांना कदाचित् करतां येत नसेल. पण त्यांनीं ती नव्या समर्थ कलावंतांकरवीं कां उभी करूं नये ? गणतराव बोडसांचा फाल्गुनराव आणि सुधाकर फार गाजले होते. त्याची किंचित्शी तरी चुणूक आम्हांला ते स्वतः अगर स्वतःला जमेत नसेल तर इतरांकरवीं कां दाखवीत नाहीत ? त्यांतूनहि नवकलावंत बोध घेऊं शकतील. प्रसंगी सरकारनेंहि थोडाफार रोष पत्करून जुन्या कलावंतांना अशा तऱ्हेचं पुनरुज्जीवन करण्यांत भाग पाडावं. अर्थात् सरकारी नाट्यस्पर्धेनंतर आजपर्यंत झालेल्या 'आयोजित' कार्यक्रमाची कल्पना थोडयाफार फरकानें तीच होती. आणि आत्तांपर्यंतचा अनुभव लक्षांत घेऊन ह्या वर्षी त्याचं रूप बदललं आहे हें उघड आहे.

— अनंत




लहान माकड– आई, मावशी अगदीं अश्शीच दिसते नाहीं !
मोठं माकड : अरे, असं बोलूं नये आपण...!"

# 'सोनेरी नदीचा राजा'

## 'चिल्ड्रेन्स थिएटर' चा एक यशस्वी प्रयोग

आमच्या प्रतिनिधीकडून



सोनेरी नदीचा राजा
या नाटकाच्या
१५-७-६२ रोजीं
झालेल्या प्रयोगांतील
कलावंत.

डावीकडून—
केसाळसिंग—अरुण जोगळेकर
आनंद—अविनाश बोडस
काजळसिंग सुरेश गुमास्ते
म्हातारा— वासुदेव पाळंदे

मुलांसाठीं उत्तमोत्तम नाटकें सादर करण्यांत पुण्यांतील 'चिल्ड्रन्स थिएटर'चा हातखंडा आहे. पत्तेनगरीत, पक्ष्यांचें संमेलन, शेपटीचा शाप हीं त्यांचीं नाटकें बालचमूमध्यें फारच लोकप्रिय झालीं आहेत. याच बरोबरीला नुकतेंच एक दुसरें नाटक या संस्थेनें सादर केलें आणि उल्लेखनीय गोष्ट म्हणजे चिल्ड्रन्स थिएटरच्या आजवरील श्रेष्ठ परंपरेला साजेसेंच असें तें नाटक होतें. सौ. मालतीबाई दांडेकरांचें "सोनेरी नदीचा राजा" हें तें नाटक! तितकेंच चांगलें आणि तेवढेंच मनोरंजक!

सौ. मालतीबाईंची "सोनेरी नदीचा राजा" ही प्रदीर्घ बालकथा प्रसिद्धच आहे. त्यावर सदर नाटक आधारलेलें आहे. आनंद नांवाच्या एका गोड सद्गुणी मुलाची ही कथा आहे. केसाळसिंग आणि काजळसिंग नांवाचे त्याचे दोन मोठे भाऊ त्याला मनस्वी छळत असतात. त्याच्याकडून मरेमरेस्तोवर काम करून घेतात. प्रेमाचा एक शब्ददेखील त्यांच्या तोंडून निघत नाहीं. या उलट आनंद मात्र आपल्या भावावर निरतिशय प्रेम करीत असतो. त्यांचा शब्द न् शब्द ऐकतो; त्याप्रमाणें वागतो. परंतु त्याचबरोबर आपली परोपकारी वृत्ति मात्र सोडत नाहीं. अशा या सद्गुणी आनंदाची परीक्षा घेण्यासाठीं वायुदेव एकदां येतात. आनंद सहाजिकच परीक्षेला उतरतो. त्यामुळेंच त्याला सोन्याचा पेला भेट म्हणून मिळतो. ही गोष्ट अर्थातच केसाळसिंग आणि काजळसिंगाला सहन होत नाहीं. तो पेला आटवून त्याचें सोनें मिळविण्यासाठीं त्याचा अट्टाहास चालू होतो. अखेर आदनंला त्यांचेपुढें हार खावी लागते. तो पेला वितळविण्याकरता टाकण्यांत येतो. परंतु त्या वाईटांतूनहि चांगलें निघतें. त्या पेल्यांत कनकराजा बंदिवान झालेला असतो. त्याची सहाजिकच सुटका होते, त्यामुळें प्रसन्न होऊन कनकराज आनंदाला सोनेरी नदीचा मार्ग सांगतो. याच मार्गाच्या शोधार्थ गेलेल्या केसाळसिंग व काजळसिंगांचें धोंडचांमध्यें रूपांतर होतें. आनंद मात्र आपल्या परोपकारीं वृत्तीनें तो मार्ग मिळवितो आपल्या भावांनाहि पुनर्जन्म देतो. आणि अखेर सारें कांहीं मंगल होतें.

मुलांना आवडणाऱ्या व हव्याशा वाटणाऱ्या सर्व अद्भुत गोष्टींनीं कथानक संपन्न आहे. त्याचबरोबर कांहीं एका गोष्टीचा आदर्शहि ठेवला गेलेलें एक खास नाटक म्हणून त्याचा अगत्यानें उल्लेख करावासा वाटतो. भाषाशैलीहि कोठेंहि प्रौढ वाटत नाहीं तर अत्यंत साधी, सोपी पण तितकीच डौलदार आहे. संवादहि बोजड तर नाहींतच पण अगदीं घरगुती स्वरुपाचे आहेत, त्यामुळें मुलांना सहज आकलन होणार आहेत. एकंदरींत सौ. मालतीबाईंनीं आपला वांटा पुरेपूर उचलला आहे. राहता राहिला तो दिग्दर्शक, सादरकर्ते आणि नटवर्ग यांचा! आणि त्या सर्वांनींहि आपल्याकडून आटोकाट कोशिस करून एक उत्तमपैकीं नाटक सादर करण्याचा मान मिळविला आहे.

### नवनाट्याचा वापर

नाटकांत एक गोष्ट प्रामुख्यानें आढळली आणि ती म्हणजे नवनाट्यतंत्राचा केलेला वापर! त्यांत मलांकरितां सादर केलेल्या नाटकांतून नवतंत्र पद्धतीची मांडणी करण्याचें मोठेंच धाडस संस्थेनें केलें होतें. मुलांना ही सारी पद्धति कितपत आकलन होईल हा प्रश्नच होता. परंतु कोणाहि मुलाला 'हें काय ?" असा संभ्रम पडला नाहीं हेंच नवल! कदचित कथानकाचा ओघ आणि उत्तम अभिनय यामुळें त्यांचें इतरत्र लक्षहि नसावें! परंतु प्रयत्न यशस्वी झाला यात संदेहच नाहीं. श्री अरविंद सान यांचें याबाबत कौतुक करावें तेवढें थोडेंच! दीपयोजनाही स्वागतार्ह होती.

# कै. दिनकर कामण्णा !

मराठी रंगभूमीच्या गेल्या शे-सव्वाशे वर्षांच्या इतिहासात अनेक नामवंत कलाकार होऊन गेले आहेत. जे कलाकार नसल्यानें क्वचित नाटकें बंद पडलीं असतील. कांही वेळां प्रयोग रंगले नसतील. परंतु एकाद्या भूमिकेच्या नांवानेंच एखाद्या कलावंताचा निर्देश व्हावा, तें नांव घेतल्यावाचून त्याची खरी ओळख पटूच नये असें असामान्य कर्तृत्व फारच थोड्या नव्हे केवळ एकाच व्यक्तीच्या नशिबीं आलें आहे. ती भाग्यवान व्यक्ति म्हणजे दिनकर ढेरे ! भाववंधनमधील कामण्णाची त्याच्या वांट्याला आलेली भूमिका इतकी अप्रतिम होत असे की, लोक दिनकर कामण्णा या नांवानेच त्याला ओळखू लागले. ढेरे आडनाव लोप पावून कामण्णा ह्याच नांवाची त्याला जोड मिळाली आणि त्या दोनहि नांवाचा लोकांच्या मनावर इतका खोल ठसा उमटला की, एक नाव घेताच दुसरें नाव आपोआप डोळ्यांपुढें उभें राहूं लागले.

१९०९ सालीं दिनकरनें किर्लोस्कर कंपनींत प्रवेश केला. तेथें वयाच्या दहाव्या वर्षीच 'वीरतनय' नाटकात बकुलचे काम केले. इतक्या लहान वयात प्रथमच केलेल्या या महत्त्वाच्या भूमिकेत त्यानी पदेंहि ठणठणीत आवाजात म्हटलीं आणि लोकाची खूपच वाहवा मिळविली. शारदा, त्यापुढें शापसंभ्रम वगैरे नाटकातून किरकोळ कामें केलीं. परंतु त्याचा फारसा प्रभाव पडला नाही. पुढें मा. दीनानाथ यांच्या आगमनामुळें तर त्याचें नांवहि ऐकू येईना. त्यामुळें कै. यशवतराव टिपणिसांच्या कपनीत त्यानें प्रवेश केला. तेथें अत्यंत आत्मविश्वासानें भामिनीचें काम केलें. परतु तें काम सपशेल आपटले. यामुळें तर दिनकर लोकांच्या फारच डोळयांआड झाला.

परंतु थोड्याच दिवसांत त्याचें दैव उघडलें. बलवंत कंपनीतर्फे 'भाववधन' नाटक रंगभूमीवर आलें. आणि कामण्णाच्या भूमिकेंत पहिल्या प्रयोगासूनच दिनकरनें यशाचा कळस गाठला. भाववधनाचा पहिला प्रयोग झाला आणि दिनकर नाटचसृष्टीत अमर झाला ! कामण्णा चिरस्मरणीय ठरला ! ! ही भूमिका इतकी मान्यवर ठरली की, राजाराम संगीत मडळीनें सतत सहा महिने भाववंधनचे दररोज प्रयोग करून आपले प्रचंड कर्ज अल्पावधीत फेडलें. केवळ एका नटाच्या कर्तृत्वावर कर्जफेड हाच सर्वांत मोठा विशेष !

दिनकरचे विनोद हे केवळ वेडेवाकडे अग विक्षेप, किंवा शब्दांची कसरत यावर आधारलेले नसून स्वतःच्या बुध्दीनेच तो सारे विनोद करून थिएटर हास्यरसात बुडवून टाकीत असे. एकदा भाववंधनचा असाच एक प्रयोग चालू होता. कामण्णा इटु, बिटु यांचा तो अविस्मरणीय प्रवेश चालू असतानाच दिवे गेले. लोकाचा विरस झाला. परंतु अशीं दोन-चार मिनिटें जातात न जातात तोंच पुनश्च दिवे आले. लोक खूष झाले. कामण्णानें पुढें बोलण्यास सुरुवात केली. त्या दोघीना उद्देशून त्याने म्हटले, " पाहिलत ! तुमच्या या देहाकडे पाहून किळस वाटली म्हणून कीं काय दिव्याच्या प्रकाशानेंहि पलायन केलें !" स्वयंस्फूर्तीनें उद्गारलेल्या त्या वाक्याची दखल प्रेक्षकांनी कशी घेतली असेल त्याचें वर्णन कां करायला हवें !

१९१८ सालीं बलवत सगीत मंडळीनें कै. तात्यासाहेब केळकरांचें 'वीरविडंबन' नाटक रंगभूमीवर आणलें. यावेळेस मात्र दिनकर 'कामण्णा' या नांवानें प्रसिद्धीस आला नव्हता. फक्त एक विनोदी नट एवढाच काय तो बोलबाला झाला होता. कौरव-पाडवाच्या जीवनावर आधारलेल्या या नाटकांत दिनकर उत्तराची भूमिका करीत असे. त्यात बृहन्नडा आणि उत्तराच्या नृत्याच्या शिक्षणाचा प्रवेश आहे. बृहन्नडेचें काम कृष्णराव कोल्हापुरे करीत असत. ते एकादा तोडा उत्तराला शिकवीत आणि त्यावरहुकूम उत्तर त्याचा अदा करीत असे. परतु जाणकाराचें मत असे पडत असें की, शिष्य-उत्तरच-गुरूवर अधिक मात करीत आहे. कोणालाहि आकर्षून घेईल अशी उत्तराची पावले पडत असत. दिनकर केवळ विनोदी नटच नव्हता. चागल्यापैकी नर्तकहि होता.

बस्स ! दिनकरनें अशा दोन-चार भूमिका केल्या. पण तेवढ्यातहि तो चिरस्मरणीय ठरला. हीच गोष्ट सर्वांत महत्वाची आहे. रगभूमीप्रमाणे चित्रपटातहि त्याने कामें केलीं आहेत. 'पहिला पाळणा' मधील जगूची अविस्मरणीय भूमिका पाहून त्याचें त्या क्षेत्रांतील कर्तृत्व अजमवता येणें सहज शक्य आहे.

असा होता दिवकर ढेरे-नव्हे दिनकर कामण्णा ! ! हास्यरसाची निर्मिती हटकून करणारा एक बुद्धिवान नट ! त्याचा विशेष होता तो त्याच्या वाक्याच्या उच्चार पद्धतीत. मोठी मोठी पल्लेदार वाक्यें तो सहज जिभेवर लीलया नाचवीत असे. त्यामुळें होणारा आनद केवळ वर्णनातीत होता. ३१ ऑगस्ट १९४३ सालीं हा हिरा क्षयरोगानें मृत्यूमुखीं पडला. खरोखर त्याच्या मृत्यूनें मराठी रगभूमी एका विनोदाच्या बादशहाला मुकली यात सशय नाही !

• • •

---

( सोनेरी नदीचा राजा )

नाटकांत कामें करणारी पात्रें बरीच असलीं तरी सर्वांनीच मनापासून कामें केली. विशेषत: अविनाश बोडस यांचें आनंदाचें काम त्याच्या वयाच्या मानाने उठावदार वाटलें. त्याची कामाची समज चागली होती. अरूण जोगळेकरांचें केसाळसिंगाचें काम स्मरणीय वाटावें असेच होतें. इतर सर्वांचा वाटा असाच चागला आहे.

एकदरींत चिल्ड्रन्स थिअेटरचा हा नवा प्रयत्न यशस्वी ठरणार यात संदेह नाहीच. बालरंगभूमीवरील एक अनुकरणीय उदाहरण म्हणून त्याचा उल्लेख करावासा वाटतो. मलाकरितां सादर केलीं जाणारीं नाटकें कशीं असावीत याचा जणू एक कळत न कळत घालून दिलेला आदर्शच !

• • •



# एक साधा, सरळ कौटुंबिक चित्रपट

सुमति गुप्ते ★ राजा परांजपे

"क्षण आला भाग्याचा"—या चित्रपटाच्या निमित्तानें बरेच वर्षानंतर एक साधी, सरळ मध्यमवर्गीय कौटुंबिक कथा पडद्यावर पहावयास मिळते. मध्यम वर्गाचीं सुखदुःखं, त्यांच्या अडचणी, त्यांतून त्यांनीं काढलेला मार्ग, संकटांना तोंड देतांना त्यांनीं दिलेला झगडा यांचं वास्तववादी चित्रण या चित्रपटांत रेखाटलं आहे. वास्तवतेला सोडून जे अनेक चित्रपट सध्यां निघतात त्यांपेक्षां हा बोलपट निराळा आहे. त्यामुळेंच त्याची पकड प्रेक्षकांच्या मनावर अधिक वेळ रहाते. साधं-सरळ आणि प्रामाणिक जीवन जगणाऱ्या एका पोस्टमास्तरच्या आयुष्यावर ही कथा आधारली आहे. या पोस्टमास्तरच्या आयुष्याशीं, त्याच्या कुटुंबियांशी प्रेक्षक समरस होतो, यांतच बोलपटाचें बरेचसें यश सामावलें आहे.

## कथानक

श्रीधनपूरच्या पोस्ट ऑफिसांत पोस्टमास्तर देवधर ( राजा परांजपे ) इमानें इतबारें नोकरी करीत होते. एक सज्जन प्रामाणिक कर्तव्यतत्पर माणूस अशी त्यांची ख्याती होती. पोस्टमनपासून ते पोस्टमास्तरच्या हुद्यापर्यंत ते त्यांच्या प्रामाणिकतेनं आणि कष्टाळूपणानें चढत गेले होते. त्यांची पत्नी (सुमती गुप्ते) अतिशय प्रेमळ आणि मिळेल त्यांत सुख मानणारी होती. एका प्रामाणिक स्वाभिमानी आणि चारित्र्यवान नवऱ्याची आपण पत्नी आहोंत याचा तिला अभिमान होता. देवधर मास्तरांना सर्वांत मोठी, मुलगी होती. तिचं नांव वंदना, शाळेंत शिकणारीं दोन मुलं होतीं. मोठ्याचं नांव होतं अनील, धाकट्याचं नांव होतं शिरीष. देवधर मास्तरांचे शेजारी होते मार्तंड देशपांडे. मार्तंडराव शेअर बाजारचा धंदा करीत; त्यांच्या कानाला सदव टेलिफोन लागलेला असे. त्यांना मूलबाळ नव्हतं. त्यांची तृतीय पत्नी व पुतण्या जयंत असं त्यांचं कुटुंब होतं. जयंत देवधर मास्तरांच्या हाताखालीं पोस्टांत कारकून होता. त्याचं आणि देवधर मास्तरांच्या मुलीचं एकमेकांवर प्रेम होतं. देवधर मास्तरांच्या कानांवर त्याची कुणकुण जाते. नुसतं प्रेम करणं त्यांना पसंत नसतं. दोघांच्या घरच्या संमतीनें जयंत-वंदनेचा साखरपुडा होतो. जयंत देवधर मास्तरांचा भावी जांवई होतो.

जयंताचे काका शेअरर्सच्या धंद्यांत मशगूल असत. त्यांनीं घेतलेल्या शेअर्सचे भाव उतरतात व त्यांना दहा हजार रुपयांची खोट बसते. हे पैसे त्यांनीं तावडतोब न भरल्यास त्यांची धंद्यांतली पत जाणार असते. पैशाची कांहीं व्यवस्था करण्यासाठीं ते पोस्टांत जयंताकडे जातात. इतक्यात पोस्टमन पांच हजाराचीं दोन इन्शुअरर्ड लेटर्स जयंताकडे परत करतो. त्याच्या ड्रॉवरमधून मार्तंडराव तीं लांबवतात जयंत देशपांडे संध्याकाळीं पोस्ट ऑफिस सुटल्यानंतरहि कपाळाला हात लावून बसलेला पाहून देवधर मास्तर त्याची चौकशी करतात. जयंत पांच हजारांचीं दोन इन्शुअरर्ड लेटर्स गहाळ झाल्याचं त्यांना सांगतो. या त्याच्या चुकीबद्दल त्याला तुरुंगवास भोगायला लागणार व तो आयुष्यांतून उठणार हें नक्की असतं. त्यामुळें आपल्या मुलीच्या आयुष्याचं मातेरं होणार असं भयानक चित्र देवधर मास्तरांना डोळ्यांपुढें दिसूं लागतं.

आपल्या भावी जांवयावर आलेलं हें संकट देवधर मास्तर आपल्या अंगावर घेतात. दुसऱ्या दिवशीं पोस्ट ऑफिसची Inspection करायला येणाऱ्या इन्स्पेक्टरला ते कबुली जबाब लिहून ठेवतात कीं, "गहाळ झालेल्या पांच हजारांच्या दोन Insured Lettrs ला मी जबाबदार आहे त्यामुळें मी Post Master च्या जागेवर बसायला लायक नाहीं. म्हणून मी माझ्या जागेचा राजीनामा देत आहे."

बायका-मुलांना न सांगता दुसऱ्या दिवशीं देवधर मास्तर घरांतून निघून जातत. इन्स्पेक्टर ठरलेल्या वेळीं पोस्टांत येतात व झालेल्या प्रकाराची पोलीसला वर्दी देतात. पोस्टमास्तर देवधर घरांतून निघून गेल्यानंतर रात्रीं संगमपूर स्टेशनावर येतात व रात्रीं तेथेंच झोंपतात एक चोर त्यांना झोंपलेले पाहून त्यांची टोपी, काठी, कोट व घड्याळ घेऊन पळून जातो. देवधर मास्तर त्याचा पाठलाग करतात त्या कपड्यांसकट तो चोर आगगाडीखालीं सांपडतो. त्याचं प्रेत छिन्न विछिन्न झाल्यामुळें ओळखतां येत नाहीं, पण जवळच्या वस्तूंवरून देवधर मास्तरांनीं गाडीखालीं आत्महत्या केली अशी पोलीसखात्याची खात्री होते व त्याच्या घरच्या मंडळींना तसं वृत्त कळावलं जातं.

# क्षण आला भाग्याचा

रंगा मराठे



वंदना

देवधर मास्तरांनीं आत्महत्या केल्याचं कळतांच त्यांच्या घरच्या मंडळींवर दुःखाची कुऱ्हाड कोसळते. जयंत देशपांडे-वंदनेचा भावी पती त्यांना मदत करण्यास पुढें सरसावतो. त्याची मदत हें स्वाभिमानी कुटुंब साफ नाकारते. वंदना नोकरी धरते व लहान मुलं वर्तमान पत्रें विकून—पोस्टांत मनी ऑडरी, पत्र लिहिण्याचीं कामं करून पैसे मिळवितात. जयंत वंदनेला लग्न करण्याचा आग्रह करतो. विस्कटलेलं घर पुन्हा उभं राहीपर्यंत लग्न न करण्याचा तिचा निश्चय असतो. पुढें जयंताची नागपुरला बदली होते. जातांना तो वंदनेला भेटून जातो व सांगतो. "लग्न करायचंच झाल तर तुझ्याशीं करीन. तं तुझ्या जबाबदारींतून मोकळी झालीस कीं, मला कळव, मी तुझी वाट पाहीन" आपल्या चुकीमुळें देवधर मास्तरांनीं वनवास पत्करला याची जाणीव जयंताला असते. तो हें सारं वंदनेच्या आईला सांगतो. आपला पती असं करणार नाहीं अशी तिला खात्री असते. आपल्या मुलीला भावी जांवयाला वांचविण्याकरिता आपल्या पतीनें हें सारं केलें हें ऐकून वंदनेच्या आईचा ऊर भरून येतो.

आपल्या पतीच्या वियोगानें रडून रडून वंदनेच्या आईची दृष्टि जाते. मुलांना फी द्यायला, पुस्तकं आणायलाहि पैसे नसतात. या साऱ्या आपत्तींना देवधर कुटुंब धैर्यानें तोंड देत असतं. वंदनेची आई आपल्या जांवयास—जयंताला म्हणते, "आमच्या घरांतलीं माणसं दुसऱ्यासमोर हात पसरतात तो देण्यासाठीं, घेण्यासाठीं नाहीं"

इकडे देवधर मास्तर हिंडत हिंडत एका गांवांत येतात, तियं फुलांचा धंदा करणारा वृद्ध आबा व त्यांची मुलगी शेवंता यांची गाठ पडते. मास्तरांच्या अंगांत ताप असतो व ते बेशुद्धावस्थेंत असतात. आबा त्यांना आपल्या घरीं घेऊन जातात. त्याच गांवातल्या सरस्वती बालक मंदिरांत देवधर मास्तर शिपायाची नोकरी धरतात व आपली गुजराण करतात......

●●

अशींच वर्षांमागून वर्षं जातात. देवधर कुटुंब आपत्तींना तोंड देऊन झगडत असत. अनील आतां पदवीधर होऊन शिक्षणखात्यांत मोठ्या हुद्यावर नोकरी करीत असतो. शिरीष गायनांत मोठें नैपुण्य मिळवितो. त्याच्या गाण्यावर लोक वेडे होतात. शिरीषला गानगंधर्व ही पदवी बहाल करतात.

इकडें सट्टयाच्या व्यवहारांत मार्तंडरावांना बरीच खोट बसते. आपल्या नवऱ्याचं सारं लक्ष सट्टयांत असून तो आपल्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहे या जाणिवेनं त्यांची पत्नी त्यांना सोडून कायमची माहेरीं निघून जाते.

मार्तंडरावांच्या घरावर जप्ती येते. त्यांचं सारं सामान विकलं जातं—मार्तंडराव वेड्यासारखे बरळूं लागतात. ते म्हणतात "मी पापी आहे. मी चांडाळ आहे" अनील शिरीष त्यांना आपल्या घरांत घेऊन येतात. जयंताला तार करतात. जयंत नागपूरहून तांतडीनें निघून येतो.

मार्तंडराव कबुली जबाब देतात.

"मुलांनो, तुमचे वडील निष्कलंक आहेत. तुमच्यावर ज्या आपत्ती आल्या त्याला मी जबाबदार आहे. पांच हजारांचीं तीं दोन इन्शुअर्ड लेटर्स मीं चोरली"

मार्तंडराव "मी पापी आहे, मी गुन्हेगार आहे" असं म्हणत धांवत सुटतात. पोलीस स्टेशनवर जातात व स्वतः होऊन पोलीसच्या स्वाधीन होतात.

योगायोगानें अनील ज्या शाळेंत आपले वडील शिपायाची नोकरी करीत असतात त्या शाळेच्या तपासणीसाठीं येतो. हा आपला मुलगाच आहे असं देवधर मास्तर ओळखतात. त्यांचा उर भरून येतो. शिपायाला (देवधर मास्तरांना) चहा आणायला सांगतात. आपल्या मुलाच्या हातांत चहाचा कप देतांना देवधर मास्तरांचा हात कापूं लागतो. चहाचा कप इन्स्पेक्टरसाहेबांच्या अंगावर सांडतो. इन्स्पेक्टर रागावतात. "इतक्या म्हाताऱ्या शिपायाला नोकरीवर कशाला ठेवलांत. याला ताबडतोब काढून तरुण शिपायाची नेमणूक करा." असं सांगतात. देवधर मास्तरांची नोकरी सुटते. ते गांवहि सोडतात. व श्रीधनपूरला - आपल्या गांवाला परत येतात. गांवांत त्यांना वाढलेली दाढी व गबाळ वेषामुळें कुणीच ओळखत नाहीं.

त्याच रात्रीं शिरीषचा गाण्याचा जलसा असतो. थिएटरवर झुंबड उडालेली असते. देवधर मास्तरांना आपल्या मुलाचं गाण ऐकण्याची तीव्र उत्कंठा असते. थिएटरवर 'हाऊस फुल्ल' पाटी लागते, तिथल्या एका माणसाला पैसे चारून देवधर मास्तर थिएटरमध्यें प्रवेश मिळवितात. त्याच दिवशीं त्यांचा 'श्राद्धदिन' असतो. मास्तर गाणं संपल्यावर बाहेर येतात. शिरीषच्या गाण्याची मैफल फारच रंगते. थिएटरचे मॅनेजर उद्यां पण प्रोग्राम द्या अशी शिरीषला गळ घालतात. शिरीष ते नाकारतो व म्हणतो."

"माझ्या आईच्या डोळयाचें उद्या मुंबईला ऑपरेशन आहे मला प्रोग्राम देणं जमणार नाही."

शिरीषच्या तोंडचे ते शब्द देवधर मास्तरांच्या कानांवर पडतात. त्यांच्या पत्नीची दृष्टि गेल्याचं त्यांना माहीत नसतं. दृष्टि परत मिळण्यासाठी ऑपरेशन असतं. ऑपरेशन नतर त्यांना दृष्टि परत मिळणार असते.

देवधर मास्तर मुंबईला जातात. ज्या हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन झालेलं असतं तिथं येतात.

त्या दिवशीं आईच्या डोळयाचा पट्टा सोडावयाचा असतो. अनिल शिरीष, जयंत, वदना सारीजण आईच्या भोंवती जमलेली असतात. डॉक्टर आईला म्हणातात,

"आई, तुमची दृष्टि आज परत येणार. तुम्हांला आतां दिसायला लागणार. प्रथम तुम्हाला कुणाला पहायची इच्छा आहे?"

आई म्हणतात,

"ज्यांना पहाण्यासाठीं दृष्टि होती ते गेले. आतां मला कुणालाच पहायची इच्छा नाही."

देवधर मास्तर हॉस्पिटलांत चोरून शिरतात. फुटक्या तावदानातून आपल्या बायकोच्या डोळयांवरील पट्टा काढतांना पहातात. आईच्या डोळयाचा पट्टा दूर होतो. समोरच्या फुटक्या तावदानातून दाढी वाढलेले देवधर मास्तर त्याना दिसतात. त्याच्या स्वतःच्या दृष्टीवर विश्वास बसत नाही. त्या डोळे चोळून पुन्हा पुन्हा पाहूं लागतात. पुन्हां त्याना तेंच दिसतं. दाढी वाढलेले आपले पती. आई त्याना ओळखते,

बाहेरून चोरून पहाणाऱ्या देवधर मास्तराना हॉस्पिटलचा नोकर खेंचून आंत आणतो. मास्तराचा हात टेबलावर ठेवलेल्या हत्यारावर पडतो. बोटांतून घळाघळा रक्त वाहू लागते. नोकरानें पकडून आणलेल्या मास्तराना कुणीच ओळखत नाही. डॉक्टर म्हणतात,

"घेऊन जा त्याला."

आई उठते. ती मास्तरांच्या जवळ जाते. आपल्या माणसाला ती ओळखते. व त्याच्या पाया पडत म्हणते,

"कोण आपण?"

मास्तराच्या बोटातून रक्त वहात असते. त्याच बोटानं ते पत्नीला रक्ताच कुंकू लावतात. वदना अनील, शिरीष यांना आपले वडील परत मिळतात. आईला आपले पती! अनेक वर्षांच्या काबाडकष्टा नंतर हा भाग्याचा क्षण येतो.

## अभिनय

देवधर मास्तराची भूमिका राजा परांजपे यांनी केली आहे. पेडगांवचे शहाणे, ऊनपाऊस या चित्रपटातील त्याच्या उत्कट आणि उत्कृष्ट अभिनयाची येथें सारखी आठवण होतें. देवधर पोस्टमास्तरांचे एक जिवंत व्यक्तिचित्र राजाभाऊनीं आपल्या अभिनयानें प्रेक्षकांसमोर उभें केलें आहे. त्याला तितक्याच तोडीची साथ त्यांच्या पत्नीनं (सुमती गुप्ते) दिली आहे. दहाच्या ठोक्याला पोस्टांत हजर होणारे देवधर मास्तर, मुलांना माया लावणारे, त्यांना शिस्त लावणारे, आगाऊ क्लार्कनें चूक केली कीं, त्याच्यावर रागावणारे पण लागलीच त्यांना मदतीचा हात पुढें करणारे देवधर मास्तर या निरनिराळ्या भूमिका करतांना त्यांनी केलेल्या अभिनयानं त्यांच्या व्यक्तिरेखेला जी एक सोनेरी झालर लावली गेली आहे तिचं सारं श्रेय राजाभाऊंनाच आहे. तितकचं सुमती गुप्ते यांना आहे. या दोन जिवंत व्यक्तिरेखांपुढें बाकीच्या साऱ्याचा अभिनय फिका पडतो.

चित्रपटाची कथा, पटकथा व सवाद मधुसूदन कालेलकरांचें आहेत. एक चागली पटकथा बरेच दिवसानंतर लिहिल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करायला हवं. सवादात व्यक्तिरेखेला बाध येईल असा एकहि प्रसंग नाही.

## दिग्दर्शन

चित्रपटाचें दिग्दर्शन दत्ता धर्माधिकारी यानीं केले आहे. चित्रपटांतील अनक प्रसंग त्यांच्या कौशल्यपूर्ण दिग्दर्शनाची साक्ष देतात.

अनील आपला "आमचं घर" हा निबंध वाचून दाखवितो. पण तो वाचताना इतका गहिंवरून जातो की, त्याला तो वाचता येत नाहीं. मग देवधर मास्तर वाचायला लागतात पण—"आमचे बाबा— इथं थांबतात— घुटमळतात. आपली स्वतःची स्तुति वाचून ते गहिंवरून जातात. प्रत्येकजण आपल्याबद्दलचा भाग आला की, थांबतों. "आमची आई" इथं आई थांबते. "आमची ताई" इथं ताई थांबतें. एक साधा निबंध पण घरांतली सारी मंडळी वाचतात हा प्रसंग अत्यंत कौशल्यानें हाताळला आहे. आपली स्वतःची स्तुती आपणच कशी वाचायची?

हा निबंध-वाचनाचा प्रसंग दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी यांनीं इतक्या हळुवार हातानं रंगविला आहे कीं, प्रेक्षकांच्या मनाची तो पकड घेतो.

देवधर मास्तर घर सोडून जातात त्या वेळचा असाच एक प्रसंग आहे. त्याचीं दोन मुलं, मुलगी (वंदना) व पत्नी झोंपलेलीं असतात. त्याच्याकडे पाहून मास्तर जड अंत:करणानें घराबाहेर जायला निघतात. त्यावेळीं त्यांचा पाय वंदनेच्या अंगावरील पांघरुणात अडकतो व पांघरूण पुढें सरकू लागते. मास्तराचे पाय क्षणभर घुटमळतात. आपल्या मुलीच्या सुखाकरिता ते वनवास स्वीकारून घराबाहेर पडत असतात. त्यांच्या पायाबरोबर तिच्या अंगावरच पांघरूणहि खेचलं जातं मुलीची माया त्याना मागें खेचीत होती असे या प्रसगांत सूचित केल गेलं आहे.

शेवटच्या प्रसंगातसुद्धा मास्तरांचा हात टेबलावर ठेवलेल्या शस्त्रावर पडतो. त्यांच्या बोटातून रक्त वाहू लागतें. त्याच रक्तानं आपल्या पत्नीला ते कुंकु लावतात.

हे सारे व असे अनेक प्रसग दत्ता धर्माधिकारी यांच्या कौशल्यपूर्ण दिग्दर्शनाची साक्ष देणारे आहेत. दिग्दर्शनाच्या सूक्ष्म बारकाव्याचा उपयोग करून त्यांनीं प्रत्येक प्रसग जास्त परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संगीत

चित्रपटाचें संगीत दिग्दर्शन राम कदम याचें असून चित्रपटाची सगीताची बाजू साफ लंगडी पडली आहे असें नाइलाजानें म्हणावें

(पान ५० वर पहा)

# दि बर्ड्स

## हिचकॉकची नवी भरारी



हिचकॉक नॅन्सीशी काय बोलत आहे ?

" एक शेतकरी मरून पडला आहे. त्याच्या दोन्ही डोळ्यांच्या रिकाम्या खोबणींतून रक्त वहात आहे. शाळा सुटल्यावर मुलं घरीं परतत आहेत. अशा वेळीं आकाशांत असलेला पक्षांचा एक प्रचंड थवा गतिमान वेगानं खालीं येऊन या शाळेंतून येणाऱ्या मुलांवर झडप घालतो. गांवांतील लोकांच्या तावडतोब लक्षांत येतं कीं, पक्षांनीं त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारलं आहे. थोड्याच वेळांत आकाशांत उड्डाण करणारे ते यमाचे काळे दूत जो दिसेल त्याला आपल्या भयानक चोंचीनें घायाळ करून यमसदनाला पाठवतात. निराधार, असहाय्य स्थितींत सांपडलेलीं सारीं माणसं आणि मुलं त्या अजस्र पक्षांच्या भक्ष्यस्थानीं पडतात. मृत्यूची प्रचंड झडप त्यांच्यावर पडते. शेवटीं हे सारे क्रूरपक्षी त्यांच्या प्रेतांवरहि तुटून पडतात व अखेर सांगाडे शिल्लक रहातात. प्रचंड पंख असलेली पक्षांची ही अफाट सेना त्यांत कोण असावं? कावळे, डोमकावळे समुद्रपक्षी, गिधाडं, गाणारे पक्षी, सारिका, बहिरीससाणे आणि असेच अनेक. या साऱ्या प्राण्यांचा हल्ला नुसताच निराधार माणसांवर नव्हता. तर त्यांची झेप गांवांतील घरांची धुरांडीं, घरांच्या खिडक्या, दरवाजे आणि जें दिसेल त्यावर पडे. त्यांच्या प्रचंड पंखांची फडफड आणि चोंचीच्या संतप्त तडाख्यांतून कोणतीच जागा शिल्लक रहात नाहीं. कोणालाच सुरक्षिततेची खात्री नाहीं. सारं भयंकर ! भयानक !!"

वरील वर्णन आलफ्रेड हिचकॉकच्या एका आगामी नव्या चित्रपटांतील एका प्रसंगाचें आहे. त्या चित्रपटाचं नांव "The Birds" असं आहे. या साऱ्या पक्षांचा एकमेव पालक—चालक आणि दिग्दर्शक दुसरा कोण असणार? आलफ्रेड हिचकॉक! या पक्षांच्या संगतींतच त्याचा सारा वेळ जातो. तो म्हणतो, "या पक्षांच्या सूक्ष्म हालचालींचं नुसतं निरीक्षण करतांनाच मीं अगदीं दमून जातो" आपल्या लक्षावधी पक्षांच्या अफाट सेनेचा हा नायक आपल्या नवीन भयानक, अंगावर शहारा आणणाऱ्या चित्रपटाचा आढावा घेतांना म्हणतो; "या पक्षांचं पालन—पोषण मीच करतों हेंच ठीक. दुसऱ्या कुणावर अशी आपत्ति न ओढवलेली बरी !"

### गगनविहारी नट

हिचकॉकनें सध्यां निरनिराळ्या जातींचे सुमारे सातशे पक्षी पकडून ते पाळले आहेत. त्यांना तो निरनिराळ्या तऱ्हेचं शिक्षण देत असतांना त्याला अत्यंत सावधगिरीनं वागावं लागतं. त्यांतच त्याचे तासन् तास निघून जातात. हे सारे गगनांत विहार करणारे म्हणजे गगनविहारी नट आहेत.

हिचकॉकच्या ह्या नव्या कलाकृतीची कल्पना फ्रेंच लेखक Daphne Du Maurie यांच्या कादंबरीवर आधारलेली आहे. यांत रक्त गोठून जाणाऱ्या भयानक घटना असल्यामुळें हिचकॉकला तें एक आवाहनच वाटत आहे.

शाळेंतून परतणाऱ्या मुलांवर हल्ला करणाऱ्या पक्षांचें दृश्य ज्या देखाव्यांत घेतलें आहे त्यांत पाळलेल्या पक्षांना पळणाऱ्या मुलांचा पाठलाग करीत त्यांच्याजवळून यांत्रिकतेनं उडण्याचं शिक्षण दिलं आहे. या पक्षांच्या गळ्याभोंवतीं जनावरांच्या केंसांची एक गळपट्टी शिवली आहे. हा देखावा चार निरनिराळ्या तऱ्हेनं घेऊन मग त्याची एकमेकांत सांगड घातली आहे. हा हल्ल्याचा देखावा दूरवरून चित्रित करून मगच त्याचें मिश्रण केलें आहे. त्यामुळें त्याची भयानकता अधिकच जाणवते.

हिचकॉकची नवी सौंदर्यसम्राज्ञी टिप्पी हेड्रन हिच्यावर पक्षांचा एक थवा हल्ला करतो असें एक दृश्य चित्रपटांत घातलें आहे. हा हल्ला ती मोठ्या धैर्यानें सर्वस्व पणाला लावून परतविते असा एक मिनिटभर पडद्यावर टिकणारा देखावा चित्रित केला आहे. बारा पाळीव पक्षांच्या सहाय्यानं हा देखावा चित्रित करायला सहा दिवस लागले. अनेक कृत्रिम निर्जीव पक्षांचा उपयोग करून शेवटी पांचशे पक्षी टिप्पीवर झडप घालीत आहेत असें दृश्य चित्रित करण्यांत आलें आहे.

हिचकॉक म्हणतो, "वर्षानुवर्षे मनुष्यप्राणी पक्षाची शिकार करीत आहे. या मानवी प्रवृत्ति विरुद्ध ते बंड पुकारणं अगदीं स्वाभाविक लाहे. पुष्कळांना या पक्षांची भीति पण वाटते."

"कावळ्याच्या तल्लख बुध्दीबद्दल मात्र मला फारच आश्चर्य वाटतं" असं पक्षांचा, शिक्षक रे बार्विक म्हणतो. त्याच्या मतें पक्षांच्या सेनेचा सर्वांत महत्वाचा पक्षी आहे. ज्यांची शिकार करणं आणि ज्यांना पकडणं फारच कठीण असे पक्षी म्हणजे गरुड, बहिरी ससाणा. या पक्षांना शिकविण्याचं काम फारच जिकीरीचं. कांहीं युक्त्या यांना शिकवायच्या म्हणजे जवळजवळ अशक्य! समुद्रपक्षी हे फारच उग्र व भयानक पक्षी आहेत. या साऱ्या निरनिराळ्या पक्षांना शिक्षण देतांनाच बार्विक व त्याचा सहाय्यक यांचा सारा वेळ जातो. "गल" नांवाच्या पक्षाला बार्विकनें एका नटाच्या डोक्यावर झडप घालून आपल्या पंखांनी त्याला घायाळ करून परत मागें आपल्या जागेवर यायचं, पुन्हा दुसऱ्या फेरीत पुन्हा तेंच असं करण्याचं दिलं आहे. पण सर्वांत तल्लख डोक्याचा पक्षी म्हणजे कावळा! या कावळ्याचं नांव "नॅंसी" असं आहे. गाडीच्या किल्ल्या आणून देणं, वर्तमानपत्र चोंचीनें उचलून आणणं, सिगारेट आणून ती बार्विकच्या ओठांत अल्लद ठेवून ती पेटवणं हीं सारीं कामं नॅंसी अत्यंत चलाखीनं अन् हुशारीने करतो. या नव्या चित्रपटांत या नॅंसीनें आपली कामगिरी चोख बजावली आहे. नॅंसीच्या क्लोजअपस् मध्यें तो कॅमेऱ्यापासून दूर अंतरावरून उडत येतो व सरळ कॅमेऱ्याच्या लेन्सवर येऊन धडक मारतो.

सॅन फ्रॅन्सिस्कोच्या उत्तरेस साठ मैलांवर Bodega bay या ठिकाणीं या चित्रपटाची वरीचशी फिल्म चित्रित केलेली आहे. आतां पक्षांची ही प्रचंड सेना हॉलिवुडच्या आवारांत परतली आहे. या साऱ्यांना सर्व बाजूंनीं बंद असलेल्या एका छोटया स्टुडिओंत बंदिस्त करण्यांत आलं आहे. त्यांना आतां नैसर्गिक उजेड न दिसतां फक्त स्टुडिओंतील फ्लडलाइटच्या प्रकाशांत हे सारे पक्षी तळपत आहेत. त्यांना आतां बाहेर जाण्याची बंदी केली आहे. या पक्षांना बंदिस्त वातावरणांत मन रमविण्यासाठीं भरपूर हवा व प्रकाश खेळतां ठेवला आहे. त्यामुळें हे पक्षी अत्यंत मोकळेपणानें आपलं सारं कौशल्य या बंदिस्त वातावरणांतहि दाखवूं शकतील अशी खात्री वाटते. मात्र या पक्षांच्या सानिध्यांत असलेला दिग्दर्शक हिचकॉक व पक्षीपालक बार्विक या पक्षांवर फार ताण पडणार नाहीं अशी दक्षता घेत असतात.

"रक्तबंबाळ करणारे" देखावे चित्रित करतांना मात्र हिचकॉक अतिशय रमून जातो. हिचकॉक म्हणतो, "असा एक विलक्षण देखावा आहे कीं, हे सारे पक्षी माणसांचे डोळे चोंचीनें टोचून बाहेर काढीत आहेत, या साऱ्या लोकांचे डोळे खोबणींतून खालीं गालांवर लोंबत आहेत हें दृश्य माझ्या डोळ्यांना दिसत आहे."

• • •




१ : जे कां रंजले गांजले

२ : त्यासी म्हणे जो आपुले

३ : तोचि साधु ओळखावा

४ : देव तेथेंची जाणावा

अर्थात्

चार भागांतील

भा. रा. भागवत

यांची

गाजलेली कलाकृति

• • •

गांजलेले जीव

मूल्य बारा रुपये

• • •

महाराष्ट्र प्रकाशन

राजकमल चौक,

अमरावती.

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगांवकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | " | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | " | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.३० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात बुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दांडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| बडबडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङमयविलास | " | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट (काव्य) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो. उदापुरे | ३.०० |
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दांडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | " | ६.०० |
| पूर्णामायचीं लेकरं | " | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा (नाटक) | " | ०.५० |
| शितु ( " ) | " | २.०० |
| पवनाकांठचा धोंडी ( " ) | " | २.५० |
| उद्धव ( " ) | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्यांचें सिंहासन ( " ) | गो. कृ मुंगशीकर | २.०० |
| गांजलेले जीव भाग १ ते४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | " | २.५० |
| पाताळलोकची अद्‌भूत यात्रा | " | ३.०० |
| चिटोऱ्याचा प्रताप | " | २.०० |
| हिंमतवान जासूद | " | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरची माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशंकर पंडित | १.५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | " | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | भ. श्री. पंडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३.०० |
| जळांतील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४.०० |

## क्षण आला भाग्याचा

( पान ४६ वरून चालू )

लागतें. चित्रपटांत एकूण पांच गाणीं असून एकाहि गाण्याला चांगली चाल दिलेली नाहीं. सुरुवातीला देवधर मास्तर म्हणतात तेहि ' देव दयेचा अथांग सागर. ' ' विश्वचि मानी तो आपुलें घर "

हें गीत जरा बरें वाटतें इतकेच. बाकीच्या गीतांच्या चालीसुद्धां अगदीं सामान्य आहेत. त्यामुळें चांगल्या संगीताची जोड चित्रपटाला मिळाली नाहीं. चांगलें संगीत दिग्दर्शन न मिळाल्यामुळें चित्रपटाचा दर्जा बराचसा खालीं येतो. गीताना दिलेल्या चालीसुद्धां जुन्या वाटतात. नादमाधुर्य व स्वराविलासाचा संपूर्ण अभाव असंच या चित्रपटाच्या संगीताचं वर्णन करावं लागेल.

### इतर भूमिका

देवधर मास्तर (राजा परांजपे) व त्याची पत्नी (सुमिती गुप्ते) यांच्या भूमिका सोडल्यास जयंत (रमेश देव) वंदना (वंदना) यांचीं कामें साधारण बरीं झालीं आहेत. वंदना ही अनेकदां बुजल्यासारखीं किंवा Over acting करते. रमेश देव यांच्या मर्यादा आतां स्पष्ट झाल्या आहेत. त्यापलिकडे जाऊन ते कांहीं उत्कृष्ट अभिनय करून दाखवतील असें वाटत नाहीं. त्यामुळें वंदना-जयंत या जोडीनें ठाकठीक काम केलें आहे येवढेंच.

मार्तंडराव (धुमाळ) व त्यांची पत्नी (उमा) यांचीं कामें चांगलीं झालीं आहेत. धुमाळ यांचा अभिनय अकृत्रिम व जिवंत वाटतो. उमाचं काम ठसठशीत व तिच्या भूमिकेला योग्य असें झालें आहे. तिनं आपलं काम इतकं समजून केलं आहे कीं, धुमाळ यांच्या नैसर्गिक विनोदी भूमिकेला उठाव मिळाला आहे.

### उणीव

या चित्रपटांत जसे गुण तसे दोषहि पुष्कळ आढळतात. जयंताच्या ऑफिसांत त्याचे काका त्याला भेटायला येतात. मार्तंडराव त्याच्या ड्रावरमधील पाकिटं लांबवितात व निघून जातात. आणि जयंत पाकिटं गहाळ झालीं म्हणून डोक्याला हात लावून बसतो. त्याला आपल्या काकांचा जरासुद्धां संशय येत नाहीं, याचं आश्चर्य वाटतं. देवधर मास्तरसुद्धां कोण येऊन गेलं याची जरासुद्धां चौकशी न करतां तें संकट आपल्या स्वतःवर कां ओढवून घेतात याचा अर्थबोध होत नाहीं. ज्या घटनेवर चित्रपटांतील सारे प्रसंग घडतात ती ठिसूळ वाटते. जांवयाला वांचवतांना आपल्या दोन उमद्या मुलांचें आपण मातेरें करीत आहोंत ही गोष्ट देवधर मास्तरना कळत नाहीं काय ? ही घटना न पटणारी वाटते. चित्रपटाच्या कथानकांत ही एक मोठीच उणीव आहे.

देवधर मास्तर फरारी होऊन ज्यांच्या आश्रयाला रहातात त्या आबा–शेवंताच्या घरचे प्रसंग चित्रपटाला फारसे पोषक नाहींत. शेवंताच्या लग्नाचा प्रसंग तर इतका लांबविला आहे कीं, तो कंटाळवाणा होतो. शेवंताच्या ठिकाणी देवधर मास्तरांना आपली मुलगी दिसू लागते, ही दिग्दर्शकानें दाखविलेली समयसूचकता चांगली असली तरी हा प्रसंग मूळ कथानकाला पोषक नाहीं व त्याची लांबण फारच वाढली आहे. आबा आणि शेवंता यांच्या ताटातुटीचा शोककारक प्रसंग हा अनावश्यक व अनाठायीं वाटतो. " मला गहींवर आला. " अशी अश्रूंची Paraphrase तर अत्यंत पोरकट आहे.

वंदना आणि जयंताचा बागेंतील प्रेमप्रसंगहि तसाच अनावश्यक आहे नायक नायिकेच्या मागें बागेंतून धावत धांवत सुटतो. मध्येंच थांबतो. मग ती दोघे धांवत धांवत गाणं म्हणतात. मध्यें ' प्रेमाचा पूल ' लागतो. हे हिंदी चित्रपटांतील प्रसंग मराठी चित्रपटांत पाहिले कीं ज्यापासून पळालों त्यांतच अखेर अडकलों असें प्रेक्षकांना वाटतें.

देवधर मास्तरांसारख्या प्रामाणिक माणसाला थिएटरमध्यें प्रवेश मिळवण्यासाठीं डोअरकीपरच्या हातीं पैसे चारायला लावून या व्यक्तिरेखेला निष्कारण डागाळण्यांत आलें आहे.

तसेंच हॉस्पिटलच्या आवारांत शिरलेल्या माणसाला दरवान धक्के मारून बाहेर घालवील की धक्के मारीत ऑपरेशन रूममध्यें ढकलील ? ही ढकलाढकल देवधर मास्तरांच्या हातांत सुई जाऊन त्यांतून ओघळणारें रक्त बायकोच्या नेमकें कपाळावर पडावे म्हणून दाखविण्यासाठीं केलेली आहे, हें जेव्हां लक्षांत येते तेव्हां या दिग्दर्शन चतुराईचें कौतुक ओसरून जातें.

वंदनेचा साखरपुडा झाल्यानंतर या चित्रपटांत असाच एक भयानक अनावश्यक नाच आहे. हा नाच कशाकरतां आहे याचा कांहींच उलगडा होत नाहीं. वंदनेच्या मैत्रिणी तिचं लग्न ठरलं म्हणून बागेंत धांगडधिंगा घालीत नाचतात. हा नाच इतका ओबडधोबड आहे कीं, तो पाहवत नाहीं. या मैत्रिणी फक्त नाचापुरत्या उपटतात व पुन्हा लुप्त होतात. त्या कधींच पुन: दिसत नाहींत. या सात आठ मुलींचा शुभ्र साडीमधला हा धिंगाणा या चित्रपटावरील काळचा रेघा आहेत.

असे अनेक दोष चित्रपटांत असूनसुद्धां एक चांगली पटकथा,सरळ साध्या व्यक्तिरेखा, बऱ्यापैकीं संवाद, राजा परांजपे आणि सुमति गुप्ते यांचा उत्कृष्ट अभिनय यामुळें हा चित्रपट चांगला वाटतो. ही साधी सरळ कौटुंबिक कथा प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते.

●●●



श्शः बाळ उठेल !

# गंगाजळी

## गिर्यारोहकांची कलोपासना

(सैनिक समाचार मध्यें टाईम्स ऑफ इंडियाच्या सौजन्यानें मेजर जॉन डायस एव्हरेस्ट मोहिमेचें सिंहावलोकन करीत आहेत. पंधरा ऑगष्ट अंकांतील संकलन.)

उबदार हवा व निरभ्र आकाश यांचा, नेपाळच्या पहाडी टापूतील, सुखदायक हंगाम आतां संपला आहे. प्रमत्त निसर्गाशी तोंड द्यायला "एव्हरेस्ट शिखरा"ला एकाएकी मागे टाकून, आम्ही आतां परत उताराला लागलों आहोंत, आजूबाजूचं सार वातावरण आतां अविरत बर्फवृष्टीनं व वादळी वाऱ्यानं भेसूर भासू लागलं आहे. ह्या भेसुरपणांत मायेचा ओलावा अधूनमधून जाणवतो तो केवळ याक बैलांच्या गळ्यांतील घुंगर व शेरपाच्या बांसरींतून निघणाऱ्या सुरानीं !

प्रत्यक्ष मोहिमेबद्दल आतां कांहींच सांगण्यासारखं राहिलेल नाही ! तळछावणीच्या तोंडाला येताच, आमच्या स्वागताठी जमलेले शेरपा व इतर "साहेब" मंडळी टाळ्या वाजवून आमचें स्वागत करतात. गरम गरम चहाची त्याला जोड देण्यांत येते. उचावर असतांना तळछावणीचें जें चित्र आम्हीं मनांत रंगविलें होतें. तशीच ही तळछावणी आहे. गरमा गरम जेवण तयार होत आहे. मुदपाकखान्यात थोडूचा सरावलेला हात, उकडलेले बटाटे व मसालेदार कोंबडी यांचेवरून फिरत आहे.

इथल्या रात्री तुलनेनें शांत, सुखाच्या व अंगावर मूठभर मांस आणणाऱ्या आहेत. ह्या रात्री आता नव्या नवलाईच्या भासत असल्यानं आमच्या आनंदाला उधाण येतं. ह्या झक्क रात्रीत सोलू व खुबू नद्यांच्या उन्हाळीं प्रवाहापेक्षांहि दुथडी भरून वाहणारी शेरपाची लोकगीतं आतां क्षण न क्षण पुलकित करीत आहेत. ह्या शेरपाच्या खिशात आतां पैसा खुळखुळत आहे. परतल्याचा आनंद त्याच्या मुखावर ओसंडत आहे. त्यामुळंच चार जानपद गीतं व त्याला नृत्याची लयबद्ध साथ देण्याच्या मनःस्थितींत ते आहेत. त्यांच्या ह्या लोकनृत्यांत आमचे पथकवीर आतां सामील होतात. ह्या साऱ्या बेहोषीला कारण म्हणजे आम्ही काठमाडूच्या वाटेला आता लागणार आहोंत.

त्यामुळंच, माझ्या मनात विचार येतो तो हा कीं, आपल्या मोहिमेच्या यशाच मनांतल्या मनात मूल्यमापन करावं ? आम्ही ह्या मोहिमेंत खरच यशस्वी झालों कां ? "यश" म्हणजें "यश" हें खर; त्या दृष्टीनं आमच्या यशाबद्दल थोडी शका बाकी राहते हेहि खर ! पण, गिर्यारोहणातील यश हें "लौकिक मापा" नं मापायचं नसतं. मूळ प्रश्न म्हणजे "गिर्यारोहण हवच कशाला ?" मॅलोरीनं ह्या प्रश्नाच बेडर उत्तर दिलं तें अस की, "पहाड आहेत म्हणून." खरं म्हणजे धाडस व संकट याना आवाहन देत, काहीतरीं मुलुखावेगळं करण्याचा माणसाचा प्राचीन सोस ह्यामागें आहे. पण, तरीहि इतर कांहीं तरी करावं, पहाड कशाला चढायचा ? खरच, आपण शिखर का चढतो ? आपण हें धाडस करतो, ह्याचं निश्चित असं कोणतच कारण नाही.

पण, असल्या ह्या जगावेगळ्या वेडापायीं आम्हीं काय मिळवलं ? आम्हीं जो अमाप पैसा खर्च केला त्याचा मोबदला आमच्या खिशांत कितपत पडला ? हाच पैसा जगांतील उपाशी वनवासी जीवांना वाटला असता तर ? त्यांची दुपारची भूक तरी कांही दिवस शमली असती. ह्या असल्या महागाऱ्या छंदापायीं आम्हीं नाहकच पैसा उधळला कां ? हे सारे प्रश्न "खडे प्रश्न" आहेत. पण, माणूस कांही केवळ भाकरीवर जगत नसतो. माणसाच्या जीवनांत पर्वताचा शोध तसा महत्त्वाचा नसला तरी पर्वत नसते तर माणूस जगला असतां कां ? म्हणूनच ह्या पर्वतांचं अगदीं त्यांच्या घरांत जाऊन दर्शन घ्यायचं. गिर्यारोहणाची हौस केवळ फुकटच का ? होय, अगदी फुकट हेंच त्याचें उत्तर गिर्यारोहण म्हणजे एक प्रकारचा निष्काम कर्मयोग ! ह्या छंदांत सर्वस्व गमवायचा धोका पत्करूनहि अखेरीस काहीच मिळवायचं नसत यांत कांही फायदा पदरीं पडला कीं ह्या छंदाची सारी गंमत पार पाण्यांत गेलीच म्हणून, समजा ! आपला देश व आपलं तत्त्वज्ञान यांचे झेंडे नाचविण्यासाठी हिटलरच्या जर्मनीप्रमाणें, अंध श्रद्धावान गिर्यारोहक पूर्वीं झाले. वैयक्तिक स्वार्थांसाठीहि कित्येकानीं गिर्यारोहण केलं. पण ते कांहीं हाडाचे गिर्यारोहक मानतां येणार नाहीत. त्यामानानें आम्हीच गिर्यारोहण कलेचे खरे उपासक. अगदी शुद्ध, निरागस, नि स्वार्थ व उत्स्फूर्त हेतूने आम्ही हे पहाड चढलों. एक कर्तव्य म्हणून ह्या कलेला आम्ही जवळ करतों. आमच्या ह्या पथकातील प्रत्येकानें अगदीं निःस्वार्थीपणें त्याग केला हेंच आमचें खरें यश ! हीच आमची खरी दौलत !

●●●

: २ :

## अश्लीलता आणि ग्राम्यता

वाङ्मयीन समीक्षेमध्यें, टिकाकार ज्यावेळी ग्राम्यतेचा उल्लेख करतात, त्यावेळी त्या सर्वांना एकच अर्थ अभिप्रेत असल्याचें दिसून येत नाही. म्हणूनच वाङ्मयीन सदर्भांतील ग्राम्यतेची कल्पना स्पष्ट केल्याशिवाय, लावणी हें 'ग्राम्यगीत' आहे की काय याचा शोध योग्य दिशेनें घेणें अवघड होईल.

टीकाकाराना अभिप्रेत असलेले अर्थ कांहींसे या स्वरूपाचे असतात.

(१) 'नागर' विरोधी ते 'ग्राम्य'

(२) 'विदग्ध' विरोधी तें 'ग्राम्य'

(३) अश्लील किंवा बीभत्स.

(४) जे शब्द किंवा वाक्प्रयोग शिष्टसंमत नाहीत ते 'ग्राम्य'

'ग्राम्य' या शब्दानें बऱ्याच वेळा, अश्लीलतेचा किंवा बीभत्सतेचा निर्देश केला जातो. परंतु ग्राम्यतेचा आणि अश्लीलतेचा किंवा बीभत्सतेचा असा एकरूप सबध असतो कां ? नसल्यास त्याच्यातील काहीं सीमारेषा निश्चित करतां येतात कां ? आणि ह्या कल्पनांचा वेगळेपणा लक्षांत घेण्याची काहीं आवश्यकता आहे का ?—ह्या प्रश्नांचा विचार करता—करतांच, लावणी वाङ्मयांतील ग्राम्यतेकडे आणि शृंगाराकडे वळावयाचें आहे.

शृंगारानुभवाच्या चित्रणामधील कलावंताची 'खाजगी' स्वरूपाची साभिप्रायता किंवा 'सहेतुकता' हे अश्लीलतेचें महत्त्वाचें गमक

आहे–म्हणजे अश्लीलतेचा संबंध हा शृंगारानुभवाच्या अभिव्यक्तीशीं आहे. परंतु ग्राम्यता अशी हेतुपुरःसर नसते. तिचा संबंध कलावंताच्या हेतूशीं निगडीत करतां येत नाहीं. तो, त्याच्या भाषेशीं लावावा लागतो. म्हणूनच, आपल्याला असें आढळून येतें कीं, एकहि ग्राम्य शब्द नसला तरी अश्लीलता निर्माण होऊं शकते आणि अनेक ग्राम्य शब्द असूनहि अश्लीलतेचा लवलेशहि नसूं शकतो.

"कुठें करमेली रात्र सांग रे बात सारितें मुखाकडे। कां निजलासी पाठमोरा हात येऊं द्या खव्याकडे ॥ (सगनभाऊ)" ह्यांत 'ग्राम्य' शब्दाची उणीव आहे, परंतु अश्लील अभिप्राय मात्र भरपूर आहे. ह्या उलट तुकाराम रागावला की सहजगत्याच शिवीं देऊन जातो–

"टाक रुका चाल राडे कां गे केली गोवी। पुसोनिया आले ठाव म्हणोनि देते सिवी."–

किंवा, ह्याबाबतीत लोकहितवादीहि तुकारामाला जवळचे आहेत. ते लिहितात, "जे ब्राह्मण भडवेपणा करतात त्यांस तुम्ही पक्तीत घेता व नीतिमान् क्षूद्रास नीच मानतां, हा वर्णसंकर खरा."

तुकाराम आणि लोकहितवादी 'रांड' 'भडवेपणा' ह्या ग्राम्य शब्दाचा उपयोग करीत असले तरी त्यां द्वारें अश्लीलतेची सूचना देण्याचा त्यांचा हेतु नाहीं, तर, स्वतःचा राग, अधिक तीव्रपणें, अधिक जिवंतपणें, व्यक्त करण्यासाठीं हे शब्द अपरिहार्यपणें त्यांच्या लेखनांत येतात. येथें आणखी एक गोष्ट आपल्याला जाणवते ती ही की, ग्राम्य शब्दामागील कल्पनेला महत्त्व नसतें तर, त्यामागील भावनेला महत्त्व असते. म्हणूनच त्या शब्दाचें कोशगत अर्थ आणि वाङ्मयीन संदर्भातील अर्थ यांत महदंतर असण्याचीहि शक्यता असते.

ग्राम्यतेचें अस्तित्व हें फक्त 'शिष्ट' किंवा 'सुसंस्कृत' (Sophisticated जनांच्या दृष्टीनेंच असतें. ह्या समाजानें, ज्या शब्दांवर किंवा वाक्प्रयोगावर 'ग्राम्य' असा शेरा मारलेला असतो, ते शब्द किंवा वाक्प्रकार समाजाच्या दुसऱ्या एका थरांत, सर्रास वापरांत आढळून येतात.

"कुंकवाची ठेवाठेवी! वोडकादेवी कशाला।" किंवा "सोमुनि आबाळी। धायाळते ढुंग चोळी" ह्यांत ज्या ग्राम्य शब्दाचा उपयोग तुकारामानें केला आहे तो करीत असतांना, 'सुसंस्कृत' मनांना हे शब्द रुचणार नाहींत, हें तुकारामाच्या जाणीवेंतच नाहीं. कारण ते शब्द त्याच्या नित्य व्यवहारांतील, नित्य परिचयांतील आहेत.

अश्लीलता हा एक वाङ्मय दोष असल्यामुळे तिचें अस्तित्व मात्र रसिकनिष्ठच असते. म्हणूनच अश्लीलतेचा विचार करतांना, रसिक, हा शिष्ट आहे की 'अशिष्ट,' 'नागर' आहे की 'ग्रामीण' ह्या चिकित्सेला प्राधान्य मिळत नाहीं, तर त्याच्या अभिरुचीचा विचार महत्त्वाचा ठरतो. शृंगारानुभवाची अभिव्यक्ति करीत असतांना–कोणत्याहि कारणामुळें का होईना,–कलावंताच्या ठिकाणीं जर कलात्मक तारतम्याचा अभाव असेल तर, ह्या रसिकाच्या कलास्वादाच्या प्रक्रियेंत अडथळा निर्माण होतो. आणि म्हणूनच 'अश्लीलता' ही निखालसपणें कलाहीनतेची द्योतक ठरते. ग्राम्यतेमुळें कलास्वादांत अशा प्रकारचें 'विघ्न' निर्माण होईलच असें निश्चितपणें म्हणतां येणार नाही. कारण, तुकारामाचे असे कित्येक अभंग आपल्याला दाखवून देता येतील कीं, जेथें ग्राम्य शब्दांमुळेंच त्याच्या अभिव्यक्तीला अधिक समर्थता येते.

'ग्राम्यता' ही कालांतरानें नष्ट होण्याचीहि शक्यता असते. *कालचे ग्राम्य शब्द आज शिष्टमान्य झाले तर, अर्थातच ग्राम्यतेचा* लोप होईल. परंतु अश्लीलतेचा, कोणत्याहि काळीं, असा लोप होण्याची शक्यता नाही. कारण अश्लीलतेचा विचार हा कलामूल्याच्या संदर्भांत आहे, आणि कलामूल्यें हीं कालसापेक्ष होऊं शकत नाहीत.

"चरा मुक्ताचा चारा तुम्ही निर्भय त्याला म्हणा"

–असें म्हणणारी होनाजीची नायिका जें सुचवूं पाहते आहे, तें कोणत्याहि काळांतील रसिकाला त्याच स्वरुपांत जाणवल्याखेरीज राहणार नाहीं.

ह्यावरून, हें स्पष्ट व्हावें की, अश्लीलतेचा आणि ग्राम्यतेचा एकरूप संबंध नसतो–आणि तसा तो जोडणें इष्टहि नव्हे.

प्रतिष्ठान–जून १९६२
"ग्राम्यता अश्लीलता आणि लावणी वाङ्मय"
–कु. उषा हस्तक

●●●

# सुकामेवा — — — — — — — — — — रमेश के. सहस्रबुद्धे

● एकाच ग्रंथांतून उध्दृत करणें ह्याला वाङ्मयचौर्य म्हणतात, आणि अनेक ग्रंथांतून उध्दृत करणे म्हणजे संशोधन.

● सिगरेटच्या खपाच्या बाबतीत अमेरिकेनें उच्चांक गांठला आहे. तेथें दर माणशीं दरसाल सिगरेटच्या खपाचें प्रमाण २५०० सिगारेटपर्यंत गेलें आहे.

● माणसाचा आवाज दहा मैलांपेक्षां जास्त अंतरावर ऐकवील असा ध्वनिक्षेपक अमेरिकेंत तयार करण्यात आला आहे. सध्यांचें ४५० ध्वनिक्षेपक लावले तरी त्या सर्वांहून या नव्या ध्वनिक्षेपकाचा आवाज मोठा होईल. पण त्याचा आकारमात्र ५×५ ×६ फूट एवढाच आहे. दाबून भरलेली हवा वापरून हा तयार करण्यांत आला आहे.

● जगांतील सर्वांत लठ्ठ माणूस रॉबर्ट अर्ल ह्यूजेस् हा होय. त्याचें वय वीस असून वजन ७१० पौंड व कमरेचा घेर १०९ इंच आहे.

● रणांगणावर जावयाचें असेल तर ईश्वराची एकवेळा प्रार्थना करा. जलप्रवासास जावयाचें असेल तर दोन वेळां प्रार्थना करा. परंतु लग्न करावयास निघालांत तर सहस्त्रवेळां त्या ईश्वराची प्रार्थना करा.

● स्त्री आणि पुरुष दोघांच्याहि डोक्यांत बहुधा 'आंकडे' असतात. फरक इतकाच कीं, आंकडयामुळें स्त्रियांची केशरचना होते-त्यांचे केंस जागच्याजागी बसून रहातात तर पुरुषांचे डोक्यावरचे केंस मात्र ताठ उभे रहातात.

● जगातील सर्व समुद्रांतल्या खनिज क्षारांचा थर सर्व समुद्रावर १७० फूट जाडीचा होईल.

●●●

[ Regd. No, : B 93

# गजान्तलक्ष्मी

'माणूस'चा पहिला दिवाळी अंक मुखपृष्ठाच्या वैशिष्ट्यापासून गाजला.

# महाराष्ट्रलक्ष्मी

हें यंदाच्या दुसऱ्या दिवाळी अंकाचें तितकेंच औचित्यपूर्ण व वास्तवतेचा स्पर्श असणारें मुखपृष्ठ चित्रकार दलाल 'माणूस'च्या वाचकांना सादर करीत आहेत.

या 'महाराष्ट्रलक्ष्मीआलंकृत' दिवाळी अंकाच्या सिद्धतेला अनेक नामवंतांनी व नवागतांनी प्रारंभ केला आहे.

कांहींचा हा नामोल्लेख :

| | | | |
|---|---|---|---|
| आचार्य अत्रे, | वि. स. खांडेकर, | के. वा. भोळे, | एस्. एम्. जोशी, |
| अरविंद गोखले, | दि. बा. मोकाशी, | शंकर पाटील, | ब. मो. पुरंदरे, |
| ग. रा. कामत, | सुधीर फडके, | वसंत जोगळेकर, | सरिता पदकी, |
| वा. वा. पाटणकर, | मधु मंगेश कर्णिक, | मधुकर केचे, | सुरेश भट, |
| वि. ग. कानिटकर, | रंगा मराठे आणि | .. .. .. .. | ... तूर्त एवढेंच पुरें. |

# माणूस

४१९ नारायण पेठ : पुणें २

संपादक–मुद्रक–प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर * प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रणस्थळ : प्रशांत प्रिंटिंग प्रेस, ४३१ सदाशिव पेठ, पुणें २. * कव्हर छपाई : उदय मुद्रणालय, पुणें २.